


# 'स्व'-रूपवर्धिनी

कार्यवृत्त १९९७/९

क्या हार में क्या जीत में
किञ्चित नही भयभीत मैं।
संघर्ष पथ पर जो भी मिला
ये भी सही वो भी सही ॥

# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त १९९७-९८

## अं त रं गा त


- मनोगत
- मुखपृष्ठासंबंधी थोडेसे — श्री. संजय विष्णू तांबट
- शाखा व प्रकल्प उपक्रम वृत्त
- युरेऽका युरेऽका — सौ. अनिता कुलकर्णी
- कमल, नीला, उषा, आणि मरिअम्मा — श्रीमती पुष्पाताई नडे
- शोध कस्तुरीचा — सौ. वैभवी पाटील
- देणाऱ्याचे हात हजारो
- आता केवळ यांचा आठव
- खर्चाच्या डोंगराकडे पहाताना
- अस्वस्थ पूर्वांचल — कु. रोहिणी तेंडूलकर
  कु. मंगल कुडलिंगार



*संपादक*

**श्री. जयंत कवटेकर**

*मुद्रण*

**प्रबोध उद्योग**, शुक्रवार पेठ, पुणे - २

**अभय मुद्रणालय,** टिळक रोड, पुणे - २

मुखपृष्ठ व रेखांकने

**श्री. अवधूत फडणीस / श्री. अरुण फडणीस**

## ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यकारिणी पदाधिकारी व सभासद सूची

### सन्माननीय सभासद

श्री. अविनाश वारदेकर

✿

### कार्यकारी समिती

**अध्यक्ष**
श्री. जयसिंगभाई मरिवाला

**कार्यकारी कार्याध्यक्ष**
श्री. पु. व. श्रॉफ

**कार्याध्यक्ष**
श्री. कृ. ल. पटवर्धन

**कोषाध्यक्ष**
श्री. श्री. शं सामळ

**सहकार्याध्यक्षा**
श्रीमती कुंतला मुजुमदार

**सहकार्याध्यक्ष**
श्री. व.ना. दाते

**कार्यवाह**
श्री. रा. प. देसाई

**सहकार्यवाह**
श्री. शिरीष रा. पटवर्धन

### सभासद

श्री. प्रतापराव पवार

श्री. वा. दे. संचेती

श्री. कां. गि. शहा

श्री. कृ. गो. लवळेकर

प्रा. श्रीमती उषःप्रभा देसाई

श्री. उदय गुजर

श्री. पुखराजजी जैन

सौ. चंद्राताई दलाया

श्रीमती पुष्पाताई नडे

श्री. नंदकिशोर सोंडूर

श्री. संजय विष्णू तांबट

श्री. कन्हैय्यालाल बलदोटा

**पंजिकृत न्यास रजि. नं. एफ/१६९४, पुणे**
**फॉरेन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र. ०८३९३०२६०**
**आयकर सवलत :- आयकराच्या कलम ८० जी प्रमाणे व १००% सवलत कलम ३५ ऐसी प्रमाणे**

**धनादेश ‘स्व’-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

# मनोगत

'विसकटलेले अवघे जीवन' या एका कर्मयोगी कवीच्या शब्दांनीच आजच्या आपल्या सामाजिक आणि व्यक्तिगत जीवनाचे यथार्थ वर्णन होऊ शकेल अशी परिस्थिती आहे. पण अशाही स्थितीत आपणा साऱ्या देशवासीयांची मान अभिमानाने उंचावेल असा शक्तीस्फोटाचा प्रत्यय आपल्या वैज्ञानिक प्रतिभेने आणून दिला आहे. आणखी आनंदाची बाब अशी की आपल्या कणखर नेतृत्त्वाने सैनिकी सामर्थ्यानिशी या वैज्ञानिक प्रज्ञेची साथ संगत केली आहे. 'स्व' रूपवर्धिनीही युवक युवतींमधील असेच कर्तृत्त्व फुलारून यावे व ते देशकारणी लागावे यासाठी गेली वीस वर्षे प्रयत्नशील आहे. या दृष्टीनेच वर्धिनीच्या सर्व कार्यक्रमांची, उपक्रमांची रचना केली जाते. कार्यक्रम-उपक्रमांमधील यंदाच्या वर्षी आयोजित केलेल्या शिबिरांचे वृत्तकथन व आसाम, अरुणाचलमध्ये कार्यरत असणाऱ्या युवतींचे अनुभव कथन नक्कीच अंतर्मुख करणारे आहे. तसेच आपण काही सकारात्मक दृष्टीने निश्चितपणे परिवर्तन घडवू शकतो याचाही प्रत्यय देणारे आहे.

''बोले तैसा चाले'' अशी वंदनीय पाऊले आज दुर्मीळ झाली आहेत. अशा वेळी साडेतीनशे वर्षांपूर्वी वैकुंठवासी झालेल्या, तुमच्या आमच्या तुकयाचं अभंगस्मरण हाच आधार वाटतो. कारण ही सारी अभंगरचना 'बुडता हे जन देखवेना डोळां' अशा समाजाबद्दल वाटणाऱ्या आर्त कणवेतून निर्माण झाली आहे. या रचनेतला शब्दन्‌-शब्द भावभक्तीनं चिंब भिजलेला आहे. तसाच मायामोहापासून अलिप्त राखलेल्या वृत्तीतून आकारलेला आहे. या थोर संत-महात्म्याला आदरांजली म्हणून याच अभंगरचनेतल्या मार्गदर्शक पंक्ती या कार्यवृत्तात प्रत्येक पानावर दिलेल्या आहेत.

# मुखपृष्ठासंबंधी थोडेसे . . .

## शक्ती - ९८ चा संकल्प

दि. ११ व १३ मे रोजी पोखरणच्या मरूभूमीत पाच अणुस्फोटांच्या चाचण्या घडवून भारतीयांनी आपल्या सामर्थ्याचाच निर्णायक परिचय जगाला दिला. संपूर्ण देशभर आनंदाची व अभिमानाची लहर उसळली. पण हे एका रात्रीत घडलेले नाही. त्यामागे हजारो भारतीय शास्त्रज्ञांचे अथक परिश्रम, नियोजनबध्द प्रयत्न आणि संघशक्तीचा उत्कट आविष्कार आहे. आणखीही एक महत्त्वाचा पैलू या घटनेला आहे. जगात शक्तीचं प्रतिक मानलं जाणारं हे अत्याधुनिक तंत्रज्ञान भारताला नाकारण्याचा प्रयत्न झाला. अनेक प्रकारांनी कोंडी करण्याचा, दडपणे आणण्याचा प्रयत्न केला गेला. हे आव्हान भारतीय शास्त्रज्ञांनी यशस्वीरित्या पेलले आणि अनंत अडचणींवर मात करून हे तंत्रज्ञान मिळवलेच मिळवले. ही जिद्द आणि ही झुंजण्याची वृत्ती आपल्यासाठी महत्त्वाची आहे. कारण त्यातूनच 'स्व'-त्वाची, 'स्व'-सामर्थ्याची जाणीव होते आणि सागर ओलांडणारी हनुमान उडी साकारते. मानवी कर्तृत्वाचा, 'स्व'-त्वाचा असा विकास 'स्व'-रूपवर्धिनीला अभिप्रेत आहे. त्याचसाठी गेली दोन दशके उपेक्षित प्रज्ञेचा, संधी नाकारली गेलेल्या बुध्दिमंतांचा शोध व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'स्व'-रूपवर्धिनीची अव्याहत धडपड सुरू आहे. ही प्रज्ञा समाजासाठी, राष्ट्रकामासाठी कामी यावी, असाच आमचा प्रयत्न आहे.

परंतु केवळ अण्वस्त्रसज्ज झाल्याने आपल्या देशासमोरचे सर्व प्रश्न मिटतील, या भ्रमात राहणे धोक्याचे ठरेल. श्रेष्ठ अध्यात्मिक वारसा जपत असतानाच भौतिक जीवनाच्या सर्व आघाड्यांवर एक राष्ट्र म्हणून आपण अग्रेसर असले पाहिजे. सर्वार्थाने समृध्द व समर्थ झाले पाहिजे.

'अविद्यया मृत्यूं तिर्त्वा, विद्ययाऽमृतं अश्नुते !' असे एक श्रुतिवचन आहे. त्यानुसार विद्येच्या साहाय्याने या जगात यशस्वी ठरू व अमरत्वाची प्राप्ती करू. त्यासाठी विविध क्षेत्रातील आव्हाने आम्हाला समजली पाहिजेत. त्यासाठी त्या त्या क्षेत्रातील प्रश्नांचा - देशप्रश्नांचा साक्षेपाने अभ्यास केला पाहिजे. त्यांच्या सोडवणुकीसाठी आम्ही आमचं कर्तृत्व खर्च केलं पाहिजे. त्यासाठी चिकित्सक वृत्तीची, उमद्या मनाची व सक्षमतेनं नेतृत्व करणारी पिढी आम्हाला घडवायची आहे. अशा युवाशक्तीच्या प्रतिभेचा व कर्तृत्वाचा स्फोट आम्हाला इतक्या जोराने घडवायचा आहे की, पोखरणच्या स्फोटांच्या आवाजही फिका पडावा. शक्ती - ९८ च्या वर्षातील हा आमचा वज्रसंकल्प आहे.

हा संकल्प सोडताना यंदाच्या स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी केलेल्या भाषणातील डॉ. शिवमंगलसिंह 'सुमन' यांची कविता मनात रूंजी घालत आहे.

> क्या हार में, क्या जीत में
> किंचित् नहीं भयभीत मैं ।
> संघर्षपथपर जो भी मिला
> ये भी सही, वो भी सही ॥

या विश्वासानेच आगामी काळात ध्येयमार्गावर, कर्तव्यपथावर आम्ही चालतच राहणार आहोत.

- श्री. संजय विष्णू तांबट

# शाखा व प्रकल्प - उपक्रम वृत्त

## संक्रांत उत्सव - शाखा विभाग

दि. २५ जानेवारी १९९८. 'स्व'रूपवर्धिनीच्या सहाही शाखांचा एकत्रित वार्षिक उत्सव. सांस्कृतिक रंगमंचीय प्रात्यक्षिके हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य. स्थान होते रमणबाग प्रशाला. वर्धिनीच्या परिवारातले सुमारे हजार पालक, हितचिंतक व स्नेहीजन या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते.

शिवछत्रपतींच्या स्फूर्तीदायी पराक्रमांचे आवेशपूर्ण दर्शन घडविणारा शाहीर पिराजी यांचा पोवाडा विवेकानंद शाखेच्या लहान गटाने सादर केला.

नव्यानेच चालू झालेल्या अभेदानंद या शाखेतील विद्यार्थ्यांनी शहीद भगतसिंग यांचे क्रांतिकारी हौतात्म्य नाट्यरूपाने सादर केले.

चाणक्य मालिकेतील अत्यंत तेजस्वी असे 'हम करे राष्ट्र आराधन' हे गीत अर्थ आणि आशयसंपन्न प्रसंग आणि मानवी कलाकृतींच्या आधारे अत्यंत प्रतिभासंपन्न अशा बॅले स्वरूपात योगानंद शाखेच्या तीस विद्यार्थ्यांनी रंगमंचावर प्रकाशमान केले.

सुबोधानंद शाखेने सादर केलेला, बालवीर शिरीषकुमारचा तिरंगी झेंड्याचे रक्षण करताना इंग्रजांविरुध्द केलेला कठोर संघर्ष प्रेक्षकातील बालवीरांना प्रेरणा देणारा ठरला.

मधूनच पाहुणे कलाकार म्हणून आलेले बालशाखेचे गोंधळीही एकनाथांचे भारूड गात रंगमंचावर अवतरले. 'येड लागलं, येड लागलं या लोकांसी येड लागलं' ! चिमुकल्यांचं हे भारुड टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात खऱ्या अर्थी प्रशंसापात्र ठरलं.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या दाहक तेजोमय अशा संपूर्ण जीवनाचे दर्शन समर्थ रामदास शाखेने प्रभावी नेपथ्य, संगीत व प्रकाश यांच्या माध्यमातून साऱ्यांसमोर उभे केले.

कमावलेली ठेवणीबध्द शरीरं, मंचावरील काळ्याकुट्ट अंधारात देखील चमचमत होती. ती हातातील ढणढणत्या मशालींमुळं ! आणि या मशाली घेतलेले विवेकानंद शाखेचे गोंधळी शिवछत्रपतींच्या भवानी मातेचा 'आई राजा उधं' असा येळकोट गर्जून गोंधळ घालत होते. विवेकानंद शाखेने सादर केलेला हा गोंधळ साऱ्यांचे भान हरपणारा ठरला.

कार्यक्रमाचा रंग अधिकाधिक वाढत असतानाच प्रेक्षकांच्या मागील बाजूने एक कर्कश आज्ञा आली 'कमांडो सावधान! दौडके चल!' अखंडानंद शाखेचे चाळीस कमांडो आपल्या काळ्याकभिन्न कमांडरमागे दौडत दौडत प्रेक्षकांमधून मंचावर येत होते. त्यांच्या दौडण्याच्या लयबध्द आवाजाने आपणही युध्द भूमीकडे दौडतो आहोत असा भास सर्वांना होत होता. तीन तीनच्या फाइलमध्ये कमांडोज मंचावर उभे राहिले. कडक सॅल्यूट झाला. आणि अत्यंत चित्तथरारक अशा कसरती दाखवून 'कमांडो

ट्रेनिंग' हा विषय अखंडानंद शाखेने सादर केला. अत्यंत चापल्याने ज्युदोचे आघात करणारे व हुकवणारे कमांडोज चकाकत्या, खणखणत्या तलवारींसह झुंजणारे कमांडोज ! उंचच उंच भिंत दोरीच्या आधारे पार करून काटेरी अडथळ्याखालून सरपटत जाऊन झळाळत्या अग्निगोलातून बिनधास्त उडी मारणारे कमांडोज ! पन्नास फूट उंचीवरील आडव्या दोरावरून साऱ्याच्या हृदयाचे ठोके चुकवत इकडून तिकडे जाणारे कमांडोज ! परेड करत रंगमंचावरून परत जाताना प्रेक्षकांकडून त्यांना मिळणाऱ्या टाळ्यांचाही नाद होता. एक - दो - एक- दो !

प्रात्याक्षिकात सरतेशेवटी रामकृष्ण शाखेच्या विद्यार्थ्यांनी शास्त्रीय दीप नृत्याच्या विलोभनीय आविष्कारांसह लंकेश रावण रचित 'शिवताण्डव स्तोत्र' सादर करून प्रेक्षकांची प्रचंड वाहवा मिळवली.

या सर्व प्रात्याक्षिकांना प्रभावी अशा संगीताचा साज चढविला होता, श्री मिलींद सबनिस सर यांनी; तर प्रकाश व्यवस्थेसह नैपथ्य, ध्वनी या साऱ्यांचे सूत्र संचालन करीत होते श्री. श्रीकांत यादव. संस्कारभारतीच्या अनेक दादा, ताईंनी संगीत, नृत्य, अभिनय यांचे मार्गदर्शन केले होते. त्यामुळेच ही प्रात्याक्षिके प्रभावी व आशयसंपन्न होऊ शकली. प्रात्याक्षिके संपली आणि मुख्य कार्यक्रम सुरू झाला.

वार्षिक परीक्षेत ८०टक्के पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या व आंतरशालेय स्तरावरील ५ स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवणाऱ्या अशा १०४ विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक व बक्षिस देऊन त्यांच्या पराक्रमाचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिध्द सामाजिक कार्यकर्ते व माजी I.A.S. अधिकारी श्री अविनाश धर्माधिकारी हे होते. आईच्या संस्कारांचे महत्व आणि जगप्रसिध्द सम्राट नेपोलियनचे त्यांनी मांडलेले झंजावाती युध्दचरित्र खरोखरीच चिरस्मरणीय असे होते. आपल्या प्रमुख भाषणात मा. रामभाऊ डिंबळे यांनी संस्कारशीलता व संघटन यांचे समाजजीवनातील महत्त्व विशद करून साऱ्यांचे उद्बोधन केले. कार्यक्रमाचा समारोप सुबोधानंद शाखेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भावस्पर्शी अशा वंदेमातरमने झाला !

दि. १८ जानेवारी १९९८ 'स्व'-रूपवर्धिनीच्या प्रकल्पविभाग, युवतीविभाग यांचा संक्रांत उत्सव आगरकर हायस्कूलच्या प्रांगणात सायंकाळी सहा वाजता आयोजित करण्यात आला होता. समारंभाचे अध्यक्षस्थान श्रीमती लीना मेहेंदळे यांनी भूषविले होते. प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती लीला पुनावाला लाभल्या होत्या.

यावेळी बालवाडी विभागाने अभिनय गीते उत्तम रीतीने सादर केली. बालशाखेने 'वेड लागले, वेड लागले' हे संत एकनाथांचे भारुड अत्यंत प्रभावीरित्या उभे केले. निवेदिता शाखेने अत्यंत आकर्षक असे दृतगती व्यायामप्रकार सादर केले. आजोळ प्रकल्पाने बारा पौर्णिमांचे दृश्यांकन उभे केले. महिला विभागाने ग्रामीण महिला जीवन जिवंत केले.

प्राचार्य अनिरुध्द देशपांडे यांचे प्रमुख वक्ते या नात्याने साक्षेपी मार्गदर्शन लाभले.

*****

## 'आमची राखी स्वदेशीची'





यावर्षीसुध्दा रुग्णालये, अनाथालये, इस्पितळां-मधील बालरुग्ण विभाग, अनेक वस्त्या, वाड्या व समाजातील विविध घटकांमध्ये जाऊन वर्धिनीयांनी रक्षाबंधन केले; पण विशेष म्हणजे यावर्षीची राखी होती स्वदेशी या विषयाला वाहिलेली. वर्धिनीच्या वतीने रक्षाबंधनाला गेलेल्या सर्वांनी; सर्व शाखा विभाग, भगिनी निवेदिता शाखा, आजोळ प्रकल्प, बालवाडी व महिला विभाग यांनी आपापल्या परिसरात ही स्वदेशीची राखी सर्वांना आग्रहाने बांधली. आणि स्वदेशी - विदेशी वस्तूंची यादी असलेले एक पत्रक घरोघरी वाटले देखील. स्वदेशी वस्तू वापरण्यातच आपल्या देशाचे हित कसे आहे हा विषय अत्यंत सोप्या पध्दतीने सर्वांना समजेल अशा भाषेत सांगितला व रक्षाबंधनानिमित्त स्वदेशीच कायम वापरणार असे अभिवचन साऱ्यांकडून घेतले. विदेशी वस्तूंच्या हव्यासापोटी भारताबाहेर जाणारे करोडो रुपये केवळ स्वदेशीचा आग्रह धरल्याने भारताच्या विकासात उपयोगी पडतील हे साऱ्यांना मनोमन पटले. वर्धिनीच्या बालमित्रांच्या आग्रहास्तव काहींनीतर प्रतिज्ञाही केली - "मी कोलगेट वापरणार नाही ! "

- "मी पेप्सी, कोकाकोला पिणार नाही ! "

## दुर्गदर्शन

'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा', असे वर्णन असलेल्या महाराष्ट्राचा मेरुमणि सह्याद्री व इतिहासातील पराक्रमांचे स्मरण देणारे त्या वरील गडकोट हे सदैव वर्धकांना आणि वर्धिकांना साद घालीत असतात. आम्ही आमच्या बहुतेक सुट्ट्या या पावन तीर्थांवर, निसर्गाच्या सहवासात व्यतीत करीत असतो. यावर्षी वर्धिनीच्या शाखांच्या सहली खालील ठिकाणी गेल्या होत्या.



१) शिवतीर्थ रायगड -

२) स्वराज्याची पहिली राजधानी - किल्ले राजगड

३) स्वराज्यातील जिंकलेला पहिला किल्ला - किल्ले तोरणगड

४) आवळे जावळे असणारे किल्ले - लोहगड व विसापूर

५) बाजीप्रभू देशपांड्यांचा - किल्ले पुरंदर आणि वज्रगड

६) खूप खूप पायपीट घडविणारी - राजमाची


सत्य संकल्पाचा दाता नारायण। सर्व करी पूर्ण मनोरथ ।

७) अत्यंत दुर्गम व अवघड असा - ढाकचा भैरी
८) पन्हाळा ते विशाळगड असे स्मरणीय पदभ्रमण
९) नित्य आनंद देणारी कार्ले व भाजे लेणी
१०) दारासमोर उभा असणारा नित्याचाच - किल्ले सिंहगड

या किल्ल्यांची सफर करताना मन ३००/४०० वर्षांपूर्वीच्या इतिहास काळात जाऊन दाखल होतं. पुरंदरच्या माचीवरील दोन्ही हातात दांडपट्टे चढविलेला दिलेरखानाच्या वतनावर थुंकणारा बाजीप्रभु देशासाठी समाजासाठी कोणत्याही प्रकारच्या अमिषाला दूर भिरकवण्याची प्रेरणा सर्वांना देत असतो. निसर्गाच्या सहवासातील ही भ्रमंती खूप काही देऊन जाणारी व चित्तवृत्ती उल्हासित करणारी अशीच असते.

दुर्गभ्रमंतीत नंदादीप शाखाही मागे राहिली नव्हती. जानेवारीत लोहगडावर शाखेची सहल गेली होती. लोहगडाचा पराक्रमाचा इतिहास सर्वांच्या मनात प्रेरणा जागवून गेला.

****



## १५ ऑगस्ट १९९८

प्रत्येक वर्षी स्वातंत्र्यदिनानिमित्त वर्धिनीच्या शाखांचा कार्यक्रम बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयामध्ये संपन्न होतो. यावर्षी नेहमीच्या क्रीडा प्रात्यक्षिकांबरोबरच धावणे, लांबउडी व जोर मारणे या वैयक्तिक नैपुण्य स्पर्धांनी मैदान विभाग दणाणून गेला होता. राष्ट्रध्वजाला मानवंदना दिल्यानंतर ध्वजावतरण झाले. ज्ञानदा प्रतिष्ठानचे कार्यवाह मा.श्री. मोहनराव अळवणी यांच्या अध्यक्षतेखाली पुढील कार्यक्रमाला सुरुवात झाली. वर्धिनीच्या परिवारात गतवर्षापासून सुस्थापित झालेल्या नवीन दोन शाखांचा नामकरणविधी पूजनीय आचार्य किशोरजी व्यास यांच्या आशीर्वचनाने साजरा झाला. गोखलेनगर भागातील शाखेचे 'स्वामी अभेदानंद' तर शनिवार पेठेतील शाखेचे 'स्वामी योगानंद' असे नामकरण या प्रसंगी करण्यात आले. स्वामी विवेकानंदांच्या या दोन्ही गुरूबंधूंचे प्रेरणादायी चरित्र आचार्य किशोरजींनी आपल्या प्रभावी वाणीने श्रोतृवृंदासमोर उभे केले. भगवान रामकृष्णांच्या या प्रिय अंतरंग शिष्यांचा सेवा आणि साधनेच्या मार्गातील ओघवता जीवनपाठ वर्धिनीच्या सर्व कार्यकर्त्यांना ध्येयमार्गाचे दर्शन घडविणारा असाच होता!

* * *

*With Best Compliments From :*

**GURUPRASAD TRANSPORT**

156 Mangalwar Peth, Parge Chowk,
Barne Road, Pune - 411 011. Phone - 627260

**• All types of Transport Service** **• All over Maharashtra**




## गणेशोत्सव जाणवणारा.... भावणारा... उमगणारा..

सायंशाखेवरील दैनंदिन खेळ म्हणजे मुलांचा जीव की प्राण ! पण त्याचाही महिनाभर त्याग करून मुले झांज लेझिमीच्या तयारीत उत्साहाने दंग राहतात. नेत्रदीपक, दमदार असा खेळ पुण्यनगरीत सादर करतात.

दिवसभराचे रणरणते उन व अवेळी कोसळणारा पाऊस यांची पर्वा न करता वर्धिनीचा समस्त पालकवर्ग हातात हात गुंफून, मानवी साखळीच्या रुपात मिरवणुकीच्या संरक्षण व्यवस्थेत दिवसभर हसतमुखाने आणि स्वेच्छेने सहभागी असतो.

स्वतःच्या उद्योग व्यवसायातील व्यस्ततेमुळे वर्धिनीच्या दैनंदिन कामात वेळ देण्यास असमर्थ असे युवक कार्यकर्तेसुध्दा गणेशोत्सवात मात्र सर्व वैयक्तिक कामे बाजूला ठेवतात. प्रात्यक्षिक साहित्याची खरेदी, नवीन वादकांना ढोल-ताशांच्या तालांचे प्रशिक्षण, गणेशोत्सव मंडळांशी संपर्क, प्रत्यक्ष मिरवणुकीचे वेळी सर्व व्यवस्थांचा समन्वय अशी महत्त्वपूर्ण शक्तीबुध्दीची कामे ही मंडळी तहानभूक विसरून दहाही दिवस करत असतात.

पंचाहत्तरी ओलांडलेले मा. किशाभाऊ, सत्तरी ओलांडलेले मा. पुरुषोत्तमभाई, दाते सर, दि.दा. जोशी सर यांसारखे वर्धिनीचे अनेक ज्येष्ठ-श्रेष्ठ मार्गदर्शक मिरवणुकीतील प्रचंड आवाज, धूळ, गुलाल, गर्दी-गोंधळ यांपासून होणाऱ्या शारीरिक त्रासाकडे दुर्लक्ष करून मुलांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्यासाठी व स्वतःच्या उपस्थितीने कार्यकर्त्यांना उत्साहीत करण्यासाठी या महासोहळ्यात संपर्करत असतात.

हे सारं कशासाठी ? कुणासाठी ?

लोकमान्यांना अभिप्रेत असलेल्या आणि आजही तीव्रतेनं आवश्यकता असलेल्या लोकोत्सवाच्या माध्यमातून साधावयाच्या विधायक लोकसंघटनासाठी !

गणेशोत्सव ! विधायक लोकसंघटनेसाठी लोकमान्यांनी संस्थापिलेला सार्वजनिक लोकोत्सव!

या आनंदसोहळ्याची (सुरुवात आणि सांगता) वाद्यांच्या गजरात, गणरायाच्या मिरवणुकीने होत असते.

ढोल ताशांचा ढणढणाट, झांज लेझिमीचा खणखणाट, भगवत्ध्वजधारी शेकडो गणांचा तालबध्द थयथयाट! या ताला-सुरांच्या जत्रेत विरुन जाण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून बंधुगणांचे पाय पुण्याकडे ओढ घेतात.

यावर्षी गणेशचतुर्थी व अनंत चतुर्दशी या दोन्ही दिवसांत मिळून वर्धिनीच्या एकूण तेरा पथकांनी पुण्यातील आठ नामवंत गणेशोत्सव मंडळांच्या मिरवणुकांमध्ये आपला शिस्तबध्द खेळ सादर केला.

वर्धिनीचे ४० ढोलवादक, २० ताशावादक व लेझीम, झांज, टिपऱ्या, भगवे ध्वज हातात घेऊन आकर्षक तालबध्द प्रकार सादर करणारे ५५० वर्धक- वर्धिका या सर्व पथकांमध्ये सामील झाले होते. श्री. अजित नाईक हे महाव्यवस्थापक या नात्याने सर्व रचनांना व व्यवस्थांना मार्गदर्शन करीत होते या मिरवणुकांतील कार्यक्रमांचा तपशील पुढील तक्त्यांत देत आहे.

| गणेशोत्सव मंडळ | सहभागी शाखा | प्रात्यक्षिकाचा प्रकार | प्रात्यक्षिक प्रमुख |
|---|---|---|---|
| | **गणेश चतुर्थी** | | |
| १) श्री जिलब्या मारुती मंडळ | अखंडानंद शाखा | झांज पथक | दत्तात्रय सकट |
| | अखंडानंद शाखा | टिपरी पथक | नितीन पलांडे |
| | युवक विभाग | ध्वजदल | शिरीष अडके |
| २) एकता तरुण मित्रमंडळ, सहकारनगर | युवतीविभाग | ध्वजदल | दीपाली पवार |
| | सुबोधानंद शाखा | झांजपथक | रमेश पिवळकर |
| ३) पोलिसलाईन मित्रमंडळ, रास्तापेठ | निवेदिता शाखा | झांज पथक | सुरेखा माळी |
| | रामकृष्ण शाखा | टिपरी पथक | शैलेश पैलवान |
| ४) विजय मित्रमंडळ, सोमवार पेठ | युवक विभाग | ध्वजदल | राजेश देशमुख |
| | विवेकानंद शाखा | झांज पथक | प्रवीण विटकर |
| ५) साळुंके विहार मित्रमंडळ, कोंढवा | योगानंद शाखा | झांजपथक | सुमीत डोळे |
| | योगानंद शाखा | लेझीम पथक | सुरेंद्र खेडकर |
| ६) नवचैतन्य मित्रमंडळ, महात्मा गांधी मार्ग | आजोळ | झांज, टिपरी | छाया गायकवाड |
| | अभिमन्यु बालशाखा | रुमाल पथक | मनीष रासने |
| | **अनंत चतुर्दशी** | | |
| १) तुळशीबाग मित्रमंडळ | अभिमन्यु बालशाखा | रुमाल पथक | मनिष रासने |
| | आजोळ | झांज, टिपरी | छाया गायकवाड |
| | निवेदिता शाखा | झांज पथक | सुरेखा माळी |
| | योगानंद शाखा | झांज पथक | सुमीत डोळे |
| | योगानंद शाखा | लेझीम पथक | सुरेंद्र खेडकर |
| | युवक विभाग | ध्वजदल | राजेश देशमुख |
| २) एकता तरुण मित्र मंडळ | विवेकानंद शाखा | झांज पथक | प्रवीण विटकर |
| | रामकृष्ण शाखा | टिपरीपथक | शैलेश पैलवान |
| | अखंडानंद शाखा | झांज पथक | नितीन पालांडे |
| | युवती विभाग | ध्वजदल | दीपाली पवार |
| ३) श्री जिलब्या मारुती मंडळ | अखंडानंद शाखा | ध्वजदल | दत्तात्रय सकट |
| | सुबोधानंद शाखा | झांज पथक | रमेश पिवळकर |
| ४) श्रीमंत दगडूशेट हलवाई गणपती | रामकृष्ण शाखा | झांज पथक | संतोष लोखंडे |
| | युवक विभाग | ध्वजदल | पंकज मुंडे |

# "सुंदर अक्षर घडण्यासाठी नित्य साधना करुया सारे !"

वर्धिनीच्या परिवारात आपल्या सुंदर हस्ताक्षर कौशल्य अध्यापनामुळे सर्वांचे प्रिय झालेले हस्ताक्षर महर्षी श्री नानासाहेब लाभे हे याही वर्षी नोव्हेंबर महिन्यात नागपूरहून पुण्यास आले होते. सर्व शाखा, प्रकल्प व परिवारातील शाळांमध्ये जाऊन हस्ताक्षर सुधारणा मंत्रांची आवर्तने त्यांनी याही वेळी उत्साहाने पार पडली. हस्ताक्षर सिध्दीचे वरदान मुलांना देत असतानाच प्रेरणादायी राष्ट्रीय विचारांचे रोपण विदयार्थ्यांच्या मनात करण्याची नानांची हातोटी विलक्षण आहे. मा. नानांच्या हस्ताक्षर सिध्दांताची ओळख त्यांच्याच हस्ताक्षरात येथे देत आहोत. आज वयाच्या त्र्याहत्तराव्या वर्षीही त्यांचे अक्षर असे आहे.

## अक्षर सूत्रे

मुलांनो अक्षरसूत्रें लक्षात ठेवा.

१) अक्षरातील उभी रेषा अगदी सरळ असावी.
२) रेषा मोठी - अन्य रेषा लहान.
३) रेषा मोठी - गोल अर्ध गोल लहान.
४) रेषा मोठी - मात्रा उकार सारे लहान.
५) अ) दोन वर्णात अंतर - रेषेच्या जाडी येवढे.
- निपेच्या टोका येवढे.
ब) दोन शब्दात अंतर - रेषेच्या उंची येवढे.
(करांगळी टोका येवढे)
क) दोन ओळीत अंतर - रेषेच्या उंचीच्या दुप्पट.

लक्षात ठेवा :-

१) रेषेचे सारे अवयव रेषेच्या निम्मे असावेत. मात्रा, वेलांट्या, उकार ही सारी विकार चिन्हे अक्षर उंचीच्या निम्मेच असावीत.
२) गोल अर्धगोल नावाप्रमाणेच अगदी गोलच काढावी. रेषेच्या प्राय: निम्मेच व्यासाची असावी. जेथे एका खाली एक गोल असतील तेथे त्यांचा व्यास त्या मापात कमी करावा.
३) गोल अर्ध गोलांचे जोड प्राय: रेषेच्या मध्यावर असतात.
४) अर्धगोल ज्या दिशेने वळला असेल त्या दिशेने वरून खाली हात जावा.
५) रेषा वरून खाली ओढावी.
६) मात्रेला बिंदुमार द्यावा.
७) शिरोरेषा शब्दाशब्दावरून अखंड रेषा न वळता द्यावी.

काही नित्यनेमावीण । अन्न खाय तोची श्वान । वाया मनुष्यपण । भार वाहे वृषभ तो ॥

# अक्षर स्वस्थ सुधरतं का हो ?

हो तर! केवळ सुधरतंच नाही तर सुंदर होतं, सुवाच्य होतं व सुबक होतं. एवढंच नव्हे वेगानंही लिहिता येतं! काही सुद्धा कठीण नाही.

हे बघा. अक्षराला एक उभी सरळ रेषा असते. ती अक्षराची उंची दर्शविते. ही रेषा अक्षराचं शरीर समजा. शरीर कसं उभं राहतं? सरळच की नाही? तुम्ही आम्ही सारेच सरळ उभे राहतो. मग रेषा शरीरानं कसं उभं राहायला हवं? सरळच की नाही?

मी जर सरळ उभा राहतो तर माझ्या रेषा शरीरानं वाकडं का उभं राहावं?

'मी सरळ - माझी रेषा सरळ'

हे एक सुन्दर, सहज लक्षात राहणारं सूत्रच झालं नव्हे एक अत्यंत प्रभावी मंत्रच झाला आहे असं समजा.

आपण लिहितो तेव्हा हजारो उभ्या सरळ रेषा लिहितात. त्या प्रत्येक वेळी 'मी सरळ - माझी रेषा सरळ' हा मंत्र जर मनात जागृत राहिला तर माळ हाती न घेता, व उच्चार न करताही सहज मंत्र जप होईल, अक्षर सुरेख होईल व या अमोघ जपानं आपलं जीवनही सुन्दर होईल.

म्हणूनच श्री समर्थांनी 'सरळे' शब्द वापरला आहे.

हे बघा. शरीराला अवयव असतात. शरीर मोठं - अवयव लहान हे तर निसर्गाचंच सूत्र आहे. रेषा शरीरालाही अवयव असतात. रेषेला अक्षराचा आकार देणारी व अक्षराला चालविणारी सारी विकार चिन्हं त्या रेषा शरीराचे अवयवच झालेत. 'शरीर मोठं - अवयव लहान' या सूत्राप्रमाणे 'रेषा मोठी - सारी चिन्हं लहान' हे झालं अक्षर सूत्र.

आणि हे बघा शिरोरेषा शब्दाशब्दावरून भरवंड जायला हवी. एका दिशेला जाणारी असावी.

गोल, अर्धगोल, अन्य रेषा, मात्रा, वेलांट्या, उकार आदी सारी चिन्हं उभ्या सरळ रेषे पेक्षा लहानच असावी. किती लहान? तर रेषेच्या निम्मेच लहान!

शरीर कसं असावं? वाटोळं, सुडौल. अक्षर शरीरही वाटोळं व सुडौल असावं. यासाठी समर्थांनी 'वाटोळे' हा शब्द वापरला आहे. शरीर सुडौल - अक्षर सुडौल.

आपण रांगेत कसं उभं उभं राहतो? रांगा कशा असतात? दूर दूर. समर्थांनी यासाठी 'मोकळे' हा शब्द वापरला आहे. एका शब्दातील वर्ण रेषेच्या जाडीएवढा दूर असावा ही जाडी लिपेच्या टोका येवढी असते. हे pen पेन समजावे. तसेच दोन शब्दात अंतर रेषेच्या उंची येवढं. (करांगळीच्या टोका येवढं.)


# अक्षर आणि व्यक्तित्व

काढा अक्षर रे सदाच सरळे स्वामी स्वये सांगती
ना वाको मुळीही नभास भिडली रेषा असो सन्मती
ऐसे अक्षर हो सदैव सरळे ना वाक कोठे तरी
राही सुंदर यात संशय नसे खात्री असो अंतरी ॥१॥
रेषा जाण धरा शरीर असते रे अक्षराचे पुरे
चिन्हे सर्वचि जेहि लागत असे तीचेच ते भाग रे
मोठी राहि तनू लहान अवयव हा प्रकृतीचा गुण
रेषा मोठि लहान चिन्ह असती ही अक्षराची खुण ॥२॥
रेषा कोणि नसे स्वयेच असतो स्वत्वास तीते भरा। राही निश्चय मानसी कठोर दृढता निर्धार चित्ती धरा
जैसा जावनि मीच नित्य सरळे मम । राहो मंत्र पुरा मनात भरूनी हो चित्त रे निर्मम ॥३॥
वाटोळे नि सुडौल गोल असु द्या रे आपुले अक्षर । स्वामी सांगति स्वच्छ पोटतिडके व्हावे कसे सुंदर
वाटोळे नि सुडौल लक्षण असे ते चांगल्या व्यक्तिचे । जी हो सुदृढ व्यक्तिमत्व जगते हो श्रेष्ठ सर्वामते ॥४॥
वाटोळे बलदंड सूचक असे निर्देश दे स्वामी दे । घ्यावा बोध स्वये पुराच धरूनी जो जीवना सौख्य दे
राहो अक्षर वाटुळे तनु तशी. व्यक्तित्व आकार घे । लोकी मान सुकिर्ति वैभव मिळे ना काहि कोठे नडे ॥५॥
काढा अक्षर मोकळे. न जवळी जाणोनि स्वामी म्हणे
ठेवा अंतर सारखे मनि धरा जाणीव, ना हो उणे
तैसे लक्षण मोकळे परि असे ते अंतराचे खरे
ठेवा अंतरि, अक्षरासम सुखे, चारित्र्य नांदे पुरे ॥६॥
अर्धे ओळिमधील तेहि स्वच्छ द्या ते अक्षरालागुनी । अर्ध्यामाजिहि पाव पाव स्थळ द्या मात्रा उकारा झणी
अर्धा पाव नि पाव हे प्रमाण असते वा अक्षरीउंचिला । जाणोनी परिशिष्ट लेखन करा ये रंग त्या वेगळा ॥७॥
रेषा-उंची असेच अंतर असो ते शब्द शब्दातही । जाडी अंतर ध्यानपूर्वक असो ते वर्णवर्णातही
शब्दांचे वरती अखंड असु द्या रे शीर्ष रेषा पुरी। होई अक्षर डौलदार कथितो व्यक्तित्व तैसे परी ॥८॥
वाटोळे सरळे स्वरूप प्रभुचे ते मोकळे सुन्दर
घ्यारे दर्शन अक्षरात प्रभुचे स्वामी कृपा सत्वर
काढा अक्षर त्यानुसार अगदी स्वामी स्वरूपी रमा
स्वामी दर्शन लीहिण्यातुन तुम्हा होई सदा त्या नमा ॥९॥
रेषा श्री प्रभुची तशीच तुमची राहो समानान्तर
रेषा ह्या प्रभुरूप होत जिवनी आनंद ये सत्वर
स्वामी दर्शन नित्य होत जवळी ऐसे लिखाणातुनी
चित्ता जाणिव ध्यान घ्यास असु द्या मुक्ती मिळे जीवनी ॥१०॥
घ्यावे दर्शन अक्षरी गुरूचिये स्वामी समर्थाचिये । काढा अक्षर वाटुळे सरळ ही ते मोकळे जाणिवे
स्वामी अक्षररूप धारुनि सदा ते राहती सोबती । होई मोद मना अपार सुखही सांगू तुम्हाला किती ॥११॥

दया तिचे नाव । भूतांचे पाळन । आणिक निर्दालन कंटकाचे ॥

## पाकोळीच्या भराऱ्या

गेल्या १० वर्षांपासून पाकोळी बालवाडी विभाग चालू आहे. नवनव्या गोष्टी, साधने, कल्पना यांची दरवर्षी या विभागात भर पडतच असते. मुलांना सतत नवीन काही मिळावे व त्यातून त्यांच्या गुणांचा विकास व्हावा, त्यांची पंचज्ञानेंद्रिये जागृत व्हावीत व त्याची कार्यक्षमता कळावी असाच यामागे उद्देश असतो. यावर्षीही असे काही नवे प्रयोग केले. त्यातील एक प्रयोग म्हणजे या विभागातील सर्व शिक्षिकांना घेऊन निरनिराळ्या शाळांना, तेथील बालवाड्यांना भेटी दिल्या. त्या - त्या ठिकाणचे तक्ते, पाठ, साधने पाहून सर्व शिक्षिका उत्साहित झाल्या. आपणही असे काही तरी करावे असे त्यांच्या मनात येऊ लागले. पण त्यांच्यापुढे एक प्रश्न होता. इतर शाळांमध्ये पाहिले त्याप्रमाणे सुशोभन करावयाचे कोठे? पण मग एक स्वतंत्र वर्ग त्यासाठी उपलब्ध केला. त्यात साधने मांडली जाऊ लागली. आळीपाळीने सर्व वर्गातील मुलांना या खेळण्यांशी मनमुराद खेळायला मिळू लागले. त्याचे परिणामही चांगले दिसत आहेत. त्यातील एक अनुभव असा - एका छोट्या मुलीने कणिक भिजवली. त्या कणकेची भाकरी थापली. तवा मिळेना. तिने मग एका



पाटीच्या तुकड्याचा तवा म्हणून उपयोग करून तिच्या कल्पनेतील भाकरी त्यावर शेकली.

शिक्षिकांचा लळा मुलांना इतका लागतो की बाईंचा सहवास एकही दिवस मिळाला नाही तर मुले अस्वस्थ होतात. या संदर्भातही खूप वेळा नव-नवे अनुभव येतात, त्यातील काही . . .

- ✡ दिवाळीच्या सुट्टीत खूप आठवण येते म्हणून २ विद्यार्थी आपल्या पालकांच्या सोबत त्यांच्या शिक्षिकेच्या घरी गेले. बाईंना भेटल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव उमटले.
- ✡ पाय मोडल्यामुळे घरी रहायला लागलेल्या एका मुलाने बाईंकडे घेऊन चला असा पालकांकडे रोज हट्ट केला.
- ✡ दिवाळीच्या सुट्टीनंतर पहिल्याच दिवशीची उपस्थिती ८० टक्क्याहून अधिक होती.


**With Best Compliments From :**

**ASHA CONSTRUCTION COMPANY**

Surekha Apartments, Opp Octroi Naka,

Pune – Satara Road, Pune 411 009.

☎ 461112, 469322

# "असे वक्ते - अशी व्याख्याने"

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगातील अनेक प्रकारच्या माहितींचा केवळ डोक्यात साठाकरून ठेऊन काय उपयोग? त्या माहितीची चिकित्सक बुध्दीने छाननी करण्याची व त्यातील नेमके तेच उचलण्याची सवय मनाला असणे आवश्यक आहे. यासाठीच अनेकविध क्षेत्रांचा अभ्यास मांडणारी, राष्ट्रीय समस्यांचा विचार करावयास लावणारी अनेक विविध विषयांवरील व्याख्याने दर रविवारच्या साप्ताहिक युवक बैठकीत होतात. यावर्षीची अशीच काही व्याख्याने आणि त्यांचे व्याख्याते यांचा परिचय खालीलप्रमाणे :-

१) श्री. बद्रीमूर्ती - सामाजिक कार्य आणि व्यवस्थापन कौशल्य
२) श्री. आनंद लेले - आग्नेय आशियातील आर्थिक संकट
३) सौ दाते - अध्यात्म, नामस्मरण व साधनेचे महत्त्व
४) श्री. ह.वि. दात्ये - सूर्यनमस्कार अभियान प्रांगणिय संगीत
५) श्री. विवेकजी पोंक्षे - प्रवासद्वारा समृध्द अनुभवविश्व
६) श्री. माधवराव परळकर - प.पू. श्री. गुरुजी
७) श्री. उत्तमराव कानिटकर - पांचजन्यचा सुवर्णमहोत्सव
८) श्री. सुभाषराव इनामदार - समृध्द आणि एकसंध जर्मनी
९) श्री. विजय स्वामी - अरुणाचल प्रदेशाची सांस्कृतिक ओळख
१०) श्री.प्रदीप कुरुलकर - पोखरणमधील अणुस्फोट
११) श्री. प्रभाकर व्हावळे - तरूणांसाठी योग अभ्यास
१२) श्री. चंद्रकांत कार्यकर्ते - व्यक्तिमत्व विकास
१३) श्री. श्रीहर्ष सगरे - Made in Japan पुस्तकाचे परीक्षण.
१४) श्री. किरण पाटोळे व मित्रमंडळ - सरहद्दीवरील अनुभव (सरहद्द संस्थेचे कार्यकर्ते)
१५) डॉ, प्रभाकर देवरे - प्राणी व त्यांच्या सवयी
१६) कॅप्टन सनत् भाटे - काश्मिर - एक सद्यस्थिती
१७) श्री. राजाभाऊ लवळेकर - 'नवरात्र'
१८) श्री. विलासराव पोतनीस - 'करूया मैत्री गणिताशी'
१९) श्री. जीवनसिंग - आपला पूर्वांचल
२०) श्री. प्रभाकर व्हावळे - आरोग्य आणि योगाभ्यास
२१) श्री. मिलिंद जोशी - क्रीडा क्षेत्राद्वारे मिळणारी संधी
२२) श्रीमती काणेबाई - शास्त्रीय संगीताची तोंडओळख.
२३) श्री. प्रदीपराव आगाशे - यशस्वितेची सूत्रे.
२४) श्री. जयंतराव कवठेकर - भाषाविकास व रसग्रहण
२५) श्रीमती अभयाताई टोळ - अभ्यास कौशल्ये
२६) श्रीमती विद्याताई बापट - बाल्य आनंदाचे, समृध्द आकांक्षांचे

# दैनंदिन शाखांवर वर्षभरात चालणारे कार्यक्रम

वर्धिनीच्या सर्व शाखांचे दैनंदिन काम तीन तासांचे असून यामध्ये एक तास खेळ व दोन तास अभ्यास मार्गदर्शन तासिका घेतल्या जातात. या व्यतिरिक्त सर्व शाखांवर वर्षभर सतत लहानमोठे कार्यक्रम चालू असतात. दिवाळी व उन्हाळी सुटीत होणाऱ्या निवासी शिबिरांव्यतिरिक्त पुढील उपक्रम शाखा विभागात चालू आहेत.

१) मानसिक विकास बैठक - दर रविवारी सकाळी ६.१५ वा.
२) साप्ताहिक व्याख्यान सत्र
३) गटकार्ये
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर व पाणपोई
५) दिवाळी फराळ वाटप कार्यक्रम
६) रक्षाबंधन
७) आकाशदर्शन
८) गिरीभ्रमण
९) पालकसभा
१०) वर्षप्रतिपदेला सामूहिक उपासना
११) साप्ताहिक ग्रामशाखा
१२) गुरूपौर्णिमा
१३) सामाजिक व अन्य समाजोपयोगी संस्थांना भेटी
१४) सार्वजनिक गणेशोत्सवात सहभाग
१५) स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिनानिमित्त एकत्रीकरणाचे कार्यक्रम
१६) कोजागिरी पौर्णिमा
१७) शाखावर्धापनदिन कार्यक्रम
१८) गुणवंत विद्यार्थ्यांसाठी कौतुक समारंभ
१९) दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यास मार्गदर्शन शिबिरे, परीक्षा मार्गदर्शन वर्ग, अभ्यासपूर्व नियोजन शिबिर
२०) १०वी, १२वी मधील विद्यार्थ्यांसाठी शुभेच्छा कार्यक्रम
२१) दहिहंडी, भोंडला
२२) राष्ट्रनेत्यांची जयंती व पुण्यस्मृती-दिनानिमित्तचे कार्यक्रम
२३) कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण वर्ग
२४) कार्यकर्त्यांसाठी साप्ताहिक बैठक (शाखास्तरावर)
२५) कार्यकर्त्यांसाठी साप्ताहिक बैठक ( एकत्र कार्यक्रम)
२६) प्रेरणादायी व माहितीपूर्ण चित्रपट व पारदर्शिका दाखविण्याचे कार्यक्रम
२७) वार्षिक नियोजन बैठक (शाखास्तरावर व केंद्रीय स्तरावर)
२८) अभ्यासपूरक कौशल्य प्रशिक्षण वर्ग (वाचनवेग वृध्दी, निरीक्षण कौशल्य, हस्ताक्षर इ.)
२९) संस्था वर्धापनदिन कार्यक्रम
३०) संक्रांत उत्सव
३१) व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे (गटशः पाचवी ते सातवी व आठवी ते बारावी)
३२) शाखांतर्गत स्पर्धा (पद्य पाठांतर, क्रीडा, झांज, लेझिम पथके, प्रसंगनाट्य इ.)
३३) वाढदिवस शुभेच्छा
३४) सर्व विद्यार्थ्यांच्या घरांशी नित्य संपर्क

## शारदामणी महिलाविभागांतर्गत चालू असलेल्या प्रकल्पांचा १९९८ मधील धावता आढावा

या विभागांतर्गत सध्या खालील प्रकल्प चालू असून त्यांची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे -

१) **माता बाल संगोपन केंद्र :-** के.ई.एम. रुग्णालयाच्या सहकार्याने गेल्या पाच-सहा वर्षांपासून हे केंद्र चालू असून या केंद्राचे काम आठवड्यातून दोन दिवस चालते. केंद्राच्या वैद्यकीय सेवेचा लाभ दर आठवड्याला सुमारे १०० रुग्णांना होतो.

२) **कौटुंबिक सल्ला केंद्र :-** भारतीय स्त्री शक्ती जागरण या संस्थेच्या सहकार्याने आठवड्यातून एक दिवस हे केंद्र चालते. ॲड. निलिमाताई गोखले या केंद्राचे काम पाहतात. महिलांबरोबर पुरुषांनाही या केंद्रातून सल्ला मिळतो. सध्या सुमारे चाळीस तक्रारींच्या संदर्भात प्रामुख्याने समेटासंबंधी व काही प्रकरणी घटस्फोटासंबंधी कार्यवाही चालू आहे.

३) **साक्षरता वर्ग :-** मुस्लिम महिलांसाठी मराठी भाषा शिकविण्याचा वर्ग तसेच अन्य निरक्षर महिलांसाठी प्रौढ साक्षरता वर्ग असे दोन वस्त्यांमध्ये मिळून आठ वर्ग चालू आहेत. प्रत्येक वर्गाची सरासरी उपस्थिती पाच ते सहा असते.

४) **बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग :-** गेल्या वर्षी या वर्गातून पंधरा बालवाडी शिक्षिका प्रशिक्षित झाल्या. वर्धिनीत चालणारा हा वर्ग एक वर्ष कालावधीचा असून सर्व प्रशिक्षणार्थींना दररोज सप्रात्यक्षिक प्रशिक्षण मिळते. सध्या या वर्गात चौदा विद्यार्थिनी आहेत. अभ्यासक्रमाबरोबरच यावर्षी येरवडा जेलमधील महिला कैदी विभाग, अपंग कल्याणकारी संस्था, सासवड येथील अनाथाश्रम अशा ठिकाणी भेटी झाल्या.

५) **लोकर वीणकाम वर्ग :-** मशीनच्या सहाय्याने लोकर वीणकाम वर्ग आठवड्यातून एक दिवस चालू आहे. सध्या पाच महिलांना याचा लाभ मिळत आहे.

६) **शिवणवर्ग :-** १९९१ पासून हा सहा महिने कालावधीचा वर्ग चालू असून या वर्गाबरोबरच महिलांच्या नव्या लोकप्रिय पध्दतीच्या कपड्यांसाठीचा वर्गही चालू आहे. आत्तापर्यंत १०० च्या वर महिलांनी हा शिक्षणक्रम पूर्ण केला आहे. घरबसल्या या कलेच्या सहाय्याने ५० टक्के महिलांनी तरी स्वतःचा उद्योग सुरू केला आहे. घरबसल्या दिवसाला किमान १०० रु. मिळवणाऱ्या महिलांची संख्याही उत्साहवर्धक आहे. यातूनच काही महिलांनी एकत्र येऊन ब्लाऊज विक्रीचा व्यवसाय चालू केला आहे.

७) **रुग्ण परिचर्या (होम नर्सिंग)शिक्षणवर्ग:-** या अभ्यासक्रमाचा लाभ आत्तापर्यंत किमान ४०० महिलांनी घेतला असून वर्ग पूर्ण केल्यावर अशा प्रशिक्षित महिलांना काम मिळण्याचे प्रमाण खूप चांगले आहे. अशा प्रशिक्षित महिलांची सध्या किमान कमाई दिवसाला ६०/- रू. इतकी आहे. हा अभ्यासक्रम सहा महिने कालावधीचा असून यातील एक महिना प्रशिक्षणार्थी महिलांना रुग्णालयात प्रत्यक्ष कामाचा अनुभव दिला जातो. सध्या या अभ्यासक्रमासाठी सुमारे दहा महिलांचे प्रशिक्षण चालू आहे.

# शिबिरे - १९९८

अहो, आपल्या घरगुती लग्नसमारंभांची धांदल आठवा बरं! पाहुणे-रावळे, घोडा-वाजंत्री, आचारी, भटजी, आगत-स्वागत, रुसवे-फुगवे, किती धांदल, किती गडबड! शिबिर म्हणजेही असेच एक मोठे पारिवारिक कार्य असते. आणि दोन-तीनशे छोटी वऱ्हाडी मंडळी यात धुमाकूळ घालीत असतात. अशा मंडळींना पाच-सहा दिवस शिस्तीत वागवून शिबिरातील सर्व कार्यक्रमांमध्ये सामावून घ्यायचे म्हणजे थोडे का कसब अंगी लागते?

पण अशा धडपडीतूनही उभ्या राहिलेल्या प्रेरणादायी शिबिरांचा हा वृत्तांत

### १) व्यक्तिमत्व दर्शन शिबिर

(२३ एप्रिल ते २८ एप्रिल १९९८)

'विकसित व्हावे अर्पित होऊनी जावे' हे 'स्व'-रूपवर्धिनीचे बोधवाक्य आहे. विविध क्षेत्रात ठसा उमटविलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींचा प्रत्यक्ष सहवास जर विद्यार्थ्यांना मिळाला तर विकसित व्यक्तिमत्व म्हणजे नेमके काय हे वेगळे सांगावेच लागणार नाही. अशा कर्तृत्ववान माणसांचे अनुभव हे बरेच काही शिकवून जातात. गेल्या वर्षी समाजाच्या विकासाचा ध्यास घेऊन निरलसपणे समाजसेवा करणाऱ्या १८ विविध संस्थांच्या कामाचा व्याप व समाजाला त्याची असलेली आवश्यकता हे शिबिरार्थी विद्द्यार्थ्यांनी अनुभवले होते. या वर्षी २३ ते २८ एप्रील ९८ या कालावधीत संशोधन, शिक्षण, क्रीडा नाट्य-अभिनय, उद्योग,सैन्यदल, वैद्यकीय, सामाजिक,




पत्रकारिता, पर्यावरण अशा विविध क्षेत्रातील पुढील नामवंत व्यक्तींच्या मुलाखती सुमारे १०० विद्यार्थ्यांनी घेतल्या.

१) डॉ. पी.व्ही. जोशी २) श्री. विलासराव पोतनीस ३) श्री. म.गं.पटवर्धन ४) श्रीमती विजयाताई लवाटे ५) श्री. श्रीकांत भोजकर ६) सौ. स्वातीताई गाडगीळ ७) श्री. उदयराव गुजर ८) श्री. पुखराजजी जैन

९) श्री. पी.व्ही श्रॉफ १०) श्री. श्रीकांत सामळ ११) श्री. भास्करराव गद्रे १२) श्री. चिंतामण स. काळे १३) प्रा. श्री. सुरेशराव परचुरे १४) श्रीमती विद्याताई बापट १५) श्री. य.शं.लेले १६) श्री. मुरलीधर गोडसे १७) श्री. प्रदीप आगाशे १८)श्री. दि.दा.जोशी १९) श्री. ना.पं. तथा नाना जोशी २०) श्री. जयंतराव कवठेकर २१) श्री. पद्माकर वझे २२) प्रा.श्री. शरद वाघ २३) श्री. किशोर भावे २४) श्री. किशोर करमरकर २५) श्री. प्रकाश पारखी २६) कर्नल दिवाण २७) डॉ. प्रभाकर देवरे २८) श्री. रमेश

जोशी २९) श्री. प्रमोद रावत ३०) श्री. मोहनराव अळवणी ३१) लेफ. जनरल अशोक जोशी ३२) श्री. मंगेश तेंडुलकर ३३) श्री. माधवराव मेहेंदळे ३४) श्री.वसंतराव कानिटकर ३५) प्रा.डॉ.वसंतराव पुणतांबेकर ३६) श्री.श्रीधरपंत फडके ३७) डॉ. धनंजय केळकर ३८) कु. नुपूर देसाई ३९) डॉ. दिलीप वाणी ४०) श्री. उत्तमराव कानिटकर ४१) श्री. गुलाबराव सकपाळ ४२) श्री. अप्पासाहेब वज्रम ४३) श्री. सुहासराव काणे

या सर्व मान्यवरांना मुलांनी भेटावे, या सर्वांचे बालपण, शिक्षण, जीवनध्येय त्यांनी कसे ठरविले, त्या क्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण अनुभव यासंबंधी त्यांची मुलाखत घ्यावी असे त्यांना सांगितले होते.

१० गटांमध्ये शिबिरार्थींची विभागणी केलेली होती. झालेल्या सर्व मुलाखतींचा अनुभव उत्साह वाढविणारा आहे.सर्व मुलाखती ह्या किमान १॥ तासांच्या झाल्या. काही ठिकाणी तर हा वेळही अपुरा पडला आणि मुलांच्या मनात अजून काही विचारावे असे प्रश्न होते.

लेफ्टनंट जनरल अशोक जोशी, उद्योजक श्री. रमेश जोशी, प्रसिध्द सामाजिक कार्यकर्ते श्री. माधवराव मेहेंदळे व ख्यातनाम व्यंगचित्रकार श्री. मंगेश तेंडुलकर यांच्या प्रकट मुलाखती घेण्यात आल्या. शिबिरानंतर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे आपल्या या प्रतिक्रिया दिल्या. त्यातील या काही प्रतिक्रिया -

- 'अशक्य' हा शब्द आपल्या शब्दकोशातून काढून टाकावा असे मला वाटले.'
- 'फक्त यशाच्या मागे लागून उपयोगी नाही तर समाजासाठी सुध्दा झटायला हवे.'
- 'मी काही तरी करून दाखवीन'
- 'आपले वाचन किती तुटपुंजे आहे याची जाणीव झाली.'
- 'नियतीशी झुंज देऊन मी नियतीचा पराभव करणार आहे.'
- 'जीवनात सतत काहीतरी करण्याची जिद्द व प्रबळ इच्छाशक्ति जागृत करणार आहे.'
- 'सैन्यदलात जाऊन मातृभूमीची सेवा करावी असं मला वाटते.'
- 'दुसऱ्याचे वागणे वाईट असले तरी आपण चांगले वागावे हे मला समजले.'
- 'मनात नेहमी चांगला विचार असावा व इतरांकडे बघण्याची दृष्टी चांगली असावी हे मला या शिबिरात शिकायला मिळाले.'
- 'दुसऱ्याची चाकरी न करता स्वतः उद्योजक व्हावे अशी प्रेरणा या शिबिराने मला दिली.'

... या प्रातिनिधिक प्रतिक्रिया इतक्या बोलक्या आहेत की अशा शिबिराचा तो एक मापदंडच ठरावा !



## २) शिवचरित्र अभ्यास शिबिर

('स्व'-रूपवर्धिनीच्या शिबिराच्या एकूण व्यवस्था, रचना, वेळापत्रक याची कल्पना येईल असे एक प्रातिनिधिक प्रारूप पुढे देत आहोत. मुलांच्या लहान गटाच्या (इ.५वी ते ७वी) उन्हाळी शिबिराचा वृत्तांतही या प्रारूपातून प्रकट होत आहे.)



### शिबिर व्यवस्था - विभाग सूची

कालावधी :- १८ एप्रिल ते २३ एप्रिल १९९८
स्थान :- भावे प्राथमिक शाळा
विषय :- शिवचरित्र
वयोगट :- इयत्ता ५वी ते ७वी.
मा. शिबिरप्रमुख :
महाव्यवस्थापक :

१) मैदान विभाग प्रमुख
२) व्याख्यान विभाग प्रमुख
३) पद्य व्यवस्था प्रमुख
४) फलक लेखन प्रमुख
५) शोध-बोध व्यवस्था प्रमुख
६) उपासना - पसायदान
७) भोजन व्यवस्था प्रमुख
८) अर्थ व्यवस्था प्रमुख
९) भांडार विभाग
१०) स्वच्छता व्यवस्था प्रमुख
११) वैद्यकीय व्यवस्था प्रमुख
१२) ग्रंथालय व्यवस्था प्रमुख
१३) वीज व्यवस्था प्रमुख
१४) पाणी व्यवस्था प्रमुख
१५) मैदान आखणी प्रमुख

*With Best Compliments From :*

**ADEPT RECORDING INSTRUMENTS (P) LTD,**

Plot No. 4, S. No. 17/ 1 – B, Kothrud Industrial Estate,
Kothrud, Pune - 411 029. ☎ 331124, 340480, 364551

## 'स्व'- रूपवर्धिनी - ऊन्हाळी शिबिर - १९९८ शिवचरित्र

स्थान :- रेणुकास्वरूप प्रशाला वयोगट :- इयत्ता ५वी ते ७वी

| दिनांक/ कार्यक्रम | १९ एप्रिल रविवार | २० एप्रिल सोमवार | २१ एप्रिल मंगळवार | २२ एप्रिल बुधवार |
|---|---|---|---|---|
| सत्र - १ | सुलतानशाही ते पातशाही (श्री. गणेश राऊत) | शिवरायांचे संघटनाकौशल्य (श्री. रामभाऊ डिंबळे) | शिवरायांचे पराक्रम (श्री. मंदार परळीकर) | शिवरायांचा राज्याभिषेक (श्री. शरदराव कुंटे) |
| सत्र - २ | पातशाहीकालीन समाजस्थिती (श्री. दिवाकरजी पांडे) | शिवरायांचे संघटनाकौशल्य (श्री. रामभाऊ डिंबळे) | शिवरायांची दूरदृष्टी, सावधपण व स्वदेशी (श्री. मोहनराव शेटे) | लोककल्याणकारी राजा (श्री. गणेश राऊत) |
| सत्र - ३ | शिवरायांचे बालपण (श्री. संजय तांबट) | चित्रपट बाल शिवाजी | शिवरायांची सहिष्णुता व परधर्म धोरण (श्री. शिरीष पटवर्धन) | शिवमृत्यूनंतरची परिस्थिती (श्री. श्रीधरपंत फडके) |
| रात्र कार्यक्रम | पोवाडा (शाहीर हेमंत मावळे) | किल्ल्यांची जडणघडण (श्री. पराग ठाकूर) | गटशः पद्यस्पर्धा | गटशः नाट्यस्पर्धा |

| | | | |
|---|---|---|---|
| ५.३० | : जागरण | ३.०० - ४.०० | : नाट्यसराव |
| ५.३० - ६.०० | : प्रात:विधी | ४.१५ - ५.०० | : सत्र - ३ |
| ६.०० - ६.२५ | : उपासना, प्रबोधन | ५.०० - ५.२० | : पेयपान |
| ६.३० - ६.५० | : व्यायाम, सूर्यनमस्कार | ५.३० - ६.०० | : शाखा - समता |
| ६.५० - ७.२० | : नियुध्द | ६.०० - ६.४० | : खेळ |
| ७.२० - ८.०५ | : खेळ | ६.४० - ७.०० | : प्रार्थना, सूचना |
| ८.१५ - ८.४५ | : न्याहरी | ७.०० - ७.३० | : शिवचरित्र कथन |
| ९.०० - ९.४५ | : सत्र - १ | ७.३० - ८.०० | : स्वच्छता, लिखाण |
| १०.०० - १०.४५ | : सत्र - २ | ८.०० - ९.०० | : भोजन |
| १०.५० - ११.३० | : स्पर्धा तयारी | ९.०० - १०.२५ | : रात्र कार्यक्रम |
| ११.३० - २.१५ | : स्नान,भोजन,विश्रांती | १०.२५ - १०.३० | : पसायदान |
| २.३० - ३.०० | : पद्य सत्र | १०.३० | : दीप विसर्जन |

### ३) आकाशाच्या अंगणात

निवेदिता शाखा व आजोळमधील मुली यांचे उन्हाळी शिबिर नवीन मराठी शाळेत आयोजित केले होते. या शिबिराचा विषय 'खगोलशास्त्र' होता. शिबिरात साठ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

या शिबिरात सर्वश्री गोडसे सर, प्रकाश तुपे, साठे सर, दादा पुणतांबेकर, आदमाने सर, लोखंडवाला सर, अभिजित कुंटे, प्र. वि. सोवनी अशा मान्यवरांचे बहुमूल्य मार्गदर्शन मिळाले.

शिबिराच्या समारोपाच्या आदल्या संध्याकाळी सर्व शिबिरार्थी सिंहगडावर पोचले. श्री. अविनाश फडणीस यांनी आकाशदर्शनासाठी अत्यावश्यक साधनाची, दुर्बिणीची शास्त्रोक्त माहिती दिली होती. मध्यरात्रीच्या निरव प्रहरात सुशांत आकाशाचं, आकाशगंगेचं आणि विलोभनीय चंद्रकलेचं मन थक्क करून टाकणारं दर्शन त्यांनी घडवलं. त्यांनी घडवलेली ती नक्षत्रयात्रा हा एक अविस्मरणीय अनुभव होता. यात भर होती त्याच रात्री झालेल्या गुरू-शुक्र पिधानयोगाची आणि उल्कापाताची. जणू रजतपोर्णिमेला घडून यावा असा दुग्धशर्करा योगच !

शिबिराचा समारोप केला श्री. कवठेकर सरांनी, कुसुमाग्रजांच्या 'पृथ्वीचे प्रेमगीत' आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'जगन्नाथाचा रथोत्सव' या कवितांतून नक्षत्र दर्शनाच्या माध्यमातून व्यक्त झालेला भव्य आणि उत्कट काव्यानुभव आपल्याला कसा प्रेरणादायी ठरू शकतो हे त्यांनी मांडले.

### ४) वीर अभिमन्यू बालशाखा शिबिर

दि. १४ ऑक्टो. ९८ स. ६.०० ते १७ ऑक्टो. ९८ दु. १.०० या काळात वीर अभिमन्यू बालशाखेच्या १ली ते ४थी या वयोगटाचे शिबिर पुणे विद्यापीठ येथील शिशुविहार या शाळेत झाले. शिबिराची संख्या मुलेमुली ६० व शिक्षक ७ अशी एकूण ६७ होती. वेगवेगळे खेळ मुलांना कळावेत, ज्या मुलांना खेळाबद्दल आवड नाही त्यांच्या मनात ती आवड निर्माण व्हावी यासाठी या शिबिराचा विषय क्रीडा असा होता.

शिबिराचे सत्र १ हे ज्ञानेश पुरंदरे सरांनी दिनांक १४ रोजी सायं. ७.३० ते ९.३० या वेळात मांडले. या शिबिरात आपण कशासाठी आलो आहोत, शिबिर घेण्याचे उद्दिष्ट काय अशा प्रकारचे मार्गदर्शन त्यांनी केले. शिबिराचे सत्र २ हे सुरेंद्र खेडकर यांचे झाले. मुलांशी गप्पा मारणे, एखादी छान गोष्ट, आणि त्यातूनच थोडेसे खेळाविषयी, अभ्यासाविषयी मार्गदर्शन त्यांनी केले. सत्र ३ हे शिरीष पटवर्धन यांचे झाले. सरांनी मुलांना आवडणाऱ्या अनेक नवनवीन गोष्टी सांगून त्यातून मुलांना मार्गदर्शन केले. गोष्टी ऐकत असताना तास कधी निघून गेला हे कळलेच नाही.

मुलांना वेगवेगळे खेळ कळावेत, शाखा चालू असताना पुढे येऊन नवीन खेळ घेता यावा हे शिकवण्यासाठी अलकाताई रानडे व स्वातीताई कुलकर्णी ह्या आल्या होत्या. यांनी मुलांना २ तास अनेक नवनवीन खेळ शिकविले. त्यानंतर त्यांनी

मुलांना आकाशकंदील तयार करणे, झिरमिळ्या तयार करणे, फुलांची फांदी, घरातील टाकाऊ वस्तूंपासून चांगल्या वस्तू कशा तयार करता येतील असे वेगवेगळे प्रकार सोप्या पद्धतीने शिकविले याला मुलांनी चांगला प्रतिसाद दिला. प्रत्येकाने आकाश कंदील व झिरमिळ्या तयार केल्या व आपला गट सजविला.

शिबिरात अनेक स्पर्धा झाल्या टेकडी चढणे, उतरणे, पळणे, मैदानी खेळ, प्रसंगनाट्य, उत्कृष्ट गट, स्वच्छता अशा स्पर्धा शिबिरात घेतल्या गेल्या.

शिबिरातील विशेष कार्यक्रम म्हणजे टेकडी चढणे हा झाला. मुलांनी दोन ते अडीच कि.मीची टेकडी अर्ध्या तासात पार केली. मनसोक्त आनंद घेतला. विशेष म्हणजे टेकडी चढताना व उतरताना रडारड, पडझड न करता मुले शिबिरस्थानी परत आली. शिबिर दिवाळीच्या दिवसांमध्ये होते. वसुबारसेच्या दिवशी एक वेगळा असा रात्र कार्यक्रम घेण्याचे ठरले. त्या दिवशी आम्ही शिबिरात दिवाळी साजरी केली. प्रत्येक मुलाने हातात फुलबाज्या घेऊन 'दिन दिन दिवाळी' गाणे म्हणत अतिशय उत्साहाने दिवाळी साजरी केली. रात्रीच्या अंधारात ६० मुलांच्या हातातल्या फुलबाज्या आणि भुईनळे यामुळे दिवाळीचे विलोभनीय वातावरण तिथे अनुभवायला मिळाले.

अखेर समारोपाचा दिवस उजाडला. दि.१७ रोजी वर्षाताई क्षीरसागर या शिबिरात आल्या होत्या. त्यांनी सुध्दा आधी मुलांचे अनेक नवनवीन खेळ घेतले. समारोपाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून त्याच होत्या. समारोपाच्या कार्यक्रमाला शिरीष पटवर्धन व कृ.ल. पटवर्धन हे ही उपस्थित होते.

वर्षाताई क्षीरसागर यांनी अतिशय उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले. हस्तकला तयार करत असताना त्यांनी अतिशय सुंदर अशा गोष्टीही सांगितल्या.

शिबिरप्रमुख म्हणून श्री. मनीष रासने यांनी काम पाहिले.

* * *

## ५) संस्था भेटी शिबिर

भगिनी निवेदिता शाखा

हिवाळी शिबिर - मोठा गट -

दि. ११/१०/९८ शिबिराचा पहिला दिवस

१) संस्था : 'ममता बाल सदन' - कुंभारवळण

सासवडजवळील 'कुंभारवळण' या छोट्या गावात सिंधुताई सपकाळ यांचे फार मोठे काम चालते. ह्या आश्रमातील मुले फारच विनम्र होती. गेल्या गेल्या तेथील मुलांनी त्यांची ओळख नमस्कार करून विनम्रपणे करून दिली व क्षणातच आम्हा सर्वांची मने जिंकली.



अनाथ आश्रमातील सर्व मुलांच्या आई म्हणजे 'सिंधुताई सपकाळ'! त्यांना सारेजण 'माई' म्हणतात. प्रत्येक वाक्यागणिक बेटा म्हणून हाक मारण्याचा तो वैदर्भि खाक्या साऱ्यांना लगेच आपलासा करून गेला.

माई खरेतर ४थी पर्यंतच शिकलेल्या पण साक्षात सरस्वती त्यांच्या जिभेवर नृत्य करते. आवाजात पहाडी पण त्या मागच्या भावना तितक्याच मृदू. स्वतःच्या व्यक्तिगत जीवनात अत्यंत कडवट अनुभव घेऊनही हसतमुखाने समाजासाठी धडपडणाऱ्या सिंधुताई सर्वांना नुसत्या भावल्याच नाही तर बिकट परिस्थितीतही कार्य करण्याचे स्फुल्लिंग कायम कसे चेतवत ठेवायचे याचा आदर्श त्यांच्या रूपाने आमच्या डोळ्यांसमोर साकार झाला.

'हे विश्वचि माझे घर' अशी उदात्त भावना उराशी बाळगताना 'हे माझे पोर' असा यत्किंचितही आपपरभाव मनात येऊ नये म्हणून स्वतःच्या पोटच्या गोळ्यालाही त्यांनी दूर सारले. म्हणजे त्याला एका दुसऱ्या अनाथाश्रमाच्या विश्वस्तांकडे सोपवून त्या स्वतः जगाचा संसार करण्यास मोकळ्या झाल्या.

या संस्थेतून बरेच काही शिकून आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो.

२. अपंग कल्याण केंद्र (वानवडी)

ह्या केंद्रामध्ये साधारणतः पायाने अपंग असणारे जास्त होते. १०१ मुली व १०५ मुले. एवढ्या मोठ्या संख्येत तिथे विद्यार्थी आलेले आहेत. स्वतःच्या अपंगत्वाची खंत कुणाच्याही चेहऱ्यावर दिसत नव्हती. कारण पाय अधू असला तरी हात तितकेच कार्यरत होते. त्यांचे वेळापत्रक एकदम सुसूत्र व जराही मोकळीक नसलेले होते.

ह्या मुलांच्या औषधांचा पूर्ण खर्च संस्था करते. डॉ.जोध व डॉ.जैन हे मुलांची मोफत शस्त्रक्रिया करतात. त्यांच्या पायाला जे क्लिपर बसविले जाते त्याचे प्रशिक्षणही येथे दिले जाते व काही विद्यार्थी ते तंत्र शिकून व्यवसायही करतात. त्यांची ही योजकता मला कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'कमवा व शिका' या तत्त्वाप्रमाणे वाटली. कारण मोठ्या म्हणजेच ८वी ते १०वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांना कार्यशाळेमध्ये काम करणे सक्तीचे आहे. त्यांच्यातील चार जण आता कुशल कामगार आहेत. मुलींसाठीही शिवणाचे वर्ग चालतात.

तेथील कार्यकर्त्यांशी आमच्या अनौपचारिक गप्पा झाल्या. मग तेथील विद्यार्थी व आमचा एकत्र गीत गायनाचा कार्यक्रम झाला.

३. विज्ञानाश्रम पाबळ - पाबळ येथे डॉ. कलबाग यांनी एक आगळा वेगळा उपक्रम प्रत्यक्षात आणला आहे. त्यांच्या संस्थेचे नाव आहे विज्ञान-आश्रम'. पण त्याला विज्ञान-कार्यशाला म्हटलेले जास्त उत्तम होईल.

दहावी, बारावी व पदवी प्राप्ती ह्या चाकोरीबध्द शिक्षणपध्दतीतून बाहेर येऊन जीवनोपयोगी असे कृतीयुक्त शिक्षण येथे दिले जाते.

तेथील मुलांना प्रत्येक गोष्ट ही करावयास दिली जाते. जुन्या गाडीचे भाग व मोटर वापरून केलेले ट्रॅक्टर, फर्निचर, भूकंपग्रस्त भागात बांधावयाचे घर, Distil water चे यंत्र ERM (earth Resistivity Meter) जमिनीत पाणी आहे की नाही याचे परीक्षण करण्याचे यंत्र, संगणकाचे Hardware तयार करणे व त्याचप्रमाणे software मध्येही त्यांनी अनेक packages विकसित केलेली आहेत. त्यांत त्यांनी शास्त्राचे काही धडे फारच सोपे करून सांगितलेले आहेत. कुक्कुट पालन, मशरूम जोपासना, पशु-पालन,

रोपवाटिका, खाद्य पदार्थ तयार करणे, रक्त इत्यादी तपासता येईल व रक्त गटही त्वरीत कळेल अशा प्रयोगशाळा असे अनेक प्रकल्प त्यांनी तेथे राबवले आहेत. आणि ह्या प्रकल्पाचे वैशिष्ट्य असे की जे १०वीत अयशस्वी होतात त्यांना खास प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून बरेचसे, त्यांच्या निर्मितीक्षमतेला वाव देऊन करवून घेतले जाते व त्यांच्यात आत्मविश्वासही निर्माण केला जातो.

आपण पहातोच की दहावीत जेमतेम १/३ विद्यार्थीच पास होतात. मग ह्याच चाकोरीबध्द शिक्षणप्रणालीचा आग्रह धरण्यापेक्षा डॉ. कलबागांसारख्या व्यक्तीने विकसित केलेला हा प्रकल्प म्हणजे नैराश्य व बेरोजगारी यावर मात करणारे वरदानच आहे.

४. वेदभवन :- ह्याच दिवशी संध्याकाळी आम्ही कोथरुडमधील वेदभवन ह्या संस्थेत गेलो. वैज्ञानिक जगातून एकदम वैदिक जगतात. अर्थात विज्ञानालाही वेदांचा पाया आहेच.

वेदभवनामध्ये ऋग्वेदाची संथा दिली जाते व वेद शिकण्यासाठी मुलांना जवळ-जवळ बारा वर्षांचे तपच करावे लागते. सर्व गोष्टींपासून वंचित राहून फक्त वेदाभ्यास करायचा व ऋग्वेदात पारंगत होऊनच बाहेर पडायचे. ह्या विद्यार्थ्यांचा सारा खर्च ही संस्थाच करते. ह्या संस्थेला कुणाचीही अनुदान स्वरूपात देणगी मिळत नाही. केवळ परंपरागत ऋग्वेद अजूनही प्रचलित रहावा म्हणून ही संस्था जोमाने काम करीत आहे हे खरोखरच प्रशंसनीय आहे.

मुलींना तेथील एक गोष्ट मात्र फारच खटकली ती म्हणजे ऋग्वेदाची संथा फक्त ब्राम्हणांना व मुलांनाच दिली जाते. पण ह्याच्यावर टीका करण्यापेक्षा ब्राम्हणेतरांनी व मुलींनी तो ऋग्वेद शिकून दाखविला पाहिजे. व हेच खरे सडेतोड उत्तर ठरेल. तेथील वास्तू ही अष्टकोनी आकाराची असून, तेथील खिडक्यांवर वेगवेगळी यंत्रे काढलेली आहेत.

५. भारत इतिहास संशोधक संस्था :

पुणे हे एक ऐतिहासिक शहर असे म्हटले जाते. पण पुण्याचाच काय तर सारा इतिहासच कसा धूळ खात पडला आहे याची जाणीव आम्हाला भारत इतिहास संशोधक मंडळाला भेट दिली तेव्हा झाली. तेथे अनेक ऐतिहासिक पोथ्या, दफ्तर व बाडं ज्याच्यात बरेच जुने पौराणिक, आयुर्वेदिक व ऐतिहासिक संदर्भ आहेत. बऱ्याच पोथ्या मराठीत, मोडीत व फारसीत आहेत. बऱ्याच मुलींना तिथे जाऊन मोडी शिकण्याची इच्छा झाली. कारण बरेच साहित्य मोडीतच उपलब्ध आहे. तिथे गेल्यावर एका गोष्टीची खंत वाटली ती म्हणजे एवढे सारे उपलब्ध असताना त्याला अभ्यासणारे फारच क्वचित आहेत. तिथे आम्हाला १२०० चित्र, जुने कागद, युध्दाची व इतरही शस्त्रे बघावयास मिळाली. वेगवेगळ्या प्रकारचे नकाशेही पहावयास मिळाले.

६. आयुका : पुणे विद्यापीठ

ह्या संस्थेमध्ये आम्ही एक विशिष्ट लंबक पहिला. पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा सिध्दांत सूर्याकडे न बघता केवळ ह्या लंबकाच्या साहाय्याने सिध्द होते हे साठे सरांनी छान समजाऊन सांगितले.

त्याचप्रमाणे तेथील अवकाशाची प्रतिकृती कुठली रास सूर्यासमोर आहे, कुठली रास उगवते आहे, त्याचे पक्के गणित, आकाशातील ग्रह, नक्षत्र व राशींच्या निश्चित जागा व वेळ ओळखणे हे सर्व साठे सरांनी उत्तम समजाऊन सांगितले.

७. शरद कापूसकर यांचे शिल्पकला केंद्र. अत्यंत साध्या व शांत वातावरणातील कुठल्याही प्रकारचा दिमाख नसलेले हे त्यांचे शिल्पकला केंद्र. ज्या प्रमाणे शिल्पकला केंद्र त्याचप्रमाणे स्वतः कापूसकर अत्यंत साधे व अबोल व्यक्तिमत्व.

त्यांनी केलेली शिल्प अत्यंत जिवंत व सुंदर होती. प्रत्येक शिल्पाची काहिना-काही वैशिष्ट्ये होती. त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या सहाय्यकाने आम्हाला मूर्ती करण्याची सारी कलात्मक व तांत्रिक पध्दत समजाऊन सांगितली. कापूसकरांनी अत्यंत भव्य शिल्प केलेली आहेत. मुंबईतील शिवाजी पार्क जवळील ५० फूट उंचीचे शिल्प त्यांनीच केले आहे. सध्या बुध्दाच्या शिल्पाचे काम चालले आहे. असे मोठे शिल्प करण्यासाठी त्यांना सलग पंधरा-पंधरा तास एकाग्र होऊन काम करावे लागते. केवढी प्रचंड कर्मसाधना आहे ही! त्यांच्याकडे पाहून मला

'व्यक्ती व्यक्ती मे जगाये राष्ट्रचेतना ।
जन मन संस्कार करे यही साधना
साधना नित्य साधना, साधना अखंड साधना ॥'

ह्या पंक्ती आठवल्या. खरोखरच कुठलेही कार्य साध्य होण्यास अखंड साधना ही हवीच !

ह्या शिबिरात आम्हाला श्री. संजय तांबट व श्री. मोहनराव आळवणी सर यांचे मार्गदर्शन लाभले. आजच्या युगात स्त्रियांची कशी ठाम भूमिका हवी हे श्री आळवणी सरांनी त्यांच्या व्याख्यानात सांगितले व समारोपीय भाषणात श्री. उदय गुजर यांनी आपल्या शिबिराचा नेमका उद्देश काय? त्याचा इतरवेळेस कसा उपयोग करून घ्यायचा? नेमके काय घ्यायचे, काय सोडायचे, शिबिरात मिळालेली शिदोरी आयुष्यभर कशी पुरवायची याचे छान मार्गदर्शन केले.

### ६) कला कौशल्यशिबिर :

भगिनी निवेदिता शाखा, नंदादीप शाखा, आजोळ यातील ५वी ते ७वी या वयोगटातील मुलींचे शिबिर २३ ऑक्टो ते २६ ऑक्टो. या काळात शिशुविहार, पुणे विद्यापीठ येथे हिवाळी शिबिर झाले. 'कला कौशल्य' हा शिबिराचा विषय होता. ओरिगामी, कोलाज, कोल्ड सिरॅमिक इत्यादी विषय या शिबिरात शिकविण्यात आले. कु. कविता गौड ही शिबिर प्रमुख होती. एकूण ४८ मुली शिबिरात सहभागी झाल्या होत्या.

* * *

### ७) ग्रामशिबिरे

'स्व'-रूपवर्धिनी व विज्ञानभारती यांच्या वतीने दि.२४ ऑक्टो. ते २७ ऑक्टो. ९८ या कालावधीत दीपावली - १९९८ मध्ये खालीलप्रमाणे ग्रामशिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

'स्व'-रूपवर्धिनीच्या पुण्यातील सर्व शाखांना ग्रामशिबिरे पार पाडण्याची जबाबदारी सोपविली होती. प्रत्येक शाखेला एक गाव वाटून दिले होते. या सर्व ग्रामशिबिरांमधील ४ दिवसांच्या सर्व

कार्यक्रमांचे व्यवस्थापन शाखेतील ८वी व ९वी या इयत्तेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी करावे असे ठरले. हे व्यवस्थापन गुणवत्तापूर्ण व्हावे यासाठी शिबिरापूर्वी ६ वेळा या सर्व शाखांतील विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय प्रशिक्षणवर्गांची रचना केली होती. या प्रशिक्षण वर्गाद्वारे शिबिरांतील कार्यक्रमांचे व व्यवस्थांचे नियोजन व अंमलबजावणी कशी करावी? तसेच शिबिर नियंत्रण कसे करावे? या साऱ्या विषयांचे प्रशिक्षण दिले गेले. या ग्रामशिबिरांचे शिबिरप्रमुख ८वी- ९वी तील विद्यार्थीच होते व शाखेतील युवकांनी शिबिर नियंत्रणाची जबाबदारी पार पाडली. या सर्व प्रशिक्षणवर्गांचे प्रमुख श्री. शिरीष अडके हे होते.

सौ. वैभवी पाटील व श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी शिबिरापूर्वी सर्व ग्रामशाळांमध्ये जाऊन शिबिरातील कार्यक्रमांची सविस्तर माहिती शाळेतील मुलांना दिली. त्यामुळे सर्व शिबिरांमध्ये संस्थात्मक प्रतिसाद चांगला मिळाला.

शिबिरांचे उद्‌घाटन आणि समारोप या कार्यक्रमांना निमंत्रणाप्रमाणे सर्व ठिकाणचे स्थानिक पदाधिकारी (मा. सरपंच, पोलिस पाटील, मुख्याध्यापक-शिक्षक, बँका व पतपेढ्यांचे संचालक, राजकीय पुढारी, प्रतिष्ठित- जेष्ठ गावकरी) उपस्थित राहिले. सर्वांनी आपल्या भाषणांमध्ये शिबिरातील कार्यक्रमांची खूप स्तुती केली व संयोजन पार पाडण्याऱ्या ८वी-९वी तील विद्यार्थ्यांचे कौतुक केले अशा प्रकारची शिबिरे वर्षातील दोन्ही सुट्ट्यांमध्ये व्हावीत असा आग्रह धरला. तसेच शाखाविभागाचे साप्ताहिक स्वरूपाचे काम गावात सुरु व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

| शिबिरांतील व्याख्याते | विषय |
|---|---|
| १) डॉ. वसंतराव पुणतांबेकर | वैज्ञानिक प्रयोग |
| २) डॉ. पी.व्ही. जोशी | वनस्पतींचे वर्गीकरण |
| ३) डॉ. श्री. आदमाने | भूगोल व खगोलशास्त्र |
| ४) श्री. साठे सर | प्रयोग |
| ५) सौ. साठे बाई | वैज्ञानिक माहिती |
| ६) श्री. रमेश दाते | भौतिकशास्त्र परिचय |
| ७) श्री. वाडदेकर सर | संत रामदास चरित्र |
| ८) श्री. कृ.ल. पटवर्धनसर | अणुस्फोटाची चांगली बाजू |
| ९) श्री. संजय तांबट | शिवचरित्र |
| १०) श्री. शिरीष पटवर्धन | स्वदेशी व प्रेरणादायी चरित्रे |
| ११) श्री. शिरीष अडके | प्रेरणादायी व्याख्याने |
| १२) श्री. ज्ञानेश पुरंदरे | प्रेरणादायी व्याख्याने |
| १३) श्री. जयंतराव कवठेकर | भारतीय स्वातंत्र्य समर |

शिबिरांमध्ये झालेले कार्यक्रम :-

१) दैनंदिन तासभराच्या ग्रामसंपर्काद्वारे पुण्यातील शिबिर संयोजक विद्यार्थ्यांनी ग्रामजीवनातील विविध पैलूंचे अवलोकन केले.

२) दिवाळीच्या दिवसांमध्ये चालणाऱ्या देवळांमधील पहाटेच्या काकड-आरत्यांचा लाभ मुलांनी घेतला.

३) पशुपालन, कुक्कुटपालन या शेतीच्या जोडधंद्यांचा परिचय करून घेतला.

४) प्रत्यक्ष शेतांवर जाऊन तेथील विविध कामांची सप्रात्यक्षिक ओळख करून घेतली.

५) दूध संकलन व दुग्ध व्यवसायातील बारीकसारीक गोष्टींवर प्रश्न विचारून त्याची माहिती करून घेतली.

६) शिबिर स्थानाच्या परिसरातील तिकोन्यासारखे किल्ले, टेकड्या यांवरील गिर्यारोहणाचा आनंद घेतला.

७) शहरातील काही विद्यार्थी पोहण्यास शिकले.


८) गटशः वादविवादांचे विषय -

अ) पारंपारिक शेती व आधुनिक शेती

ब) भारतीय संस्कृती व पाश्चात्य संस्कृती

विशेष उल्लेखनीय उपलब्धी :-

- मु.पो. संभवे येथील सुबोधानंद शाखेतील इ. १२ वीत शिक्षण घेणारे संदीप मोरे या शिबिर नियंत्रकाची शिबिर अहवालातील लेखी प्रतिक्रिया "अशाप्रकारे निसर्गाच्या सानिध्यात राहून जर मुलांवर संस्कार झाले तर मग शहरांतील कोंदट सिमेंटच्या भिंतींची आस त्यांना लागणार नाही, मोकळ्या पायवाटेवरून चालणारे पाय ट्रॅफिकमध्ये अडकणार नाहीत. स्वतःच स्वतःचा नवा मार्ग, नवे ध्येय ते निर्माण करतील आणि आपल्याला सुध्दा दिसणार नाही, इतक्या उंच झेपा घेतील"
- विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी साप्ताहिक शाखांचा आग्रह धरणे ही यशस्वितेची पावती मानावी लागेल.
- गावांतील व शहरांतील विद्यार्थ्यांचे एक अतूट असे नाते याद्वारे निर्माण झाले.
- शिबिरांचे व्यवस्थापन सोपविल्यामुळे वर्धिनीच्या ८वी-९वी तील विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणाला वाव मिळाला. त्यांचा आत्मविश्वास वाढला.
- ग्रामीण विद्यार्थ्यांचा सर्व कार्यक्रमांमधील सहभाग अत्यंत उत्स्फूर्त होता व स्पर्धांचा दर्जाही उच्च प्रतीचा होता. याद्वारे तेथील शिक्षकांचेही एक प्रकारे प्रबोधन झाले.
- शहरी मुलांचे ग्रामीण जीवनाविषयीचे स्नेहबंध व कर्तव्यभावना या शिबिरामुळे जागृत झाल्या. म्हणजेच आपल्याला या खेड्यांसाठी भविष्यात काहीतरी केले पाहीजे ही जाणीव मुलांमध्ये आली.



## ८) महिला शिबिर

'स्व'-रूपवर्धिनीच्या महिला विभागात व अन्य प्रकल्पात काम करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांचे दरवर्षी एक दिवसाचे शिबिर घेतले जाते. यंदाही असे शिबिर घेतले गेले.

या शिबिरात डॉ. कानिटकर, श्रीमती शोभाताई भागवत, श्रीमती मृणालिनीताई चितळे, श्रीमती वसुधाताई मेहेंदळे यांची व्याख्याने, कथाकथन, गट-चर्चा असे कार्यक्रम झाले.

शिबिरात चाळीस महिला कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या. व्याख्याने, कथा-कथन व गट-चर्चा यांतील प्रेरणादायी विचारांनी सर्व कार्यकर्त्यांना अंतर्मुख केले. 'स्व'-रूपवार्धिनीव्दारे मिळणारे पाथेय समाजसेवा करण्यासाठी कसे अधिकाधिक प्रेरक ठरते याची जाणीव झाली.

***

## ९) आम्हाला सुदामा भेटला

विश्वास नाही ना बसत? अहो पण खरंच आम्हाला सुदामा भेटला. योगेश्वर कृष्णाला भेटला त्या रूपात नाही पण खरंच आम्हाला सुदामा भेटला हे मात्र खरं आहे. २ मे ते ५ मे १९९८ या कालावधीत 'स्व'-रूपवर्धिनीच्या सर्व शाखांमधील निवडक ५० मुलामुलींचे एक शिबिर मुंबई येथे संपन्न झाले. मुंबईतील काही व्यक्ती, काही संस्था यांच्या भेटी हा या शिबिराचा प्रमुख विषय होता.

**ग्राहक राजा**

पहिल्या दिवशी पहिला कार्यक्रम होता मुंबई येथील ग्राहकपंचायतीला भेट. त्यांचे मुंबईतील प्रमुख कार्यकर्ते श्री. मधुकर मंत्री हे स्वतः यासाठी आले होते. मुलांचा वयोगट पाहिल्यावर क्षणभर त्यांच्या मनात असे आले की या मुलांना ग्राहकपंचायतीचे काम कसे समजणार? अत्यंत सोप्या शब्दात व प्रत्यक्ष उदाहरणातून त्यांनी ग्राहकपंचायतीच्या कामाची, कार्यक्षेत्राची रुपरेषा मुलांसमोर मांडली. त्यांनी माहिती सांगितल्यावर मुलांनी जे प्रश्न विचारले त्यातून त्यांनी मांडलेला विषय मुलांना व्यवस्थित समजला आहे हे नक्की जाणवले. ग्राहक पंचायतीची वास्तू व तेथून चालणारे सर्व दैनंदिन व्यवहार हे सुध्दा शिबिरार्थींनी प्रत्यक्ष बघितले. ग्राहक हा खऱ्या अर्थाने 'राजा' होऊ शकतो पण त्यासाठी तो जागरुक असायला हवा हा संस्कार विद्यार्थ्यांना या मुलाखतीतून मिळाला.

**पुढील शतकातील आव्हाने**

दुसऱ्या सत्रात विज्ञान जगतात ज्यांचे लिखाण सातत्याने समाजासमोर येते असे प्रा. मोहन आपटे हे उपस्थित होते. आगामी शतकात विज्ञानक्षेत्रात काय काय घडामोडी होणार आहेत, होऊ शकतात या संबंधीचा अतिशय चित्तवेधक विषय प्रा.आपटे यांनी मांडला. मुलांच्या मनातील अनेक विज्ञान विषयक शंकांचेही निरसन आपटेसरांनी अतिशय परिणामकारकरित्या केले.

**स्वदेशीला पर्याय नाही**

खादी आणि अन्य स्वदेशी वस्तूंच्या निर्मितीसाठी प्रसिध्द अशा 'कोरा इंडस्ट्री' ला या शिबिराच्या निमित्ताने भेट ठरली होती. महात्मा गांधींच्या जीवनावरील आधारीत चित्र प्रदर्शनी या ठिकाणी पहायला मिळाली. साबणनिर्मिती, खाद्य तेलांची

निर्मिती, मातीच्या सुबक वस्तूंची निर्मिती अशा विविध विभागांना मुलांनी भेट देऊन तेथील काम समजाऊन घेतले. स्वदेशीची आजची गरज लक्षात घेण्याच्या दृष्टीने ही भेट संस्मरणीय ठरली.

**अस्मिता जागरणाचा अभिनव उपक्रम**

'अस्मिता' या अपंग मुलांसाठी / व्यक्तींसाठी काम करणाऱ्या संस्थेला दिलेली भेट खरोखरीच अपूर्व होती. सर्वांचे स्वागतच संस्थेतील विद्यार्थ्यांनी केले. बालवाडी प्रशिक्षणासाठी लागणारी अभ्यासखेळणी, लहान मुलांसाठीची खेळणी, शिलाईकामातून साकारलेल्या देखण्या पिशव्या अशा कित्येक वस्तूंची निर्मिती येथील अपंग विद्यार्थी करतात. पण त्यांचे कौशल्य पाहिल्यावर त्यांना अपंग म्हणणे हा त्यांचा अपमानच होईल. खरोखरीच माणसामधील अस्मिता जागृत असेल तर काय घडू शकते याचे मूर्तिमंत उदाहरण अनुभवायला मिळाले.

**मुंबईतून काय न्याल?**

जिवाची मुंबई करण्यासाठी अनेकजण जातात. वर्धिनीच्या या मुंबई शिबिरातून घरी जाताना तुम्ही मुंबईतून काय घेऊन जाल? असा मुलांनाच प्रश्न विचारत स्वरूपवर्धिनीचे अध्यक्ष श्री. जयसिंगभाई मरिवाला यांनी मुंबईतल्या लोकांची कष्ट करण्याची प्रवृत्ती, विविध भाषा-संस्कृतीच्या मिलाफामुळे घडणारे एकात्मतेचे दर्शन, अडचणी असूनही आनंदी राहाण्यासाठी चालणारी मुंबईकरांची धडपड यासंबंधीच्या गप्पा मुलांशी मारल्या. मुंबईच्या दैनंदिन जीवनातील गुणांचा हा साठा प्रत्येकाने आपल्यासाठी न्यावा, असे त्यांनी सर्वांना आग्रहाने सांगितले.

**रुग्णसेवा हीच परमेश्वर सेवा**

मुंबईच्या स्व. नाना पालकर स्मृती समितीचे काम पाहाण्यासाठी सर्वजण परळ येथे संस्थेला भेट द्यायला गेले होते. कॅन्सर सारख्या दुर्धर रोगांवर उपचार करायला देशाच्या नाना कोपऱ्यातून शेकडो रुग्ण मुंबईत येतात. तेथे जसा पाण्याचा महासागर आहे तसा माणसांचाही आहे. अवाढव्य पसरलेल्या या मुंबईत नवखा माणूस गोंधळूनच जातो. अशा परिस्थितीत अशा आजारपणावरील उपचारासाठी रुग्ण अमक्या गाडीने येत आहे असे कळल्यावर त्याला स्टेशनवर उतरवून घेण्यापासून ते त्याच्यावरचे आवश्यक ते उपचार पूर्ण होईपर्यंत त्याची व त्याच्यासमवेत आलेल्या नातेवाईकांची जी व्यवस्था नाना पालकर समिती बघते व ज्या आपुलकीच्या भावनेने बघते त्याला खरोखरीच उपमा नाही. रुग्णाचा निम्मा आजार या आपुलकीनेच बरा व्हावा, रुग्णास आपण आपल्याच घरी आहोत असे वाटावे असे येथील वातावरण आहे. संस्थेच्या उंचच उंच इमारतीच्या गच्चीवरून पसरलेली विशाल मुंबई जशी मुलांनी पाहिली तशी विशाल मनाचे, विशाल दृष्टी असलेले या संस्थेचे तळमळीचे कार्यकर्तेही मुलांना जवळून अनुभवायला मिळाले.

नसे राऊळी वा नसे मंदिरी,<br>
जिथे राबती हात तेथे हरी ।

शिक्षण झालेलेच नाही, झाले आहे पण अर्धवट, कोण मला नोकरी देणार? मी कसा जगणार? चिंताग्रस्त चेहरा करून असे प्रश्न विचारण्याचा प्रसंग ज्यांच्यावर दुर्दैवाने ओढवतो अशांपैकी

ज्यांची खरेच कष्ट करण्याची तयारी आहे त्यांना मुंबईचे श्रमिक विद्यापीठ हे तीर्थक्षेत्रच वाटावे असे या संस्थेचे काम आहे. शिकलेला असो वा नसो, स्वाभिमानाने आणि कष्ट करून जगण्याची इच्छा असलेल्यांसाठी अनेक व्यवसाय अभ्यासक्रम येथे चालतात. या संस्थेचे संचालक श्री. पाटणकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी श्रमिक विद्यापीठामागची कल्पना, त्यातील अनुभव दृकश्राव्य माध्यमातून व प्रत्यक्ष माहिती सांगून स्पष्ट केली. बेकारीची समस्या असलेल्या या आपल्या देशात पाटणकरांसारखी तळमळीने काम करणारी माणसे उभी राहिली तर स्वाभिमानाची फुंकर हा हा म्हणता सर्वत्र पसरेल. ही भेट संपवून बाहेर पडता पडता एक गीत आठवले

नसे राऊळी वा नसे मंदिरी । जिथे राबती हात तेथे हरी ।

तारांगण सर्वही व्यापून गेले...

सायन्स गार्डन व नेहरू तारांगण या दोन ठिकाणांना दिलेल्या भेटी या अविस्मरणीय आहेत. सायन्स गार्डन मध्ये मांडलेली खेळणी, त्याची माहिती, विज्ञानाचे नेमके तत्त्व समजण्यासाठी खरोखरीच परिणामकारक आहेत. खेळणी खेळता खेळता मुलांना ही तत्त्वे समजतात. या बगिचाची वेळ संपून गेली तरी कुणाला बाहेर पडावेसे वाटत नव्हते. तीच कथा नेहरू तारांगणाची. विज्ञानाची एक चमत्कृती प्रत्यक्ष अनुभवली. कल्पनेपलिकडे विशाल असलेल्या तारांगणाचे विलोभनीय दर्शन मुलांनी घेतले. आपली आकाशगंगा, आपली ग्रहमाला, धुमकेतू या साऱ्यांचे दर्शन तारांगणामध्ये झाले. हा कार्यक्रम चालू असताना जी वातावरणनिर्मिती केली जाते त्यावेळी क्षणभर का होईना हे विश्व खरोखरीच किती प्रचंड आहे हे जाणवते. अनेक गूढ प्रश्नांची उकल करण्यासाठी शास्त्रज्ञ कसा अभ्यास करतात याचेही दर्शन या तारांगण दर्शन कार्यक्रमाच्या निमित्ताने झाले.

प्रेरणादायी मुलाखत

मूळचे पुण्याचे रहिवासी असलेले श्री. रमेश चवथे हे मुद्दाम गप्पा मारण्यासाठी आले होते. अत्यंत गरीबीच्या स्थितीत जगताना संघर्ष करून यश कसे संपादन केले त्याचे अनुभव चवथे यांनी मुलांसमोर मोकळेपणाने मांडले. शिकून मोठे झाल्यावर खूप पैसा मिळत असतानाही वनवासींसाठी खूप काम करण्याची प्रेरणा कोणाकडून घेतली या प्रश्नावर त्यांनी आपल्या आईवडिलांचा अतिशय आदरपूर्वक उल्लेख केला. हमाली काम करणारे वडील व धुण्याभांड्याची कामे करणारी आई या दोघांनी त्याही परिस्थितीत सामाजिक बांधिलकी कशी जपली होती याची प्रत्यक्ष उदाहरणेच त्यांनी सर्वांसमोर ठेवली. असा संस्कार झाल्यामुळेच आज आवश्यकता असेल तेव्हा स्वतःचा उद्योग बाजूला ठेऊन वनवासींच्या कामासाठी मी वेळ काढू शकतो असं अत्यंत सहजतेने त्यांनी मुलांना सांगितले. त्यांनी सांगितलेले स्वतःच्या आयुष्यातील प्रसंग, व कामातील अनुभव यामुळे मुलाखतीचे वातावरण खूप भारावलेले होते.

वात्सल्य

या शब्दाचा अर्थ समजाऊन घ्यावा, प्रत्यक्ष अनुभवावा असेच वातावरण या अर्भकालयात होते. या संस्थेचे कार्यकर्ते ज्या वात्सल्याने अनाथ बालकांचे संगोपन करीत असताना दिसले ते



पाहिल्यावर डोळे दिपून गेले. त्या लहानग्यांच्या वाट्याला काही काळासाठीच अनाथपण आले असावे इतका लळा लावणारे आप्त त्यांना या संस्थेमुळे लाभले आहेत. या संस्थेच्या कामातील अनुभव ऐकल्यावर विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया अतिशय बोलक्या होत्या. एक विद्यार्थी म्हणाला यापुढे माझ्या वाढदिवसाच्या दिवशी मी या संस्थेला १०० रू. भेट म्हणून पाठवत जाईन. या वयात बाकी काही नसला तरी असा सहभाग मी नक्कीच घेईन. या संस्थेप्रमाणेच श्रध्दानंद महिलाश्रमाचे कामही विद्यार्थ्यांना पहायला मिळाले. ही संस्था खूप जुनी असल्याने तिचा कार्यविस्तारही खूप आहे. पण तेथील कार्यकर्त्यांनी अत्यंत कुशलतेने थोड्या वेळात संस्थेच्या कामाचा परिचय करून दिला.

**येऊरच्या जंगलातील बटू -**

ठाणे जिल्ह्यातील येऊर या वनवासी क्षेत्रात एक विद्यार्थी वसतीगृह चालते. ठाण्याचे श्री. पटवर्धन हे त्याचे काम पहातात. ते केंद्र पहायला गेलो होतो. आश्रमात गेलो त्या वेळेस आश्रमवासीय विद्यार्थ्यांचे जेवण चालू होते. आणि सर्वांच्या नुकत्याच मुंजी झाल्याचे दिसत होते. त्यांच्याकडे पाहिल्यावर परंपरागत गुरुकुलातच आपण आलो की काय असा भास झाला. या सर्व मुलांसाठी चालणाऱ्या उपक्रमांची ओळख करून घेऊन बाहेर पडलो.

**औषधं कडू पण माणसं 'गोड'**

तळोजा औद्योगिक वसाहतीतील मे. अल्केम लॅब या औषधे तयार करणाऱ्या कंपनीस भेट ठरली होती. ठरल्याप्रमाणे सर्व जण तेथे पोहोचलो. औषध निर्मितीची प्रक्रिया लक्षात घेता बहुतेक सर्व विभागांचे काम दारांवरील काचांमधून बघावे लागणार हे लक्षात आले. सर्व शिबिरार्थी थोडेसे नाराज झाले. अर्थात ही नाराजी काही क्षणच टिकली कारण प्रत्यक्ष भेट सुरू झाल्यावर प्रत्येक विभागातील कामगारांनी अत्यंत मनःपूर्वक स्वागत करून विद्यार्थ्यांना सर्व प्रक्रिया जवळून दाखवल्या. बाटल्या औषध भरण्यापूर्वी निर्जंतूक कशा करतात, गोळ्यांची पाकीटे कशी भरतात, गोळ्या कशा तयार करतात. सर्व प्रक्रिया जवळून तर बघायला मिळाल्याच पण त्याबरोबर मनसोक्त खायला मिळाले व बाहेर पडताना एक एक चॉकलेट सर्वांच्या हातात पडले.

**आणि . . . 'सुदामा' भेटला**

या शिबिरात बॉम्बे पोर्ट ट्रस्टला भेट देऊन तेथे कसे काम चालते हे विद्यार्थ्यांना दाखवावे असे ठरविले होते. या संस्थेत काम करणाऱ्या वनवासी कल्याण आश्रमाच्या काही कार्यकर्त्यांनी या कामी खूप मदत केली. या सर्वांमुळे गोदीमध्ये सामानाची चढउतार कशी केली जाते, मालवाहू जहाजे आत कशी येतात, बाहेर कशी जातात हे मुलांना अगदी जवळून बघता आले आणि कल्पनेत नसताना एका

लाँचमधून समुद्राचा एक फेरफटकाही मारता आला. अत्यंत आनंदाच्या मनस्थितीत सर्व विद्यार्थी जेवणासाठी पोर्ट ट्रस्टच्याच कँटिनमध्ये जमले होते. ती वेळ नेमकी सर्व कामगार व अन्य सेवकांच्या जेवणाच्या सुट्टीचीच होती. लहान वयातील हे कोण पाहुणे आलेत असा भाव या सर्व श्रमिक व सेवकांच्या चेहऱ्यावर होता. याच गर्दीत शिंदे नावाचे एक गृहस्थ होते. त्यांनी चौकशी केली. शिंदे हे माथाडी कामगार म्हणून गोदीला कामाला आहेत. मुळचे पुणे जिल्ह्यातले असलेल्या या शिंदे यांनी 'स्व'रूपवर्धिनीच्या सर्व शिबिरार्थींच्या जेवणाचे बिल, कोणाच्याही नकळत भरून टाकले. जेवणाचे बिल भरायला जेव्हा वर्धिनीचा कार्यकर्ता गेला तेव्हा त्याला हा सुखद धक्का मिळाला. बिल कोणी भरले याची चौकशी करता दूरवर उभ्या असलेल्या शिंदे यांचेकडे मॅनेजरने बोट दाखवले. श्री. शिंदे यांची मग भेट घेतली व त्यांना पैसे देऊ केले तर अत्यंत नम्रपणे त्यांनी ते नाकारले आणि म्हणाले, इतक्या चांगल्या संस्थेतील मुले आमच्याकडे आली आहेत, त्यांच्यासाठी थोडा खर्च झाला तर कुठे बिघडले? श्री. शिंदे यांच्या चेहऱ्यावर आपण जणू काही केलेलेच नाही असे भाव होते. ज्यांची गुजराण रोजच्या श्रमावर अवलंबून आहे असे श्री. शिंदे हे त्या क्षणी 'सुदामाच' वाटले. एका शिबिरार्थी विद्यार्थ्याने जवळच्या एका झाडावरील दोन फुले खुडली, ती शिंद्याच्या हातात देऊन त्यांना कृतज्ञतेने नमस्कार केला व त्याच भारावल्या स्थितीत सर्व शिबिरार्थी बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या बाहेर पडले.

## १०) युवती शिबिर अहवाल

कु. दिपाली पवार

यावर्षी युवती गटाचे शिबिर प्रथमच सिंहगडावरती आपटे बंगला येथे दि. ३१/१०/९८ ते १/११/९८ घेण्यात आले. शिबिराची एकूण संख्या १७ होती. शिबिर सिंहगडावरती असल्याने शिबिरातील एकूणच वातावरण प्रसन्न होते. शिबिरात सुरुवातीचे सत्र श्री. कवठेकर सरांचे होते. श्री. कवठेकर सरांचा विषय संपर्क असा होता. सरांनी संपर्क हा विषय मांडताना कार्यहानी होऊ नये या करिता आचार, विचार, उद्‌गार यांचे भान राखणे, संपर्कात आलेल्याचे मन समजून घेऊन त्याला जपणे, कार्यकर्त्यांची मानसिकता आत्मविलोपी असावी इ. मुद्दे विविध उदाहरणे देऊन कार्यकर्त्यांच्या समोर ठेवले.

दुपारच्या सत्रात सौ. संगिताताई भंडगे यांनी सावित्रीबाई फुले यांचे चरित्र सांगितले. चरित्र सांगताना संगितताईने आजच्या काळातही सावित्रीबाईंचे विचार कसे आचरणात आणावे हे देखील सांगितले. सावित्रीबाईंच्या जीवनातील अनेक प्रसंग, जबरदस्त ध्येयनिष्ठा अशा अनेक गोष्टी सांगितल्या. माणूस घडविण्याचे शिक्षण हेच खरे शिक्षण आहे, असे विचार ऐकताना मनात "स्व'-रूपवर्धिनीचे काम हेच आहे' असा विचार चमकून गेला. सावित्रीबाई स्वतः चिंतन-मननातून शिकल्या. त्या काळात अशी बिकट परिस्थिती असताना त्यांनी केलेले कार्य ऐकताना आज आपण जे काम करतोय ते किती सुरक्षित आहे

याची जाणीव झाली.

दुपारी भोजनानंतर गटचर्चा झाली. त्यामध्ये उत्तम शाखेची लक्षणे काय आहेत यावर सर्वांची चर्चा झाली. उत्तम शाखा म्हणजे काय? ती कशावर आधारित आहे या व अशा अनेक मुद्दयांवर चर्चा झाली.

दुपार नंतर श्री. कृष्णराव पटवर्धन सरांचे सत्र झाले. सरांनी अनेक छोटे छोटे प्रसंग सांगितले 'अपमान व औषधाच्या गोळ्या गिळायच्या असतात चघळायच्या नसतात'. तसेच 'सेवा व्यक्तीची व भक्ती समाजाची करावयाची' हेही सांगितले. भूतकाळावर कणखर विश्वास ठेऊन भविष्यकाळ घडविण्यासाठी कंबर कसली पाहिजे, कार्य उभारणीसाठी दैनंदिन यज्ञ करावाच लागतो असे सांगितले.

रात्री जेवणानंतर मंगलताईंचे सत्र झाले. मंगलताईंनी आसाममध्ये काम करताना काय काय करावे लागते, आसामची सद्यस्थिती काय आहे. हे सांगितले. रात्री सिंहगडावर नेमके दिवे नव्हते. पण मंगलचे सत्र चालूच राहिले. बाहेर अंधार होता पण सत्र चालू असताना मनात मात्र लख्ख उजाडत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी व्यायाम व उपासना झाली. सिंहगडावरती कबड्डीचा खेळ छानच रंगला. त्यानंतर आत्मनिवेदनाचे सत्र झाले. आत्मनिवेदनाचे सत्र साऱ्यांनाच अंतर्मुख करणारे ठरले. प्रत्येकाचे आत्मनिवेदन आत्मपरीक्षण करून व मनाला आत्मसाक्षी ठेऊन केलेले असल्याने सर्वांनाच ते आत कुठेतरी खोलवर जाऊन भिडलेले होते. म्हणूनच साऱ्यांनाच अश्रु आवरत नव्हते. शेवटी फारच गंभीर वातावरण झाल्याने आत्मनिवेदन सत्र मध्येच थांबवावे लागले. युवती गटात वावरताना रोज भेटणाऱ्या सर्व युवती खूप वेगळ्या भासल्या. रोज एकमेकांशी बोलणे हे होत असते. परंतु आत्मनिवेदन सत्रातून प्रत्येकीची खरी ओळख व्हायला मदत झाली. प्रत्येकीच्या मनात जे काही दडले होते ते ऐकताना मन वेगळ्याच विश्वात गेले. अजूनही आपण एकमेकांच्या खूप जवळ यायला हवयं हे जाणवले. कोण कोण काय काय परिस्थितीला तोंड देऊन उभे राहिले आणि काम करतयं हे ऐकताना मी स्वतः खूप बधिर झाले होते. अजूनही आपण 'सगळ्यांनी सगळ्यांचे व्हायला हवयं' हे जाणवले.

शिबिरात श्री. रामभाऊ डिंबळे यांचे सत्र झाले. रामभाऊंनी अनेक छोट्या छोट्या प्रसंगातून ते स्वतः कसे घडले व आता कशा प्रकारचे काम केले पाहिजे हे सांगितले.

समारोपाच्या सत्राला श्री. सुभाषराव देशपांडे आले होते. अत्यंत सुंदर शब्दात त्यांनी त्यांचे स्वतःचे अनुभव सांगितले. ज्ञानप्रबोधिनीत कै. अप्पांनी त्यांना कसे घडवले हे सांगितले. तसेच अनेक उदाहरणे देऊन आपल्या कामाची पध्दती सांगितली.

समारोपानंतर गड उतरताना सर्वजणी अत्यंत भारावलेल्या मनाने पावले टाकत होत्या.

### ११) प्रेरणादायी चरित्र अभ्यास शिबिर : शिबिर प्रमुखाच्या भूमिकेतून

- प्रशांत वेदपाठक

आत्तापर्यंतच्या शिबिरात मला कधीही कोणती

महत्त्वाची जबाबदारी संपूर्णपणे एकट्याला सांभाळावी लागली नव्हती. पण यावर्षीच्या मे महिन्याच्या शिबिराचा शिबिरप्रमुख म्हणून माझ्यावर जबाबदारी सोपवण्यात आली. शिबिर होते ५वी ते ७वी च्या गटाचे. शिबिरार्थी विद्यार्थ्यांची संख्या होती १५०. छोट्या गटाचे शिबिर असल्याने या शिबिरासाठी मला जी खास तयारी करावी लागली ती म्हणजे माझ्या स्वभावात मी थोडा मिश्कीलपणा आणण्याचा मी प्रयत्न केला. शिबिरही माझ्या आवडत्या ठिकाणी म्हणजे पुणे विद्यापीठ आवारातील शिशुविहार विद्यालयात होते. 'प्रेरणादायी चरित्रांचा अभ्यास' असे या शिबिराचे विषयसूत्र होते. शिबिर २६/१० ते ३१/१०/९८ या कालावधीत संपन्न झाले. या शिबिराचा तपशीलवार वृत्तांत सांगणे सहज शक्य आहे. तशा सर्व नोंदी माझ्या दैनंदिनीत आहेतच. पण या शिबिरातील वैशिष्ट्यपूर्ण ठळक घटना, गोष्टी, प्रसंग, कार्यक्रम याचा थोडक्यात आढावा पुढे मांडत आहे -

♦ याच कालावधीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठीची शिबिरे चालू होती. अनेक युवक कार्यकर्ते हे या शिबिरांमध्ये गुंतलेले असल्याने उपलब्ध युवक कार्यकर्त्यांच्या आधारावरच हे शिबिर पार पाडावे लागले. शिबिरप्रमुख म्हणून मला फारसे काम करावे लागणार नाही असा जो माझा भ्रम होता त्या भ्रमाचाही भोपळा फुटला.

♦ शिबिरामध्ये पहिल्यांदाच सकाळच्या सत्रात उपासनेपाठोपाठ भक्ती गीतांचा समावेश केला होता. सकाळच्या प्रसन्न वेळात भक्तीभाव जागवण्यासाठी हे माध्यम खूप चांगला परिणाम साधेल असा विश्वास वाटतो.

♦ एखादे सत्र आयत्यावेळेस रद्द झाल्यास पर्यायी सत्राची रचना आधीच करून ठेवायला हवी. हे या शिबिरात शिकायला मिळाले. असा एक प्रसंग आला होता पण त्यावर मात करता आली.

♦ शिबिरातील प्रत्येक दिवशी दुपारच्या सत्रात जी गटकार्ये होती ती कृतीसत्रे होती. मैदानावर १५० शिबिरार्थी, त्यांचे गटप्रमुख व युवक कार्यकर्ते गटकार्यासाठीच्या विषयाचा कृती कार्यक्रम मैदानावर साकारत होते. यामध्ये आदर्श शहर रचनेची प्रतिकृती, भारतीय मानचित्र परिचय अशा विषयांचा समावेश होता.

♦ लहान मुलांसमोर विषय मांडताना शैलीत कसा बदल करावा लागतो याचे नेमके मार्गदर्शन श्री. मोहन शेटे, दि. दा. जोशी सर यांच्या सत्रांमधून झाले.

♦ भावनापूर्ण विषयाचा तसेच जोशपूर्ण वीररसातील कथांचा मुलांच्या आत्मविश्वासावर कसा परिणाम होतो हे सौ. बागेश्री पोंक्षे व मंदार परळकर यांच्या सत्रांच्या वेळी प्रत्यक्ष अनुभवता आले.

♦ मुलांना समजतील व त्यांना चर्चेत सहभागी होता येईल असे विषय गटचर्चेसाठी होते. उदा. आमची शाखा, आपले घर (भारतीय घर) कसे असावे, मी मोठेपणी कोण होणार इत्यादि.

♦ मुलांना सर्वांच्या पुढे येऊन बोलता यावे, रंगमंचावर सहजतेने वावरता यावे या दृष्टीकोनातून संस्कारभारती संस्थेच्या कार्यकर्त्यांनी शिबिरातील सर्व दिवशी संध्याकाळी 'अभिव्यक्ती विकास' सत्र घेतले. अभिनय करताना त्यात सांघिक सादरीकरण, वाचिक व कायिक अभिनय या सर्व

गोष्टींचा पाठपुरावा दररोज केला गेला. मुलांचा उत्स्फूर्त सहभाग या सत्रामध्ये असायचा. समारोप सत्रात या शिक्षणाचा शिबिरार्थी मुलांनी योग्य तो उपयोग करून प्रभावी प्रसंगनाट्ये सादर केली.

◆ शिबिरातील पहिल्याच रात्री, 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या विषयावर श्री. प्रदीपराव आगाशे यांचे कीर्तन झाले.

◆ काही कारणाने सत्राच्या विषयात कृ. ल. पटवर्धन सरांना बदल करावे असे वाटले. पण तसा बदल करण्यापूर्वी शिबिरप्रमुख या नात्याने पटवर्धन सरांनी माझी परवानगी मागितली. कुठल्याही व्यवस्थेचा मान कसा ठेवावा अथवा कसा ठेवला जावा याचे नेमके उदाहरणच माझ्यासमोर त्यांनी ठेवले.

शिबिरात आलेले अनुभव खूप आहेत. अगदी डोळ्यात पाणी आणणारेही आहेत. परंतु ज्या शिबिरात मुलांच्या भावनांना प्राधान्य दिले जाते, त्यांच्या भावविश्वात जाण्याची संधी मिळते, त्यावेळेस थोडावेळ का होईना स्वतःच्या भावनांना दूर सारावे लागते. हेच प्रामुख्याने माझे या शिबिरातील शिक्षण.

## १२) दोन शिबिरे सुंदरमठातील

धबाबा वाहती धारा ।
धबाबा तोय आदळे ।

अशा साक्षात समर्थांच्या वाणीने अलंकृत झालेल्या 'धबधब्या'च्या घन गंभीर सानिध्यात वर्धिनीची दोन शिबिरे शिवथरघळीतील सुंदरमठात आयोजित केली होती.

पहिलं शिबिर दोन दिवसांचे होते. या शिबिरात सर्व शाखांचे शाखाप्रमुख, व्यवस्थाप्रमुख उपस्थित होते. 'गेल्या बारा वर्षातील वर्धिनीतील युवक विभागाच्या शाखा कार्याचे मूल्यांकन' व शाखेवरील कार्यक्रम व्यवस्था, मैदान व्यवस्था, अभ्यास तासिका व्यवस्था व संपर्क व्यवस्था या महत्त्वाच्या विषयांना अनुसरून प्रदीर्घ चिंतन बैठक असे या शिबिराचे स्वरूप होते.

दुसरं शिबिर हे युवकांच्या युयुत्सु वृत्तीला प्रतिसाद देणारं होतं. ऐन आषाढातील कोसळत्या जलधारांमध्ये आणि कोकण घाटातील झेपावत्या प्रपातांमध्ये न्हाऊन निघत, सचैल स्नानाचा आनंद लुटत, वर्धिनीचे पन्नास युवक वीस किलोमीटरचा केळद ते शिवथरघळ असा अखंड दिवसभराचा प्रवास करून सायंकाळी सुंदरमठात पोहचले.

दुसरे दिवशी प्रातःकाळी उपासनेनंतर मा. श्री. मामासाहेब गांगल यांनी 'उपासनेला दृढ चालवावे' या समर्थांच्या बोधवचनाचे सार सर्वांच्या समोर मांडले. ॲडव्होकेट श्री.नंदूजी फडके यांनी मांडलेला 'देशाची सद्यःस्थिती आणि तरुणांपुढील आव्हाने' हा विषय अत्यंत ओजस्वी भाषा व प्रेरक विचारांनी संपन्न असा होता. त्यानंतर डॉ. गिरीशराव बापट यांनी 'स्वामी विवेकानंद', यांचे जीवनचरित्र पुढे ठेवले. 'देशाच्या प्रपंचाची चिंता करणारा संन्यासी' अशा शब्दांनी त्यांनी स्वामीजींच्या जीवनाचे सार सर्वांसमोर ठेवले.


राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर प्रचारक मा. श्री. मिलिंदराव ओक यांनी 'कार्यकर्त्यांकडून अपेक्षित असलेली गुणवत्ता' या विषयाची अत्यंत सूत्रबध्द व मौलिक अशी मांडणी केली होती. शिबिराचे समारोपाचे सत्रही त्यांचेच होते.

* * *

# "युरेऽऽका युरेऽऽका"

सौ. अनिता कुलकर्णी

गेल्यावर्षी नव्याने सुरू झालेल्या बालवाडी प्रशिक्षणवर्गाचे यंदा दुसऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण होत आहे ही अतिशय अभिमानास्पद गोष्ट आहे. 'स्व'-रूपवर्धिनीने घराघरातून साधलेल्या संपर्काचे हे एक फळ आहे. महिला विभागांर्तगत चालणाऱ्या विविध प्रशिक्षण वर्गांपैकी हा एक प्रशिक्षण वर्ग आहे. सोळा वर्षांपुढील महिला विशेषतः ज्या सामाजिक, आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या आहेत अशा या भगिनींसाठी, त्यांच्यात असणारा न्यूनगंड



काढून त्यांच्या खऱ्या स्वरुपाची ओळख करून देण्यासाठी, आत्मविश्वासाने स्वतःच्या पायावर उभे रहाण्यासाठी हा प्रशिक्षणवर्ग सुरू करण्याची आवश्यकता भासली.

इयत्ता दहावी पर्यंत न पाहोचलेल्या आठवी, नववी पर्यंतच शिक्षण अर्धवट झालेल्या महिलांसाठी काही तरी करणं हा या मागचा महत्त्वाचा हेतू आहे.

आपल्या देशातील बालके ही आपली संपत्ती आहे त्यांची सर्वांगीण उन्नती व्हावी या दृष्टीने त्यांचा शारीरिक (स्वच्छता, स्वावलंबन, व्यवस्थितपणा) विकास, मानसिक विकास, सृजनशीलतेचा विकास, राष्ट्रीय वृत्तीचा विकास व्हावा यासाठी बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग असावा असे वाटले. त्यासाठी प्रशिक्षणाचा कालावधी हा एक वर्षाचा असावा असे ठरले. या एक वर्षाच्या कालावधीत प्रशिक्षणार्थी शिक्षिका ही खेळ, कला, हस्तव्यवसाय, जीवनव्यवहार तसेच इतरही अनेक विषयात पारंगत व्हावी हा मुख्य उद्देश आहे. 'बाल शिक्षण परिषद' (राम जोशी) यांचा अभ्यासक्रम यासाठी निवडला आहे. प्रशिक्षणार्थी विद्यार्थींनींना घडवण्यासाठी येथे अनेक अनुभवी, तज्ज्ञ शिक्षक व शिक्षिका मार्गदर्शनासाठी येतात. 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूत बालवाडीचे नऊ वर्ग चालतात. सर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनींना बालवाडीच्या नऊ वर्गातून रोज प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण दिले जाते.

आवर्जून सांगावेसे वाटते की आमच्या या प्रशिक्षण वर्गात येणाऱ्या सर्व महिला प्रशिक्षणार्थी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेत आहेत. त्यांना आर्थिक व मानसिक धैर्य देऊन त्यांच्या पंखात बळ ओतण्यासाठी 'स्व'-रूपवर्धिनी सर्वार्थाने सज्ज आहे. उदाहरणच द्यायचे म्हटले तर आमच्या या विद्यार्थीनींच्या जेव्हा आम्ही मुलाखती घेतल्या तेव्हा असे जाणवले की, आमच्या जवळ-जवळ सर्वच विद्यार्थीनी या परिस्थितीने गांजलेल्या आहेत, दुःखी आहेत, समस्याग्रस्त आहेत. आमची एक विद्यार्थीनी आपल्या छोट्या बाळाला घेऊन येते. त्या बाळाच्या सर्व गरजा ती वर्गात कोणाला त्रास होणार नाही अशा भूमिकेतून भागवते. अर्थात वर्गातील सर्व विद्यार्थीनी व शिक्षक यांचेही सहकार्य तिला लाभते.

दुसऱ्या विद्यार्थीनीची आई, तिचे 'आई व वडील' अशा दोन्ही भूमिका पार पाडते. आईचा व्यवसाय भाजी विकण्याचा. वडिलांचा पत्ता नाही. मुलीने चांगलं शिकावं, मोठं व्हावं ही त्या माऊलीची धडपड !

तिसरीची आर्थिक सुस्थिती पण मानसिक बळ कमी झालेलं, नैराश्य आलेलं. तिला रोज रात्री झोपेची गोळी घेतल्याशिवाय झोप येत नव्हती. पण तिचा वर्धिनीतला अनुभव तिनं सांगितला - - 'ताई, मी या प्रशिक्षण वर्गात आल्यापासून या चिमण्या जीवांमध्ये इतकी रमते की, घरी गेल्यावर झोपेची गोळी न घेताच झोपते, दुसऱ्या दिवशी तेवढ्याच उत्साहाने इथे येण्याकरता !'

चौथ्या विद्यार्थीनीची कथा आणखीनच वेगळी, दोन लहान छकुल्यांची जबाबदारी पूर्णपणे हिच्यावरच. अतिशय लहान वयात हिला वैधव्य आलं. सासऱ्यांचं छत्र किती दिवस पुरणारं ? हा व्यवहारी दृष्टिकोन समोर ठेऊन आपल्या दोन छकुल्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहाता यावे यासाठी तिने ह्या प्रशिक्षणाचा योग्य निर्णय घेतला.

अशा या फुलू पाहणाऱ्या कळ्यांचे निःश्वास ऐकल्यानंतर त्यांना फुलवण्यासाठी, आकाशात उंच भरारी मारण्यासाठी आमचे प्रयत्न हे कमी पडायला नकोत असे जाणवले. या अशा विद्यार्थीनींना सर्वदृष्टीने सहकार्य करायचे हे माझ्या मनाने पक्के ठरविले व या विद्यार्थीनींची

*With Best Compliments From :*

**M/S POONA MOTOR GOODS TRANSPORT**

Head office - 789, Sadashiv Peth, Pune - 411 030

☎ 473222, 477621, 476914.

Fleet owners & transport Contractors

Full load & Part load service for Pune to Bombay & vice-version.

Full truck load service for maharashtra & Gujrat State.


वर्गशिक्षिका म्हणून मी जबाबदारी स्विकारली. योग्य वेळी योग्य ठिकाणी आपण आलोत याची मनोमन खात्री पटली. वर्धिनीत येण्यापूर्वी माझी अवस्था खालीलप्रमाणे होती.

काय करावे कुठे जावे
काही सुध्दा कळत नव्हते
जीवनाचे ध्येय माझे
मलाच का गवसत नव्हते
वाटत होते करावी सेवा असहाय्यांची
श्वेत काठी बनावे आंधळ्यांची
भुकेल्यांना अन्न द्यावे
पांघरायला वस्त्र द्यावे
अंधाऱ्या झोपड्यात त्यांच्या
प्रकाशाची तिरीप व्हावे
इतरांसाठी जगता जगता
एक दिवस संपून जावे
साधे सरळ स्वप्न माझे.
वाट मात्र मिळत नव्हती
स्वार्थाच्या पाशातून माझे
मन बाहेर पडत नव्हते

पण आता - - -

माझ्या या विद्यार्थीनींच्या सहवासात, 'स्व'-रूपवर्धिनीत आल्यानंतर मात्र मोठ्याने युरे ऽऽऽ का! युरे ऽऽऽ का! असे ओरडावेसे वाटले.

औपचारिक-अनौपचारिक गप्पांच्या माध्यमातून येथे येणाऱ्या अनेक महिलांच्या समस्यांची जाणीव झाली तेव्हा 'स्व'-रूपवर्धिनीच्या या प्रकल्परूपी रोपट्याचे मोठ्या वटवृक्षात रुपांतर होवो, समाजातील दुःखी व पीडीत महिलांना त्याची छाया, लाभो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना ! तसेच वर्धिनीचे हे बालशिक्षण सेवाव्रत अनेकांना उपयुक्त होवो हीच ईश्वरास विनवणी.



---

## दीपस्तंभ

- तुम्ही पूर्ण निःस्वार्थ आहात ना? मग तुम्हाला कुणीही पराजित करू शकणार नाही. चारित्र्याचाच सर्व ठिकाणी जय होतो.
- मत्सर आणि अहंकार यांचा त्याग करून दुसऱ्याच्या हितासाठी एकजुटीने कार्य करण्यास शिका. याचीच आपल्या देशाला आज गरज आहे.
- जोवर श्रध्दा, सचोटी आणि अढळ निष्ठा तुमच्या ठायी आहेत, तोवर सर्व बाजूंनी तुमची भरभराटच होईल.

स्वामी विवेकानंद

## 'कमल, नीला, उषा आणि मरिअम्मा'

श्रीमती पुष्पा नडे

पांढरी स्वच्छ साडी नेसलेली व मानेवर छान घट्ट अंबाडा घातलेली कमल, कार्यालयाच्या दारात पेढ्याचा पुडा घेऊन उभी राहिली आणि क्षणभर माझे डोळे चमकले. हीच का ती कमल? काही महिन्यांपूर्वी आपल्याकडे होमनर्सिंगचा कोर्स पूर्ण केलेली. तिला कधी नीट साडीपण नेसता येत नसे. सतत घाबरलेल्या अवस्थेत. स्वतःबद्दल विश्वास न वाटणारी. कोणी कितीही बोलले तरी न रागावणारी. प्रयत्नपूर्वक अभ्यासात मन एकाग्र करणारी. अशी कमल डोळ्यापुढून चटकन सरकून गेली. अन् मी पटकन भानावर आले. कमल दारात तशीच उभी होती. तिला आत बोलावले. तिच्या चेहऱ्यावरील आनंद बघून खूप खूप समाधान वाटले. "कशी आहेस कमल?" "तुम्हाला कशी दिसते?" असा प्रतिप्रश्न विचारुन "मी आता खूप छान आहे. सर्व विवंचना आता संपल्या". असे तिने उत्तर दिले आणि पेढ्याचा पुडा उलगडला. पेढा हातात देत म्हणाली,"यापूर्वी मी तुम्हाला खूप पत्र पाठवली. तुम्ही माझे काम पहायला या असे लिहिले होते. पण तुम्ही काही आला नाहीत. आता मी पुण्यातच कामाला लागले आहे, तुमच्याजवळच. खडकीतल्या फॅक्टरी हॉस्पिटलमध्ये. हॉस्पिटलच्याच आवारात रहायला मला दोन खोल्यांचा ब्लॉक पण मिळालाय. आईला घेऊन तिथेच रहाते." असे म्हणून तिने कार्यालयातील सर्वांना पेढे वाटले. "मला आता शिफ्ट आहे. माझे काम पहायला आणि आईला भेटायला आलात तर आईला खूप बरे वाटेल". असे म्हणून कमल गालात हसली व कार्यालयाबाहेर पडली. तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पहातच राहिले. क्षणभर डोळ्याच्या कडा ओल्या झाल्या. मला आठवले कमलने कोर्स किती महत्प्रयासाने पूर्ण केला ते. काही महिन्यांपूर्वी तिची पत्रं आली होती. त्यात तिने लिहिले होते " मला आमच्या भावाच्या आरोग्यकेंद्रात काम मिळाले आहे. ५०० रु. पगार आहे. आई आता तिचे काम थोड्या दिवसांनी सोडेल". नंतर काही दिवसांनी पुन्हा पत्र आले. "आता माझा पगार वाढला आहे. १००० रु. झाला आहे. आता जवळजवळ पूर्ण दवाखाना मीच सांभाळते. आणि आता आईने पूर्ण काम सोडले आहे. आईला आता मी खूप सुखात ठेवू शकते. तुम्ही जरूर जरूर माझे काम पहायला या. माझ्यात झालेला बदल तुम्हाला आवडेल". पण येथील कामामुळे कमलचे काम पहावयास मिळालेच नाही. पत्राचे उत्तर देऊनच तिचे समाधान करण्याचा प्रयत्न केला.

कमलने ज्यावेळेस कोर्स करण्यास सुरूवात केली त्यावेळी तिची परिस्थिती खरोखर शोचनीय होती. आळंदीपासून पुढे असलेल्या गावात ती रहात होती. सोबत दोन भाऊ, भावजया व म्हातारी आई. दोन्ही भावांचा कोर्स करण्याबाबत सतत विरोध. यावरून आईशी टोकाची भांडणे पण झाली. नुसती भांडणे होऊन थांबली नाही तर हे प्रकरण पोलिसचौकीत व पुढे कोर्टापर्यंत गेले. परंतु आई मात्र जिद्दी. त्या माऊलीने चार घरची भांडी घासून तिच्याकडून कोर्स पूर्ण करून घेतला. कमलने पण तो तितक्याच आत्मीयतेने पूर्ण केला. मला आठवते कमलबद्दल तिच्या शिक्षिका कधीकधी म्हणायच्या " आम्हाला नाही

वाटत ही मुलगी पास होईल असं !" परंतु तिने अजिबात नाराज न होता सगळ्या संकटांना तोंड देऊन अभ्यास केला. ती पास झाली अन् आता एवढ्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये आत्मविश्वासाने व निर्भयतेने आपल्या आईबरोबर नोकरी करून रहात आहे.

मधल्या एका वेळी तिच्या घरी जाऊन आले. तिच्याबरोबर तिची म्हातारी आई आनंदाने राहताना पाहून समाधान वाटले. तिच्या घरातून बाहेर पडताना मात्र मनात एक विचार आला. कमलच्या आईसारखी आई, अशा प्रतिकूल परिस्थितीशी झगडणाऱ्या मुलींना मिळाली तर समाजात अशा मुली दुःखी व बेबस राहणार नाहीत! समाजातील दुःख थोड्या अंशाने तरी कमी होतील!

♦ कमलची आठवण काढता मला नुकताच कोर्स पूर्ण करून गेलेली नीला आठवली. स्त्रिया ह्या जात्याच सहनशील असतात. त्याग करण्यात त्यांना आनंद वाटतो. परंतु ज्या तारुण्यात निरनिराळी स्वप्ने रंगवायची त्या तारुण्यात ती स्वप्ने सोडून नीलाला वेगळाच व कठोर निर्णय घ्यावा लागला तो म्हणजे लग्न न करण्याचा. परिस्थिती व प्रकृती अशा दोन कारणांनी तिला हा निर्णय घ्यावा लागला. नीला घरातली सर्वात मोठी मुलगी. तिच्या नंतर बहिणी. वडील एका खाजगी ठिकाणी काम करतात. वडिलांची प्रकृती ठीक नसते. त्यामुळे दिवस भरतील तसे पैसे मिळणार. आई घरकामात. तिला दिवस कधी संपतो कळत नाही. अशा परिस्थितीत घरात मोठी म्हणून नीलावर जबाबदारी. आपण घरात मोठे त्यामुळे वडिलांना थोडा हातभार लावणे आवश्यक आहे. म्हणून तिने आपल्या वर्धिनीमध्ये होमनर्सिंगचा कोर्स पूर्ण केला. या शिवाय परमेश्वराने नीलाच्या झोळीत आणखी एक दुःख जन्मताच टाकले ते म्हणजे जन्मापासूनच हृदयाला छिद्र आहे. व डॉक्टरांनी सांगितले या ऑपरेशनला किमान दीड लाख रू. खर्च आहे. व तो करूनही तो आजार पूर्ण बरा होईल की नाही शंका आहे. याशिवाय ऑपरेशन नंतर काही महिने विश्रांती आवश्यक. या सर्वाला उत्तर म्हणजे ऑपरेशन करावयाचे नाही. मिळेल तेवढे आयुष्य जगायचे व त्या वेळात मिळेल ते काम करून आईवडिलांच्या संसाराला मदत करायची व आपण लग्न करायचे नाही असा निर्णय नीलाने घेतला. अन् गंमत म्हणजे कोर्स संपल्याबरोबर नीलाला एक छान काम मिळाले. साधारण १५०० रू. पगार आहे. तो ती घरात देते. भावंडांना शिकवते. काम करून घरात आईला मदत करते. घरात आनंदी वातावरण ठेवण्याचा प्रयत्न करते. सर्वांना आनंद देणारी नीला स्वतः किती मोठे दुःख उराशी बाळगून आहे. पण त्याचे तिला काही नाही.

♦ नीला व कमलसारख्या अशा कित्येक मुली / महिला वर्धिनीत विविध कोर्स करून गेल्या. स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या. आणि आपल्या कुटंबाला सुखी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु उषा मात्र निराळीच निघाली. तिने स्वतःपुरते कधी पाहिलेच नाही. उषा ही परित्यक्ता. एका मुलाची आई. सासरी पटेना. सतत भांडणे होत असत. अशा वातावरणात आपल्या मुलाचे संगोपन नीट होणार नाही म्हणून माहेरी आली. वडिलांनी पण तिला आसरा दिला. तू तुझ्या पायावर उभी रहा. उगाच कोणावर अवलंबून राहू

नको म्हणून सल्ला दिला व मार्ग दाखविला. त्या मार्गाने ती चालली. वर्धिनीत कोर्स पूर्ण करून डॉक्टर बोडसांकडे ती काम करीत राहिली. परंतु मुलांच्या जबाबदारीची जाणीव तिला स्वस्थ बसू देईना. म्हणून त्याबरोबर तिने वाडिया हॉस्पिटलमध्येही काम मिळवले. या दोन्ही ठिकाणी दवाखान्यात काम करीत असताना तिच्या संपर्कात तिच्या सारख्या दुःखी कष्टी महिला भेटल्या की ती त्यांना सांगे "तुम्ही वर्धिनीत जा. तुम्हांला मार्ग सापडेल." आणि वर्धिनीतील कोर्स पूर्ण केलेल्या मुलींसाठी अमुक ठिकाणी काम आहे. मुली / महिला असेल तर पाठवून द्या असं म्हणून फोन करणारी उषा दिवसभर कामात व सायंकाळी गेल्यावर आपल्या मुलात रमून जाते. तिचे स्वतःचे दुःख उगाळायला तिला सवडच मिळत नाही. उषाच्याच प्रयत्नाने दोन तीन मुली व महिलांना डॉ. बोडसांकडे काम मिळाले. आता उषा वाडिया हॉस्पिटलमध्ये कायम होणार आहे. तिचा मुलगा यंदा दहावीत आहे. उषा आता खूपच विचारी व शांत झाली आहे. शिवाय सतत बडबडणारी उषा दुसऱ्याला आपण कसं जगावं, जीवनातील आनंद कसा मिळवावा हे सांगत असते. कोर्स केल्यानंतर तिच्यात खूपच बदल झाला आहे. वर्धिनी तिला माहेर वाटते. तिला जेव्हा वाटते तेव्हा येते. आपलं मन मोकळे करते व जाते.

◆ आणखी एक आगळा वेगळा अनुभव. काही अनुभव खूपच हृदयद्रावक असतात, त्यातीलच एक. रात्री १० ची वेळ. मी माझ्या कामात मग्न होते. मुली अभ्यासाला आलेल्या. संकष्टीचा स्वयंपाक करण्यात मी गुंतलेली. तेवढ्यात दारावरील बेल वाजली. म्हणून दार उघडले. तर समोर मरिअम्मा रडत तीन मुलांना घेऊन आलेली. अंगावरील कपडे फाटलेले. नवऱ्याचा प्रचंड मार खाल्लेला. मुले भेदरलेल्या अवस्थेत. माझ्याकडे पहात आईला बिलगलेली मुलं. दृश्य फारच करूण होते. तिला आत घेतले. तिला म्हटले, "काही बोलू नकोस. तू आता प्रथम साडी बदल. हातपाय धू. थोडे खा. मुलांना खाऊ घाल आणि झोप. उद्या सकाळी पाहुया" असे म्हणून तिला एक साडी दिली. खाऊ घातले. तिच्याकडे पाहून डोळ्यापुढे सर्व चित्र आले. नक्की काय झाले असेल याचा अंदाज आला होता. ती मुलांना घेऊन झोपली पण माझी मात्र झोप उडाली.

दारू पिऊन मारतो म्हणून तिच्या नवऱ्याला एक वर्षाची सजा झाली होती. येरवडा जेलमध्ये सहा महिने सजा भोगून झाली होती. पण मरिअम्माच्या सासूने व नणंदेने 'तुझ्यामुळे माझा मुलगा तुरुंगात पडला त्याचे किती हाल झाले असतील' असे म्हणून तिला मारणे, तिच्याशी सतत भांडणे चालू केले होते. दोनच दिवसांपूर्वी १००० रू. दंड भरून सहा महिन्याची सजा झाली असता आम्ही त्याला सोडवून आणले होते. त्या रात्री त्याने येऊन सांगितले की "मी आता त्रास देणार नाही." अन् दोन दिवस पण गेले नाहीत तो त्याने बायकामुलांची अशी अवस्था करून टाकली होती. काय करावे असा प्रश्न पडला. दुसऱ्या दिवशी सायंकाळी तिला एका कार्यकर्त्याबरोबर चौकीवर पाठवले त्याबरोबर दोन पोलिस त्याला पुन्हा पकडायला आले. तो वर्धिनीत येऊन पाया पडायला लागला, 'तुम्ही म्हणाल तसे वागतो, पुन्हा असे करणार नाही' पुन्हा त्याला सुधारावयास एक संधी द्यावी म्हणून

पोलिसांना परत पाठवले.

मरिअम्माच्या नवऱ्याला एका ठिकाणी नोकरीला लावले. तेथील पगार तो वर्धिनीत आणून देतो. तो म्हणाला माझ्या बायकोला लागतील तसे पैसे द्या. पण पैसे मी माझ्याकडे ठेवणार नाही. नाहीतर मी पुन्हा ते दारूत घालवीन. आता ५/६ महिने झाले. तो अशा पध्दतीने वागत आहे. बायकोला मारत नाही. महिनाभर पुरेल असा पगार आहे त्यामुळे दोन्ही वेळा स्वयंपाक ती करू शकते. तो मात्र केव्हातरी दारू पीत असतो. पण पूर्वीपेक्षा ठीक आहे. पूर्वीच्या मानाने खूप सुधारणा आहे. हळूहळू हे पिणेही सोडेल असे वाटते. पाहू या.


वर्धिनीत काम करत असतांना अनेक गोष्टी शिकावयास मिळतात. महिलांचे काम करत असताना त्यांच्याकडून, तर कधी छोट्या शिशुंकडून, कधी त्यांच्या पालकांकडून खूप शिकायवयास मिळते. पण हे सारे सांभाळत असताना स्वतःच्या मनाचा तोल सावरणे मात्र फार अवघड जाते. त्यासाठी छान छान पुस्तके वाचली की त्यातून मात्र मनाला आवश्यक अशी उभारी येते. पण अजूनही रोज वर्तमानपत्रातून येणाऱ्या बातम्या वाचल्या की मग मात्र मन सुन्न होते. महिलांच्या वाट्याला येणारे अत्याचार वाचून मन खिन्न होते. अन् अशा वेळी मनःचक्षूंपुढे महिलांवर अत्याचार करणारे हे नराधम आठवतात. आणि त्याच वेळी महिलांसाठी स्वतःचे जीवन पणाला लावणारे काही थोर समाजसुधारक अन् विदुषीदेखील आठवतात. असेच एकदा स्वामी विवेकानंदांचे एक पुस्तक वाचत असताना त्यांची काही पत्रे वाचनात आली. लक्षात आले की स्वामींना महिलांबद्दल किती कणव होती! ते कुठेही असले तरी भारतातील स्त्रियांचा विचार करीत असत. त्यापैकी एका पत्रात त्यांनी आपल्या गुरुबंधुंना आपले विचार कळवले. अमेरिकेत सर्वधर्मपरिषदेच्या वेळी ते गेले असता तेथील स्त्रीजीवन पाहून स्वामीजी भारावून गेले 'रुपाने लक्ष्मीसारख्या व गुणाने सरस्वतीसारख्या साक्षात जगदंबांना' पाहून त्यांना वाटले आपण (भारतीय) काय माणसे आहोत? असे म्हणून त्यांनी पत्रात लिहीले 'मृत्यूपूर्वी अशा साक्षात जगदंबेसारख्या असणाऱ्या सहस्त्र स्त्रिया जर मी आपल्या देशात निर्माण करु शकलो तर मला शांतिपूर्वक मरण येईल. असे जर होईल तरच आपल्या देशातील लोक मनुष्य या संज्ञेस पात्र होतील' आज १०० वर्षांनंतरदेखील स्वामीजी म्हणत होते ते किती तंतोतंत खरे आहे ! आपण मनुष्यत्वच गमावून बसलो आहोत, नाही का!

पण कुठेतरी माणुसकी, मनुष्यत्व वर्धिनीसारख्या अनेक संस्थांमध्ये अजूनही टिकून आहे की जिथे महिलांना आत्मविश्वास, आत्मनिर्भरता, स्वावलंबी बनण्यास व स्वाभिमानाने जगण्यास शिकवले जाते. समाजातील ५० टक्के असलेला हा घटक असा विसरून कसा चालेल! त्यालाही आत्मसन्मानाने जगता आले पाहिजे व शेवटी कुटुंबव्यवस्थाही त्या घटकावरच अवलंबून आहे. त्याला विसरून चालणार नाही. आधी कुटुंब, त्यातूनच समाज व पुढे राष्ट्र. या सर्वांचे मोल या घटकाशी निगडीत आहे. आणि म्हणून वर्धिनीमध्ये सातत्याने महिला वर्गातून महिलांना आत्मनिर्भर बनविण्याचा प्रयत्न केला जातो.

## शोध कस्तुरीचा

सौ. वैभवी पाटील

मुळशी खोऱ्यातल्या संपर्क गावांमधल्या शाळांची सुटी इतर शाळांप्रमाणेच संपली. आणि नवीन वर्षाचे प्रयोगशाळेचे काम, त्याचे नियोजन याची चर्चा करण्यासाठी मी आणि गोडसे सर शाळांमध्ये गेलो. यावेळी अधिक उत्साहाने शाळांमधून स्वागत झाले. नवीन वर्षा ऋतु, डोंगरदऱ्या, शेतं-भातं सगळी कशी हिरवीगार. अगदी गालिचा पसरल्यासारखी. या नव्या उत्साहाला या सगळ्या बरोबरच शाळांच्या इ. १० वी च्या उत्साहवर्धक निकालांची जोड होती. खेचऱ्याच्या आप्पासाहेब ढमाले विद्यालय आणि कोळवणच्या न्यू इंग्लीश स्कूलचा निकाल तर गतवर्षीच्या तुलनेत दुपटीपेक्षा जास्त होता. गतवर्षी खेचऱ्याचा इ. दहावी चा निकाल ४०टक्के एवढा होता. यावर्षी तो ९५.४५ टक्के एवढा होता. तर कोळवणचा निकाल गतवर्षी ३३ टक्के होता तो यावर्षी ७४टक्के पर्यंत पोहोचला. खरचं, का नाही उत्साह वाटणार ! शाळांच्या यशाचे चढते आलेख पाहून




आम्हालाही खूप आनंद झाला, उत्साह वाटला. नवीन उपक्रम आखायला आणखी नवे आयाम मिळाले. शिक्षक विद्यार्थ्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच होते. अथक परिश्रम, प्रतिकूल वातावरण व गैरसोयींकडे दुर्लक्ष करून केवळ एकाच ध्येयानं प्रेरित झाल्यासारखे रात्रंदिवस शिक्षक, विद्यार्थी, प्रसंगी एकत्र राहून आखून अभ्यास करत होते, शिक्षक मार्गदर्शनासाठी उपलब्ध होत होते.

याच आनंदापोटी या शिक्षकांच्या सत्काराचा कार्यक्रम १ ऑगस्ट ९८ रोजी 'स्व'-रुपवर्धिनीच्यावतीनं आयोजित केला होता. स्थळ होतं पिरंगुट एम. आय. डी. सी. मधलं मिनिलेक इंडस्ट्रीजचे सभागृह. सर्वांना सोयीचे, मध्यवर्ती ठिकाण. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते मिनिलेकचे चेअरमन मोहनराव घैसास. बरोबर त्यांच्या पत्नी सौ. स्मितातार्डही उपस्थित होत्या. सर्व शाळांमधले शिक्षक, शिक्षिका, मुख्याध्यापक, काही ग्रामस्थ, सरपंच उपस्थित होते. मुळशी खोऱ्याशी सुपरिचित असणारे प्रबोध उद्योग समूहाचे संचालक श्री. रामभाऊ डिंबळे प्रमुख वक्ते म्हणून आले होते.

मुख्याध्यापकांच्या, शिक्षकांच्या प्रतिक्रियांमध्ये एक गोष्ट मात्र पुनः पुनः उल्लेखिली जात होती. ती म्हणजे या फिरत्या प्रयोगशाळेच्या प्रकल्पामुळे आमचा आत्मविश्वास जागृत झाला. अधिकाधिक काम करण्याची प्रेरणा मिळाली. विविध कल्पना मिळाल्या. विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांची खऱ्या अर्थाने जाणीव झाली. आणि अधिक कार्यक्षमतेने, जाणीवेने आम्ही विद्यार्थ्यांची तयारी करुन

घेतली. याला वर्धिनीच्यावतीने येणाऱ्या शिक्षकांचे नियमित मार्गदर्शन, तसेच शाळांशाळांमध्ये आयोजित केलेल्या तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या व्याख्यानांचा व अभ्यासवर्गांचा खूपच उपयोग झाला होता.
विद्यार्थ्यांनीही प्रत्यक्ष भेटीत व्यक्त केलेल्या भावनांनी आम्हा कार्यकर्त्यांनाही नवा हुरूप आला.
यावर्षी वर्षभर मार्गदर्शन शिबिरे, स्वदेशी जाणीव जागृतीसाठी प्रयत्न, पोखरण बॉम्बस्फोटाची माहिती, व्यक्तीशः काही विद्यार्थ्यांच्या अभ्यासातल्या



अडचणींविषयी विद्यार्थ्यांशी गप्पा, त्यातून मार्ग कसा काढू शकतो याची चर्चा असे खूप कार्यक्रम झाले. हे सगळे विद्यार्थीही खरोखर विश्वासाने, आपुलकीने सर्व विषयांची चर्चा करताहेत, बोलताहेत, अनेक विषयांवर मतं मांडताहेत. हा त्यांच्यातला बदल खरोखरच खूप सुखद आहे. या सर्व बदलांमुळे जाणवणारा प्रतिसाद खूपच होकारात्मक आहे. ही गोष्टही उपक्रमात नवा उत्साह आणणारी ठरते आहे.
वर्षभर प्रयोग, शिबिरे, व्याख्याने, शिक्षक प्रशिक्षण वर्ग असे चालू राहिले. या सात गावांमधील शिक्षकांसाठी दोन दिवसांचा प्रशिक्षण वर्ग चालू असताना शिक्षकांचा त्यातील उत्साही सहभागही त्यांच्या अनुकूलतेची प्रचिती देऊन गेला.
खेचऱ्यात दर मंगळवारी अल्पमोली आरोग्यसेवा आपण उपलब्ध केलीय. आठवडाभराच्या औषधांसाठी नाममात्र शुल्क ५/- रू. फक्त आकारून ही सेवा गावकऱ्यांना उपलब्ध होतेय. मुख्य रस्त्यापासून सुमारे ७-८ कि.मी. आत गांव. ठराविक वेळेतच एस.टी. उपलब्ध. या आरोग्यकेंद्राने गावकऱ्यांना खूप दिलासा मिळाला. भाताच्या हंगामात महिना महिना गुडघाभर चिखलात काम करणारे गावकरी चिखल्या, कंबरदुखी, सर्दी, ताप यांनी त्रस्त असतात. निसर्गावर अवलंबून असल्यामुळे काम सोडून पौडला जाणं त्यांना कधी शक्य होतं, कधी शक्य होत नाही. या केंद्राची जबाबदारी सांभाळणाऱ्या डॉ. सौ. दड्डी, ज्या आजवर गेली २७ वर्षे कॉर्पोरेशनच्या दवाखान्यात मेडिकल ऑफिसर होत्या, त्यांनाही या ग्रामीण रुग्णांचा खूपच अनुभव असल्यामुळे त्यांचे काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द समजायला त्यांना काहीच अडचण भासत नाही. दवाखान्यात येणाऱ्या रुग्णांकडूनही खूप शिकायला मिळतं. त्यांचा तो एकमेकांप्रती असलेला निखळ जिव्हाळा, प्रचंड कष्ट करण्याची तयारी, त्यांच्या त्या अथक परिश्रमातून फुललेली शेती पाहताना मन अगदी आनंदून जातं
'चाले' गावात प्रत्येक रविवारी चालणारा संस्कारवर्गही असाच! विविध अनुभवांनी परिपूर्ण असा. वर्धिनीचा कार्यकर्ता राजू येळवंडे या वर्गाची जबाबदारी सांभाळतोय. रविवारी वाट पाहणारी मुलं राजू सरांची गाडी दिसली की खूष. यांना मग वेळकाळाचं भान रहात नाही. नियमित वर्ग, शिबिर म्हटलं की यांच्या उत्साहाला पारावार रहात नाही. गेल्यावर्षी तर 'चाले' गावच्या यात्रेत मनोरंजनाचे जे कार्यक्रम झाले त्यात राजूसरांनी एक कार्यक्रम बसवला होता. कार्यक्रमासाठी वर्धिनीचे इतर कार्यकर्तेही चालेला गेले. रात्रभर

त्या यात्रेच्या कार्यक्रमांचा आनंद लुटला. गावकरी, शिक्षक, विद्यार्थी कुणालाच आता या संस्कारवर्गामुळे वर्धिनीच्या कार्यकर्त्यांशी परकेपणा राहिलेलाच नाही.

वर्षभरातील विविध गावांतील शाळांचे अनुभव इतर शाळांमध्ये जसजसे पोहचू लागले तसतशी शाळांची पत्रं वर्धिनीत यायला लागली. पुण्याच्या आसपासच्या शाळांची पत्रं येताहेत. आपण आपल्या परीनं पुरे पडण्याचा प्रयत्न करतो आहोत.

यात हवेली तालुक्यातल्या आंबेगावच्या शाळेत काम सुरु झालं. उत्साही मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या सहकार्याने विविध उपक्रम तिथेही चालू झालेत. यावर्षीच्या तिथल्या शिबिरात ग्रामस्थ सरपंचांचा सहभाग खूपच मोठा होता. शिबिर खूपच यशस्वी झालं. वर्धिनीतून गेलेल्या कार्यकर्त्यांना या यशस्वितेतून समाधानही लाभलं आणि अधिकाधिक कामासाठी नवा उत्साहही!

* * *

---

## दीपस्तंभ

- हा मत्सर, सर्वांनी मिळून कार्य करण्याच्या वृत्तीचा हा अभाव, गुलाम बनलेल्या राष्ट्रांच्या स्वभावात मुरलेला असतो. पण हा स्वभाव आपल्याला दूर केलाच पाहिजे.
- निःस्वार्थपणा हीच धर्माची कसोटी होय. जो जितका जास्त निःस्वार्थ तितका तो अधिक धार्मिक व शिवाच्या निकट असतो.
- या जगातील सर्व वस्तू भयावह आहेत. केवळ त्यागच भयरहीत आहे.

स्वामी विवेकानंद

- स्वयंसेवक संघनिष्ठ बनला पाहिजे. व्यक्तिनिष्ठ, शाखानिष्ठ किंवा स्थाननिष्ठ बनता कामा नये.
- काम होऊ शकत नाही अशी रडकथा गाण्याचा उपयोग नाही, काम करतो म्हटले म्हणजे ते झाल्याशिवाय रहात नाही. प्रत्येक मनुष्याला आपल्या घराची व इस्टेटीची जी जबाबदारी वाटते ती राष्ट्राबद्दल वाटत नाही हेच त्याचे खरे कारण होय.

डॉ. हेडगेवार

- धुमसत असताना प्रकट करू नये. पेटल्यावर दिसेलच.
- नम्रतेच्या उंचीला माप नाही.
- कोणत्यातरी नित्य यज्ञाशिवाय राष्ट्र उभे राहू शकणार नाही.
- ज्या त्यागातून अभिमान निर्माण होतो तो त्याग नव्हे. त्यागातून शांती लाभली पाहिजे. विषारी हवेचा मी त्याग केला त्यात मी विशेष काय केले? माझी शांती मी मिळवली. अखेरीस अभिमानाचा त्याग हाच खरा त्याग.

- विनोबा

## देणाऱ्याचे हात हजारो !

वर्धिनीच्या कामात समाजातील विविध क्षेत्रातील लोकांचा विविध प्रकारे सहभाग असतो. वर्षभरातील अनेक कार्यक्रमात अशा व्यक्तींचा अत्यंत महत्त्वाचा सहभाग असतो. परंतु त्यांचा नामोल्लेख करणे त्यांना रुचत नसल्याने त्यांचा हा सहभाग अंधारातच रहातो. या सर्वांची मन:पूर्वक क्षमा मागून त्यांच्या सहभागाची भावना सर्वांपर्यंत पोहोचविण्याचा हा नम्र प्रयत्न.

* 'स्व'-रूपवर्धिनीच्या बालवाडीतील ३०० मुलांना आठवड्यातून दोनदा जो पूरक आहार दिला जातो त्याच्यासाठी धान्याच्या रुपाने श्री. प्रताप ओसवाल यांचे अतिशय मोलाचे साहाय्य होते. त्यांच्या 'या सहभागामुळे' कार्यक्रम अत्यंत सुरळीतपणे पार पाडता येतात. केवळ ह्याच बाबतीत नाही तर अन्य कुठल्याही कामासाठी दूरध्वनी केला तरीही प्रताप ओसवाल ज्या प्रकारे त्याचे स्वागत करतात, साहाय्य करतात, त्याने काम करणाऱ्यांना हुरूप येतो.

* 'स्व'-रूपवर्धिनीच्या शिबिरात धान्याच्या रुपाने श्री. नारायण चांडक यांचे अतिशय मोलाचे सहकार्य मिळते. अशा कामासंबंधी प्रस्ताव मांडताच 'यादी माणसाबरोबर पाठवा. आणि धान्य घेऊन जा.' इतक्या सहजतेने ह्या विषयात ते आपला सहभाग देतात. एवढेच नाही तर दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटपाच्या विषयाबाबतीतही त्यांचे सहकार्य मिळते. "आपल्या उत्पन्नाचा काही हिस्सा हा समाजासाठी उपयोगात आण" ह्या वडिलांनी केलेल्या संस्काराची ते प्रमाणिकपणे अशा माध्यमातून अंमलबजावणी करतात.

* सर्व शिबिराचा आमचा मोठ्ठा आधार म्हणजे के. विजय प्रॉडक्टसूचे श्री. काळे. वर्धिनीच्या सर्व शिबिरांसाठी ज्या पोळ्या लागतात त्या आपल्या घरच्याच कामासाठी द्याव्यात इतक्या सहजतेने श्री. काळे पोळ्या पुरवतात. श्री. काळे यांची ह्या उद्योगातील धडपड मुलांसमोर यावी म्हणून यावर्षी एका शिबिरात मुलांचा एक गट त्यांची मुलाखतच घ्यायला गेला होता.

* Prof. Yamato Kawakami Foundation च्या माध्यमातून स्वाभिमानाने स्वतःच्या पायावर उभ्या राहू इच्छिणाऱ्या गरजू मुली व महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी ज्या भावनेने श्री.डी.पी.आपटे आर्थिक अथवा वस्तूच्या रूपाने साहाय्य करतात. त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करावी तेवढी थोडीच आहे. त्यांच्या वयाचा विचार करता अशा कामासाठी ते ज्या प्रकारची पायपीट करतात, धडपड करतात ती पाहून मन थक्क होते. कामाशी एकरूप होणे म्हणजे काय, ह्याचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे व सर्वांसमोर आदर्श आहे. वर्धिनीच्या माध्यमातून महिलांसाठी चालणाऱ्या उद्योगशिक्षण वर्गातील महिलांना त्यांच्यामार्फत दरवर्षी भरपूर अर्थसाहाय्य अथवा वस्तूंच्या रूपाने साहाय्य मिळते.

* वर्धिनीमध्ये जे 'माता बालसंगोपन केंद्र' चालते. ह्या कामात के. ई. एम. रुग्णालयाचा मोठा सहभाग आहे. या केंद्राच्या सुरुवातीपासून ते निवृत्तीपर्यंत म्हणजे जवळजवळ ह्या वर्षाच्या मध्यापर्यंत डॉ. रंगनाथन् ह्या केंद्रावर काम करीत होते. हे केंद्र सुरू करण्यामागचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन प्रत्येक रुग्णाशी ते अशा प्रकारे संवाद सांधायचे की रुग्णाला औषधापूर्वीच निम्मे बरे वाटायचे. त्यांच्या बोलण्यातला ओलावा, माणुसकी याचा प्रत्यय रुग्णसेवेत दिसून यायचा.

* मर्चंट नेव्हीच्या माध्यमातून मालवाहू जहाजांवर अनेक वर्षे कॅप्टन म्हणून काम करणारे, या निमित्ताने एका अर्थी सारे जग जवळून अनुभवलेले श्री. सनत् भाटे (वर्धिनीच्या परिचयातले सनत्‌दा) जेव्हा सुट्टीवर पुण्यात येतात त्यावेळी वर्धिनीच्या कामात त्यांचा फार मोलाचा सहभाग असतो. काम कोणत्याही प्रकारचे असो, अगदी दिल्लीला जाऊन वर्धिनीला FCRA खाली नोंदणी मिळवण्याचे असो किंवा युवकांना घेऊन पन्हाळगड ते विशाळगड ह्या मार्गावरचे पदभ्रमण असो, सनत्‌दांनी जबाबदारी स्विकारली की कोणती चिंताच नसते. तरुणांशी बोलताना ज्या तळमळीने ते त्यांना त्यांच्या अनुभवातून काही गोष्टी सांगतात, काही गोष्टींचा आग्रह धरतात तेव्हा वर्धिनीच्या पहिल्या दिवसापासून काम करणारा कार्यकर्ताच बोलतो आहे असा भास होतो.

* * *

---

## दीपस्तंभ

- डोंगरावर जितके उंच चढावे तितका देखावा अधिक भव्य दिसतो. आचरणाच्या उंचीवर विचारांची भव्यता अवलंबून आहे.
- कृती उरावी पण कर्ता उरू नये. हे भाग्य उपनिषदांच्या ऋषींचे. अहंकाराचा संपूर्ण नाश झाल्याशिवाय हे होणे नाही.
- दार बंद करून कोणी निजला तर सूर्य त्यांची सेवा करण्यासाठी त्याच्या दाराशी येऊन उभा रहातो. दाराला धक्का देऊन आत शिरत नाही. मात्र दार जरा किलकिले झाले की आत शिरलाच. ही सेवकांची मर्यादा आणि तत्परता.
- "मला काय उपयोग"? असे न म्हणता "माझा काय उपयोग"? असे म्हणावे. म्हणजे उपयुक्ततावादाचे सार्थक होईल.
- 'बुध्दी' प्रामाण्य हवे. 'अहं' प्रामाण्य नको.
- नेहमी अपयश येते यात आश्चर्य नाही. यश म्हणजे समाप्ती. ती नेहमी कशी येईल? ती एकदाच यावयाची.
- माणसाला बोलायला दोन वर्ष लागतात. परंतु गप्प बसायला शिकायला त्याला कितीतरी वर्षे लागतात.

- विनोबा

# आता केवळ यांचा आठव

या वर्षात जवळच्या अनेक व्यक्तींचे दुःखद निधन झाले. वर्धिनीच्या कामात यातील प्रत्येकाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे फार मोठा व महत्त्वाचा वाटा होता. या सर्वांचे नाव नुसते आठवणीत जरी आले तरी झटकन् त्यांच्या सहभागाची, कर्तृत्वाची आठवण होते.

वर्धिनीच्या एका युवक कार्यकर्त्याचे वडील श्री. सखाराम दळवी यांचे अकस्मात दुखःद निधन झाले. आपल्या मुलाने वर्धिनीचे काम करावे असा त्यांचा आग्रह शेवटपर्यंत होता.

❋ ❋ ❋

वर्धिनीच्या एकूणच आजपर्यंतच्या वाटचालीत ज्यांचा फार मोठा वाटा आहे असे श्री. अनंतराव उर्फ अण्णासाहेब गोगावले यांचे प्रदीर्घ आजारामुळे दुःखद निधन झाले. सर्व क्षेत्रातील माणसे जोडण्याची त्यांची हातोटी, अध्यात्मिक क्षेत्रातील अभ्यासाचे प्रत्यक्ष दैनंदिन व्यवहारातील आचरण, प्रचंड आशावाद या त्यांच्या साऱ्या गुणांचा लाभ वर्धिनीला झाला.

❋ ❋ ❋

काही माणसे अशी असतात की जी समाजाला भरभरून साहाय्य करतात. पण इतक्या अबोलपणाने, अलिप्तपणाने की त्यांच्या या योगदानाची कल्पना चटकन् लक्षातच येणार नाही! अशांपैकीच वर्धिनीचे एक सक्रीय हितचिंतक श्री. कृष्ण विनायक उर्फ बाळासाहेब देवधर यांचेही याच वर्षी दुःखद निधन झाले.



❋ ❋ ❋

'स्व'-रूपवर्धिनीच्या सहकार्याध्यक्षा श्रीमती कुंतीतीई मुजुमदार यांना सर्व सामाजिक कामात ज्यांचा अबोल पण सक्रीय पाठींबा होता, ज्यांच्या प्रोत्साहनामुळे कुंतीताई वर्धिनीसारख्या सामाजिक कामात आपला वाटा उचलू शकल्या,ते त्यांचे पती कर्नल पी.व्ही. मुजुमदार यांचे याच कालावधीत दुःखद निधन झाले.

❋ ❋ ❋

दैनंदिन कामात नसले तरी शिबिराच्या निमित्ताने ज्यांच्या कर्तृत्वाचा लाभ वर्धिनीच्या विद्यार्थ्यांना अनेकदा झाला, ते अभिनय, नाट्य क्षेत्रातील एक जाणते अभ्यासक, दिग्दर्शक व या

क्षेत्रातील सर्वांचे आदर स्थान असलेले श्री. वासुदेवराव पाळंदे यांचेही गंभीर आजाराने दुःखद निधन झाले.

❋ ❋ ❋

वयाच्या ९२व्या वर्षीसुध्दा वर्धिनीत येऊन आजोळच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकवायला येण्याचा दांडगा उत्साह असलेले श्री. विठ्ठल तथा अण्णा जोगळेकर यांचे वृध्दापकाळामुळे दुःखद निधन झाले.

❋ ❋ ❋

वर्धिनीच्या इमारतीत रक्षक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींना विद्यार्थी 'मामा' या नावाने सामान्यतः हाका मारतात. कारखान्यातील नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर रक्षक म्हणून वर्धिनीत काम करणारे श्री. महादेव रामचंद्र ढगे उर्फ ढगेमामा यांचेही याच कालावधीत दुःखद निधन झाले.

❋ ❋ ❋

रा. स्व. संघाचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते, 'स्व'रूपवर्धिनीचे एक जेष्ठ मार्गदर्शक, सेवाकार्याच्या माध्यमातून ज्यांनी जनकल्याण समितीच्या कामाची खऱ्या अर्थाने मुहूर्तमेढ रोवली व अनेक संस्थांच्या उभारणीत ज्यांचे मोलाचे योगदान होते असे अप्पासाहेब सोहनी यांचे वृध्दापकाळामुळे दुःखद निधन झाले.

❋ ❋ ❋

सांघिक सूर्यनमस्कार हा वर्धिनीच्या सर्व शाखांमधून चालणारा एक अनिवार्य कार्यक्रम. या व्यायामप्रकाराला भारतीय संगीताची जोड देऊन तो शास्त्रोक्त पध्दतीने व सांघिकरित्या घालता येण्यासाठी ज्यांच्यामुळे सुलभता आली व या विषयाचा देशातच नव्हे तर विदेशातही प्रचार सुरू झाला त्या श्री. ह.वि उर्फ बापूराव दात्ये यांचे वृध्दापकाळामुळे दुःखद निधन झाले. नाविक दलाच्या घोषवृंदासाठी, रा.स्व. संघाच्या घोषवृंदासाठी त्यांनी भारतीय रागदारीवर आधारित अनेक रचना बांधल्या. दिल्लीच्या ऐशियाड खेळात त्यांच्या 'शिवराज' या रचनेची गोडी जगाला अनुभवायला मिळाली. वर्धिनीच्या कामात त्यांचे अगदी आपुलकीने लक्ष होते.


या सर्व दिवंगत सुहृदांच्या आत्म्यांना सद्गति लाभो ही परमेश्वरचरणी प्रार्थना !








'स्व'-रूपवर्धिनीचे काम हे पहिल्या दिवसापासून समाजाने दिलेल्या अर्थसहाय्यावरच चालू आहे. सुरूवातीच्या वर्षी केवळ रू. २०,८०२/- इतका खर्च होता. २० वर्षानंतर तोच खर्च आता रु. १३,००,०००/- रूपयांपर्यंत पोहोचला आहे. परंतु समाजातील आर्थिकदृष्ट्या बांधिलकीची जाणीव असलेल्या शेकडो व्यक्ती, संस्था व न्यासांमुळे हा संसार आजही व्यवस्थित चालू आहे. सन १९९७ /९८ या आर्थिक वर्षात एकूण खर्चाची स्थिती ही पुढीलप्रमाणे होती.




दिवसेंदिवस वाढत जाणारी महागाई व कामाची नैसर्गिक रीतीने होत जाणारी वाढ लक्षात घेता आर्थिकदृष्ट्या काही वेगळ्या व्यवस्थेचा विचार तातडीने करायला हवा आहे. ह्याच गतीने महागाई वाढत गेली तर आज दरमहा जो रू. १,००,०००/- चा खर्च आहे हा आगामी काही वर्षात दुप्पट वा चौपट होऊ शकतो हे निश्चित आहे. या दृष्टीने विचार करता संस्थेचा कायम निधी हा किमान दोन ते तीन कोटी रूपये असणे आवश्यक आहे व त्या दिशेने सर्वांनी प्रयत्न करायला हवे आहेत. आज मितीला संस्थेचा कायम निधी रूपये पंचेचाळीस लाख इतका आहे. हा अधिकाधिक वेगाने वाढण्याची आवश्यकता आहे. वरील खर्चाच्या आकडेवारी वरून एक गोष्ट सहज लक्षात येईल की अन्य खर्चाच्या तुलनेत उद्दिष्टांवरील खर्च हा अधिक आहे व तो तसाच होत रहायला हवा. संस्थेला आयकराच्या ३५ ए. सी. या कलमाखाली १०० टक्के करसवलत प्राप्त आहे. चालू असलेल्या अनेक प्रकल्पांचा विस्तार याद्वारे होत आहे. कामही वाढणे आवश्यक आहे पण त्याचबरोबर कार्यकर्त्यांचे संपूर्ण लक्ष कामावर केंद्रित होण्यासाठी सुदृढ आर्थिक व्यवस्था उभी रहाणे गरजेचे आहे. कामाला मिळणारा वाढत्या अपेक्षांचा प्रतिसाद, विद्यार्थी किंवा लाभार्थींमध्ये होत जाणारे गुणात्मक बदल लक्षात घेता सर्वांनी या कामाकडे अधिक लक्ष दिले व विशेषतः आर्थिक सुदृढीकरणामध्ये शक्यतेप्रमाणे अधिकाधिक हातभार लावला तर हे काम निश्चितच यशस्वी होईल. या संदर्भात आपण साहाय्य करीत आहातच पण असे अर्थसाहाय्य करू शकणाऱ्या व्यक्ती, संस्था वा न्यास यांची जोड या कामाला लागण्यासाठीही आपण साहाय्य करावे ही विनंती या निमित्ताने करावीशी वाटते.

# अस्वस्थ पूर्वांचल

'स्व'- रूपवर्धिनीच्या कार्यकर्त्या कु. रोहिणी तेंडुलकर व कु. मंगला कुडलिंगार या पूर्वांचल क्षेत्रात वनवासी कल्याण आश्रमाचे काम करीत असतानाचे त्यांचे अस्वस्थ करून सोडणारे अनुभव त्यांच्याच शब्दात . . .

## १) एका काळोख्या रात्री - - दाट जंगलात

कु. रोहिणी तेंडुलकर

परशुराम कुंड हे अरुणाचलातील जणू तीर्थस्थानच आहे. दरवर्षी या कुंडात स्नान करण्यासाठी बरेच वृध्द, साधूलोक येत असतात. वनवासी कल्याण आश्रमातर्फे ३०-३५ स्वयंसेवक व डॉक्टर तीन दिवस तिथे राहतात. त्या वैद्यकीय मदत केन्द्राची जबाबदारी माझ्यावर होती. केन्द्राची सर्व कामे संपली होती. फक्त निवासाची सोय करणे बाकी होते. चौखम गावापासून कुंड ५०-५५ कि.मी. वर होते. सर्वांच्या आंधी जाऊन जागा घ्यायची असल्याने सकाळी पाच वाजताच माझे वाहन मी घेऊन बाहेर पडले. भयाण थंडी, दाट धुकं. १०-१५ कि.मी. गेल्यावर गिअरही टाकता येईना इतका थंडीचा त्रास होऊ लागला. मेदो (Medo) गावात थांबले. पुढे निघाले तर पूर्ण जंगल होतं. नको जायला असं वाटत होतं. एकही गाडी माझ्यासाठी थांबेना. हिंमत करुन निघाले. रस्त्याच्या दोन्ही बाजूला जंगल, भयाण शांतता, एकाकी असा रस्ता, त्यात माकडांचं ओरडणं, माझ्या गाडीलाही तेव्हाच त्रास द्यायचा होता. खूपच भीती वाटत होती. पुढचा २० कि.मी. चा रस्ता तर पहाडीच होता. बरीच वळणं, चढ उतार, नद्या, भोवताली जंगल असल्याने मधेमधे दिसणारे साप, त्यात येता जाताना कुणी काही करेल का याची भीती, ती वेगळीच. शिवाय या रस्त्यावरून येताना एक चित्ता पाहिलेला होता. पण कसंही करून मला पोहोचायचचं होतं. नाहीतर कुण्डातील भयाण थंडीला व प्रचंड वारा पाऊस यांना सर्वांनाच सामोरं जावं लागणार होतं. असं करत करत मुक्काम गाठला.

एकदा रात्री ८ वा म्हणजे अरुणाचलातली जवळ जवळ मध्यरात्रच, वाक्रोहून चौखमला सोडाच म्हणून सांगितलं. जंगलात हत्ती निघतील म्हणून कार्यकर्ते नको म्हणत होते. मी मनातून ते किती भित्रे आहेत असे म्हणत होते. पण ते



का घाबरत होते हे मला लवकरच प्रत्ययास आले. सुदैवाने त्यावेळी आम्ही जीप मधून येत होतो. समोरून दोन मुलं पळत येताना दिसली. हत्तीचा वेगही माझ्या कल्पनेत न मावणारा होता. स्थानिक असूनही ती मुलं भीतीनं घामाघूम झाली होती. एकूणच तो प्रसंग आजही अंगावर काटा आणणारा. आम्ही शक्य तितक्या वेगाने तिथून निघून गेलो. ज्या रस्त्यावरून मी बऱ्याच वेळा ये-जा करायची त्या रस्त्याने परत एकटं संध्याकाळी जायचं मी चुकूनही पुन्हा मनात आणलं नाही.

कुंडा (लाकूडतोड) बंद झाल्याने मेदो (Medo) गाव अगदी सुनसान झालं होतं. पूर्वी तिथं रहायची एवढी भीती वाटली नाही. पण एकदा तेथील दुकानात काळे पट्टे बांधलेली माणसं आली. दुकानदारांशी, लोकांशी झालेल्या झटापटीत त्यांची बंदूक तेथे पडली. सुदैवाने माणसांना ते काही करू शकले नाहीत. पण बंदूक अत्याधुनिक बनावटीची व विदेशातून आलेली असल्याचे कळले. ती माणसं NSCN (National Society Council of Nagaland) ची असल्याची शक्यता होती. गेल्यावर्षी नव्हत्या पण यावर्षी NSCN च्या बऱ्याच गोष्टी ऐकायला मिळाल्या. ही लोकं जबरदस्तीने येथील लोकांकडूनच पैसे उकळतात. त्यातूनच येथील तरुणांना देशद्रोही कारवायांचे प्रशिक्षण देतात व त्यांच्याकडूनच अत्याचार करवतात.

एक 'सिंफो' मुलगा भेटला तो म्हणाला, "हम लोगोंने जब बंदूक दिखायी तब हम लोगोंको सभी demand देते है और अभी हमारे बारेमें कुछ तो सोचते है"

एक मिश्मी मुलगा म्हणाला, "यदि ये लोग हमको ख्रिश्चन या हिन्दु बनाना चाहते है तो मुझे भी एक ना एक दिन बंदूक तो उठानीही पडेगी"

जेव्हा जेव्हा संपर्काला जायचे तेव्हा वरील प्रकारचे संवाद नित्य ऐकू यायचे. वाचवता येईल असा विचार प्रत्येक घरात चर्चिला जायचा. घरी आल्यावर माझ्या मनात विचार यायचा, आपल्याकडच्या चर्चेत जास्त करून नोकरी,

करीअर, धंदा या पलिकडे फार काही नाही. पण इथं संस्कृती, परंपरा हा नित्याचाच विषय. मी विचार करत असे, कुठं ही संस्कृतीसाठी झगडणारी माणसं आणि कुठं मी आणि शहरातली माणसं. फक्त मी,माझं भवितव्य आणि माझं घर म्हणणारी ! किती फरक.

ख्रिश्चनांच्या धर्मांतराच्या दुष्ट कारवाया कशा चालतात, याचं एक जिवंत उदाहरण. असंच एका वस्तीत बाथांगसो नावाचा एक कार्यकर्ता गेला होता. त्याचा एका बालवाडीतील मुलाशी झालेला संवाद.

बालवाडीतील मुलगा -"मैं ख्रिश्चन हूँ!"

- "तुम्हारी माँ ?"

-"वो मिश्मी है"

- " तुम क्यों ख्रिश्चन हो?"

- " मेरी नानी मुझे sunday को father के पास ले जाती है । वो बताता है की कुछ दिन बाद सब बीमार पडेंगे और सिर्फ ख्रिश्चन बचेंगे इसलिये मै ख्रिश्चन हूँ !"

अशा केलेल्या प्रचाराचा बालमनांवर काय परिणाम होत असेल? हे शहराच्या आसपास, मग दुर्गम भागात काय घडत असेल?

या सर्व गोष्टीत ख्रिश्चनांचं खरंच किती चुकतंय? मूळ प्रवाहापासून दुर्लक्षिलेला हा भाग. पण मीही त्याला १-२ वर्षच न्याय देण्याचं ठरवलेलं होतं. त्यातून फक्त कामाची आवश्यकता आणि आवश्यकताच जाणवली.

चौखममध्ये सुरुवातीला अगदी एकटी होते. पण नंतर तिथेच मला आईसारखं प्रेम देणाऱ्या, बहिणीप्रमाणे सुखदुःख वाटून घेणाऱ्या दादी, येताजाता चौकशी करणारे भूतपूर्व सांसद 'एम पी सर', सर्वच कामात साथ देणारा व मनाला उभारी देणारा बाथंगसो, बरेच दिवसात जाणं झालं नाही तर हक्कानं रागवणारी कितीतरी कुटुंबं आणि केवळ प्रेमाची शिकवण देणारी कितीतरी माणसं!

या सर्वात खूपच रमून गेले होते. जुनं काम संपवून नवीन कामाची सुरुवात. सहा ऑगस्टला अगदी समाधानच होतं व डॉक्टर आल्यावर करायच्या कामांची स्वप्नं बघत होते. पण ती फक्त स्वप्नंच होती असं मला सात ऑगस्ट ९८ ला कळलं. आज रक्षाबंधन करायचं असं मी ठरवत होते. सोयीच्या दृष्टीनं. पण सगळ्यांचा विरोध. मी थोडी संतापलेच. औक्षणाचा दिवाही विझवला. वाटलं हा अपशकुनच. तिनसुखियातून रागानंच निघाले. चोखमला पोहोचले. खूप अस्वस्थ होते. दुसऱ्या दिवशी श्री. तेवा, अरुणाचलच्या शेतकी खात्याचे मंत्री यांच्याकडें रक्षाबंधनासाठी निघाले होते. आलूबाडीच्या रस्त्यावर होते. घरापासून एक दीड कि.मी. आले होते. दुपारचे दोन वाजले होते. सूर्य उतरणीला लागला होता. चार वाजता सूर्यास्त. विचारांच्या तंद्रीतच स्पीड ब्रेकर कधी आला ते कळलंच नाही. माझ्या गाडीवर मागे बसलेल्या मोगँबोची (कार्यकर्त्याचे नाव) मला एकदम जाणीव झाली. गाडी थर्ड गिअरमध्ये होती त्याला वाचवायचं, त्याला सांभाळायचं आणि अचानक आलेला स्पीड ब्रेकरही ओलांडायचा. मी भांबावून गेले ! काय झालं काही कळलंच नाही. एकदम ब्रेक दाबला गेला. मग सरळ खालीच कोसळले. गाडी पायावरच पडली. तशीच उठले, पण पुन्हा कोसळले. उभंच रहावत नव्हतं, बाजूच्या दुकानातनं लोकं धावली,

जीपमधून मी हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. ज्यांच्याशी संबंध जडला होता ते आणि इतरही सारेच धावत आले. माझं घर, माझी माणसं म्हणून माझ्यावर प्रेम करत होते. किमान २-३ महिने पडून रहावं लागणार हे कळून चुकलं. 'एम.पी.सर' स्वतः घरी आले. तसेच कित्येक माणसं घरी आली होती. सर्व जण स्वतःच्या परीने मदत करीत होते. हॉस्पिटलमध्ये पाहोचवण्यासाठीची गाडीची व्यवस्था त्यांनीच केली होती.

तिनसुखियातही खरं म्हणजे मुलांचं हॉस्टेल होते. तेथील छोट्या मुलांनीही घरची आठवण येणार नाही इतकी काळजी घेतली. मला वाईट वाटू नये म्हणून प्रत्येकजण कितीही कामात असला तरी दहा मिनिटं तरी गप्पा मारून जायचा. मन जपण्याचा किती प्रयत्न चालू होता त्यांचा ! मी आजारी आहे असं कधी वाटलंच नाही. आजही तिथला एकेक क्षण, एकेक प्रसंग, गप्पा डोळ्यासमोरच आहेत. तिथून निघताना ही आपुलकी, प्रेम, काळजी घेणारी माणसं सुटणार आणि पुन्हा त्याच सिमेंटच्या जंगलात आपण अडकणार याचं खूपच वाईट वाटत होतं. आजही तिथल्या लोकांची पत्रं आली की मोलाचं काहीतरी सुटल्यासारखं वाटतं आणि त्याचं दुःख केवळ अव्यक्तच!

"- - - । बहुत दिनो से आपको कोई खबर नही मिला । इससे मेरा मन उदास है । - - - आप घर जाने के कारण मेरा मन उदास है । - - - I have a pen. That is blue. I have a sister. That is you." - क्षी ध्रुब जोती बडा

"- - - आपको जाते समय नमस्कार नही दे सका । इस लिए मुझे बहुत दुःख हो रहा था । - - - आपकी पेर जल्द अच्छा हो जाय ये ही ईश्वर से मेरा बिनित है ।" - आपकी लाडला भाई श्री हिरेन कर्मकार.

* *

"आप अच्छा हो रही है क्या? घर मे बैठा ठिक से भोजन करना । खा खा कर  होना। रोना नही, अन्यथा आप प ऽऽऽ त ऽऽऽ ली हो जायेगा ।" - बालुम्मो दिवंग

* *

"आप कैसे है । आपसे मिलने को बहूत जी कर रहा है । इस बार आप दीपावली में नही थी इसलिये कुछ जमा नही । - - आपका बहुत बहुत याद आता है । - - आप जेसे भी होते हो यहा एक बार आयेगा । -Saurav

* *

"" - - मेरा तबियत खराब थी इसलिये ज़बाब देना नहि सेकी । - - - तुमसे मैं नाराज नही हूँ । मैं तो भगवनसे प्रार्थना कर रही हूँ तुम जलदि ठिक ह जाव । - - तुम्हारा खत कि इन्तजार मे हूँ।" दिदि

"- - - अभी आप ठीक तो है यह हम आपनी आखोंसे आपको देख लेते तो हमे शांति मिल जाता । - - अगर आप कोशिस करती तो एक बार तेजू मे आइयेगा । - - क्यो आप हम से नाराज है? - - आपका छोटा भाई

अशी पत्र वाचून रडूच आलं. या सर्वांच्या शुभेच्छांमुळेच माझा पाय लवकर बरा होतोय अशी माझी श्रध्दा आहे. लोकांची ही आपुलकी, निःस्वार्थ प्रेम अनुभवण्यासाठीच की काय मी पडणं आवश्यक होतं?

## २) आता गंभीरपणे लक्ष दिले नाही तर ? ? ?

कु. मंगला कुडलिंगार

प्रिय मनीषाताईस,

आज तुला खूप मोठं पत्र लिहायचं ठरविले आहे.

मी आणि रोहिणी पुण्याहून इकडे यायला निघालो त्यावेळेस मानसिक तयारी खूप झाली होती. तरी आपण काम करू शकू की नाही याबद्दल शंका होती तसेच इथल्या नवीन गोष्टींबद्दल पण खूप उत्सुकता होती. पण इथे आल्यानंतर मी हे काम नक्की करू शकते याबद्दल विश्वास वाटतो. वर्धिनीत शिकलेल्या गोष्टींचा, वर्धिनीतील संस्कारांचा बाहेर पडल्यानंतर खूपच उपयोग होतो हे जाणवते!

आमचा प्रवास खूप छान झाला. कलकत्त्यात मा. वसंतरावजींशी भेट झाली. त्यांना भेटल्यावर मात्र त्यादिवशी खूप बरे वाटले. ४०-५० वर्षे प्रचारक म्हणून काम केलयं त्यांनी. केवढे साधे रहातात ते ! आणि प्रत्येक कार्यकर्त्याची मानसिकता समजावून घेवून त्याच्या पातळीला येऊन गप्पा मारतात. त्यांच्या गरजा किती कमी आहेत ! त्यांच्याकडे, मा.मधुजींकडे केवळ बघूनच व त्यांच्याशी गप्पा मारूनच आपण खूप शिकतो.

एका कार्यकर्त्याकडे नौगावला एक दिवस गेलो होतो. त्याच्या घरची लोकं फारच छान आहेत. खूप जीव लावतात ही लोकं ! त्यांच्या घरी तर अजिबात परकं वाटलं नाही. आणि खाण्या-पिण्याची तर चंगळच होती. त्याला चार बहिणी आहेत. त्याही सर्व आमच्याच एवढ्या किंवा थोड्या मोठ्या आहेत. त्यांच्याशी आमची एकच दिवसात खूप मैत्री झाली. दुसऱ्या दिवशी ज्यावेळेस आम्ही त्यांच्या घरून निघालो त्यावेळेस अक्षरशः आमच्यासाठी त्याच्या बहिणी सुदीप्ता व मिनाक्षी खूप रडल्या. इतकी जीव लावणारी माणसं आहेत ही ! मनीषाताई, इथे आसाममध्ये आसामी लोकांचा बिहू हा मोठा सण आहे. तो एप्रिलमध्ये असतो. त्यावेळेस बिहूच्या सुट्टीत मी त्यांच्या घरी पुन्हा जाणार आहे.

मनीषाताई, आता कार्यक्षेत्राबद्दल सांगते. हे एक बोडोलॅंड आहे. इथे मोठ्या प्रमाणावर बोडो लोक रहातात. तेही लोक स्वभावाने एकदम तापट आहेत. ते बोडो धर्म मानतात. साधारणपणे कापणीच्या सुमारास आलेल्या धान्याची, तसेच झाडाची हे लोक पूजा करतात. ती पण एक वनवासी जनजाती आहे. ह्यांचा उत्सव जानेवारी महिन्यात असतो. तसेच ही लोकं शंकराला मानतात व स्वतःला आदि म्हणजे "आसाममधील सर्वात पूर्वीपासून असलेले" असे म्हणवितात. त्यामुळे ह्या पण लोकांना आसाम हा प्रांत त्यांचा म्हणून वेगळा हवायं. आसाममधील सर्व बोडो लोकांची 'अब्सु'- (अखिल बोडो छात्र संघ) ही एक उग्रवादी संघटना आहे. उद्या म्हणजे २८ तारखेला वेगळा बोडोलॅंड हवा म्हणून २५ तासांचा पूर्ण आसाम बंद पुकारला आहे.

बोडो लोकांबरोबर नेपाळी, बंगाली, आसामी तसेच आजूबाजूच्या गावात सवताल, राभा इ. वेगवेगळ्या जनजातीमधील लोकं राहतात. भूतान व चीनची सरहद्द इथून जवळ आहे. भूतानचं चलन

इथे बाजारात सगळीकडे चालते. भूतानची लोकं इथे दर बुधवारच्या व शनिवारच्या बाजारासाठी म्हणून येतात. दोन मिशन स्कूल तर एक विद्याभारतीची शाळा आहे. मिशन स्कूल मध्ये १२०० विद्यार्थी तर विद्याभारती मध्ये ६०० ते ६५० विद्यार्थी आहेत. इथे शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. जे शिकलेले आहेत, ते सर्व मोठ्या प्रमाणावर बेकार आहेत. औद्योगिकीकरण नसल्यामुळे नोकऱ्या नाहीत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सर्व तरुण वर्ग कुठल्या न कुठल्या उग्रवादी संघटनेत सामील आहे. इथे जी लोकं सरकारी नोकरीमध्ये आहेत, त्यांना कित्येक महिने पगार मिळत नाही. इथे मोठ्या प्रमाणावर भात शेती होते. तसेच खूप ठिकणी चहाचे मळे पण आहेत. पण इथला सर्व नंबर एकचा चहा निर्यात होतो. इथे गरीबी अशी आजूबाजूच्या खेड्यात किंवा जनजातीमध्ये पण फारशी बघायला मिळत नाही. तांदूळ व सुपारी या झाडांच्या उत्पन्नामुळे पैसा भरपूर आहे.

आता माझ्या छात्रावासाबद्दल सांगते. इथल्या दहा मुलीपैकी चार मेघालयाच्या खासी जमातीच्या, एक अरूणाचलची चकमा जनजातीची, तर दोन सवताल, दोन राभा ह्या इथल्या जवळच्या खेड्यातल्या आहेत. हे मुलींचे येथील छात्रावास आता नवीन जागेत हलविले आहे. बांधकामाचं काम चालू आहे. सुरवातीचे दोन-तीन दिवस इथल्या सर्व गोष्टी माहिती करून घेण्यात व छात्रावासातल्या कामाशी स्वतःला जुळवून घेण्यात गेले.

मी आणि अंजू सिलचरच्याजवळ हवाइथांग येथील छात्रावास संघप्रमुखांच्या प्रशिक्षण वर्गाला गेलो होतो. तिथे मणिपूर, नागालँड, त्रिपुरा व आसाम ह्या राज्यातून छात्रावासप्रमुख आले होते. कल्याणआश्रमाचे मणिपूरमध्ये -एक, नागालँडमध्ये -तीन, त्रिपुरामध्ये - पाच तर आसाम मध्ये अकरा (मुलींचे -चार, मुलांचे -सात ) छात्रावास आहेत. जवळजवळ पंचेचाळीस जणांचे हे सहा दिवसांचे शिबिर झाले. गोहाटी ते सिलचर हा चौदा तासांचा प्रवास आहे. ह्या शिबिरात मधुजी, वसंतरावजी, रामगोपालजी, रमेशजी यांच्याबरोबर राहाण्याचा व बौध्दिके ऐकण्याचा योग आला. ईशान्येकडील सातही राज्यातील भौगोलिक स्थिती, तिथले प्रश्न, तिथल्या वेगवेगळ्या जनजाती, सण, इ. माहिती कळली. ह्या शिबिराचा, कामाचा प्रभाव निर्माण होण्यासाठी व काम करण्याची मानसिकता तयार होण्यासाठी खूपच उपयोग झाला.

आता पहिल्यांदा मिझोरामच्या स्थितीविषयी सांगते. नागालॅण्ड मध्ये १२५ वर्षांपासून, तर मिझोराममध्ये १०५ वर्षांपासून ख्रिश्चन मिशनरी काम करतात. मिझोराममध्ये जाण्यासाठी केवळ दहा दिवसांचा परवाना आपल्याला मिळतो. आज जवळजवळ पूर्ण मिझोरामच ख्रिश्चन झालेला आहे. (मिझोंचे म्हणणे We have offered this land to Esai only.) मिझोराममध्ये रियांग नावाची एक जनजाती आहे. ह्या रियांग लोकांना ख्रिश्चन मिशनरीज लोकांनी काही प्रलोभने दाखविल्यामुळे ह्या लोकांनी धर्म बदलला. पण धर्म बदलल्यामुळे त्यांचे स्वतंत्र अस्तित्व धोक्यात आले. त्यांची संस्कृती बदलली. मग रियांग लोकांना आपण केलेली चूक जाणविली. म्हणून त्यांनी एकत्र

येऊन त्यांनी त्यांची संघटना बनविली व स्वतंत्र जिल्ह्याची मागणी केली. त्यामुळे रियांग विरुध्द ख्रिश्चन झालेले सर्व मिझो यांच्यात वाद सुरु झाला. ह्या मिझोंनी तिथल्या लोकांवर (रियांग) खूप अत्याचार केले. ह्या लोकांना मारणे, ह्या लोकांची घरे जाळणे, बायका मुलींवर अत्याचार करणे असे ह्या मिझोंनी सुरु केले. मिझोराममध्ये 'तुरईपुट' म्हणजे 'गंदी नालीका किडा' असे या रियांग लोकांना संबोधतात. या लोकांशी मिझोंची वागणूक अत्यंत वाईट आहे. आज सर्व चकमा, रियांग लोकांना त्यांच्याच प्रदेशातून म्हणजे मिझोराममधून बाहेर हाकलले गेलेयं. पंचवीस हजार लोक मिझोराममधून बाहेर पडलेत. आसाम, त्रिपुरा ह्या राज्यात ही लोक येऊन राहातात. व या सरकारांवर भार टाकतात. ह्या लोकांवर अनन्वित अत्याचार झालेत. त्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. खूप मोठ्या प्रमाणावर उपासमारी, आजारपण व अत्याचार ह्यांमुळे दवाखान्यात दाखल करावे लागते. सिलचर कॅम्प मध्ये त्याचे काही फोटो बघायला मिळाले. हे फोटो अक्षरशः बघवत नाही. फोटो पाहिल्यानंतर अक्षरशः रडायला येते इतकी वाईट परिस्थिती आज त्या लोकांची आहे. कल्याणआश्रमाने 'रियांग रिलिफ फंड' या नावाने त्यांच्यासाठी काम सुरू केलयं. हे काम सिलचर मध्ये चालते.

आता आसामबद्दल लिहिते. आसाम हे सात ही राज्यात सर्वात जास्त संवेदनशील राज्य आहे. इथे आसु (अखिल आसामी छात्र संघ), अल्फा, एनडी एफबी (National Democratic front of Bodoland), संथाली उग्रवादी, बोडो पीपल्स ॲक्शन कमिटी इ. उग्रवादी संघटना तर नेपाळी गुरखा, बंगाली, कार्बी इ. लोकांच्या आपापल्या संघटना आहेत. आसामी लोकांना, बोडो लोकांना, कार्बी लोकांना, गुरखा लोकांना अशा प्रत्येकांना आपापला प्रांत वेगळा, स्वतःचा हवाय. अल्फा मध्ये आसामी लोक आहेत. ह्यात मोठ्या प्रमाणावर मुलीसुध्दा आहेत. ही लोकं इथल्या सामान्य जनतेवर खूप अत्याचार करतात. नौगाव, कोकराझार इ. संवेदनशील गावांमध्ये तर दररोज कितीतरी लोकांची नाहक हत्या होते. ही लोकं कुठल्याही दुकानात जातात व ठराविक पैशांची मागणी करतात. कित्येक मुलांना पळवून नेतात. इथला सर्व कायदा ह्या येथील उग्रवादी लोकांच्याच हातात आहे. इथले राजकीय लोकही काहीच करू शकत नाही. खूप क्षुल्लक क्षुल्लक कारणांवरुन इथे दंगली होतात. इथले लोक अक्षरशः जीव मुठीत धरुन जगतायेत. एक प्रसंग सांगते - हवाइथांग् वरुन सिलचरला येत असताना सिलचरला बंद होता. त्यामुळे जवळजवळ चार किलो मीटर सर्व सामान घेउन चालत यावे लागले. त्या दिवशी सिलचरमध्ये मिझो लोकांची हत्या करण्यात आली होती. मध्यंतरी इथे तेजपूर बंद होता. उद्या आसाम बंद आहे. बंद- दंगल हे तर इथे दररोजचे झालेले आहे. दररोजच्या इथल्या बातम्या वाचून सुरवातीला तर अत्यंत अस्वस्थ व्हायचे. माझ्या गावातही ९०-९१ मध्ये खूप दंगल झाली. कित्येक लोकांना त्यावेळेस बोडो लोकांनी त्यांच्या मागण्यांसाठी ठार मारले. बुधवारच्या बाजारात कित्येक लोकांना तलवारीने अक्षरशः कापण्यात आले. त्यावेळेस सुरवातीला मोठ्या प्रमाणावर असलेले व्यापारी लोक घाबरुन आपापल्या प्रांतात परत गेले.

इथे BSF ची म्हणजे Border Security Force ची लोकं भरपूर आहेत. अल्फा व बीएसएफ ह्या लोकांमध्ये पण सारख्या चकमकी होत असतात. इथे संध्याकाळी साडेसहानंतर अजिबात फिरता येत नाही. इथल्या सामान्य लोकांनी सुरक्षिततेसाठी बघायचं तरी कुणाकडे? हा प्रश्न आहे. अल्फाच्या लोकांनी बीएसएफ लोकांचे टँकस्च्या टँकस् उडविलेले आहेत.

आसाममध्ये पाऊस पण कधीही पडतो. इथे जवळजवळ ५-६ महिने पाऊस असतो. आज कित्येक गावांमध्ये पूर आलेला आहे. कित्येक लोक बेघर झालेले आहेत. पुरामुळे जवळ जवळ ४ हजार गावांमधील जनजीवन उध्वस्त झालेले आहे.

सिलचर कॅम्प वरून येताना सोनबरी घाट (काछार जिल्हा) ही बांगलादेश व आसामची सीमा बघायला मिळाले. ह्या भागात सगळीकडे मुस्लीम वस्ती खूप आहे. बांगलादेशच्या विलगीकरणामध्ये मुस्लीम लोक (बांगलादेश निर्वासित) तसेच काही प्रमाणात बंगाली लोक इथे आले. सुरवातीला मुस्लीम लोकांचे प्रमाण कमी होते पण आसामच्या लोकसंख्येमध्ये सर्वात जास्त म्हणजे- बत्तीस टक्केमुस्लीम लोक आहेत. त्या खालोखाल बंगाली लोक तीस टक्के तर आसामी अठ्ठावीस टक्के आहेत. येथील मुस्लीम लोकांची स्थिती पण वाईट आहे. त्यांच्या एकेक कुटुंबात पंधरा पंधरा मुले असतात. ही लोकं जगण्याचा कसलाही विचार करीत नाहीत. फक्त त्यांची संख्या वाढवतात. येथे आसाममध्ये आसामी विरूध्द बंगाली असा वाद आहे. १९५१ व १९६१ च्या सुमारास इथे भाषावाद व प्रांतवाद यासाठी लढे झाले. या लोकांच्या आपापसातील वादाचा फायदाही मुस्लीम लोकं घेतात. भाषा व प्रांत यांच्या वादामध्ये झालेल्या लढ्यात ही मुस्लीम लोकं प्रथम आसामी लोकांबरोबर होती. नंतरच्या लढ्यात त्यांनी बंगाली लोकांची बाजू घेतली. आसामी व बंगाली लोकांचे परस्परांत अजिबात पटत नाही. येथील सर्व मोठ्या जागांवरील नोकरीत बंगाली लोकं आहेत. त्याचा आसामी लोकांना राग आहे.

आज कित्येक सणात नेपाळी लोक, बंगाली लोक, आसामी लोक एकमेकांच्या घरी पूजेला सुध्दा जात नाहीत. पूजेला जाण्यासाठीसुध्दा ही लोकं घाबरतात. एकूणच इथली परिस्थिती भयंकर आहे.

मागील दोन-तीन वर्षात संघाच्या तीन प्रचारकांची पण इथे हत्या करण्यात आली.

अल्फा व इतर उग्रवादी हे बाहेरील शेजारच्या देशात जाऊन प्रशिक्षण घेऊन येतात. (म्हणजे भूतान, चीन) ह्यांना बाहेरून मोठ्या प्रमाणावर पैशांची मदत पुरविली जात आहे. आता परवा नौगावमधून जवळजवळ ४४ मुली अल्फाच्या प्रशिक्षणासाठी भूतानला गेल्या. ह्या येथील जवळच्या नलबाडीया, नौगाव, तोंगेला या गावातील आहेत. अल्फामधील मुलींची संख्या सध्या जवळजवळ २०० च्या आसपास आहे. भूतानमधील त्यांचे प्रशिक्षण एक वर्षाचे आहे. या सर्व अठरा ते पंचवीस वयोगटातील आहेत. यापूर्वी आसाममध्ये त्यांचे सहा महिन्यांचे प्रशिक्षण झाले आहे.

इथे छात्रावासांमधील मुलींच्या परीक्षा संपल्यामुळे त्यांना जून ३० पासून ऑगस्ट ४ पर्यंत सुटी आहे. त्यामुळे या सुटीत मी गंगादिदीबरोबर राखी पौर्णिमेच्या कार्यक्रमासाठी ५-६ गावात जाऊन आले आहे. हातकता, वैकंबरी ही सर्व मुख्य रस्त्यापासून सहा-सात कि.मी. आत अशी गावे आहेत. या सर्व गावांमध्ये ख्रिश्चनांच्या शाळा व चर्चेस आहेत.

येथील सर्व जनजातीमध्ये त्यांच्या जनजातीय भाषेची पुस्तके नाहीत, पण ख्रिश्चनांचे बायबल सर्व जनजातीय भाषांमध्ये आहे.

मनीषाताई, आसामची परिस्थिती खरोखरच भयंकर आहे. आपल्या येथून कार्यकर्त्यांनी येथे येऊन काम करणे हे अत्यंत आवश्यक व तेवढेच गरजेचे आहे. इथे येऊन येथील सर्व परिस्थिती पाहिल्यानंतर, जाणविल्यानंतर काम करण्याची मानसिकता आपोआपच तयार होते. आज जर ह्या प्रश्नांकडे आपण खरच गंभीरपणे लक्ष दिले नाही तर उत्तर-पूर्वेचा हा सर्व भाग आपल्यापासून तुटण्यास वेळ लागणार नाही. आपल्या येथील कार्यकर्त्यांनी इथे येऊन काम करणे खूपच आवश्यक आहे. आपले काम हे सकारात्मक असल्यामुळे प्रश्न कितीही मोठे असले तरी त्याला आपण नक्कीच तोंड देऊ असा विश्वास वाटतो.

मनीषाताई, आसामचे संघटनमंत्री रमेशजी आहेत. येथील कल्याण आश्रमाचे सर्व काम अत्यंत योजनापूर्वक व व्यवस्थित चालू आहे. रमेशजी, मधुजी यांसारख्या कित्येक वर्षे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडे पाहिले की उत्साह नक्कीच वाढतो.

छात्रावासाचं काम हे आव्हानात्मक आहे. छात्रावासातील विद्यार्थ्यांची मानसिकता ही जरी एक चांगला संवेदनशील नागरिक होण्याची झाली तरी येथील सर्व प्रश्न सुटण्यास त्याचा नक्कीच उपयोग होईल.

इथे संध्याकाळी दररोज आपल्या शाखेसारखी एक शाखा सुरु केली आहे. दररोज २५-४० मुली शाखेत येतात. बहुतेक सर्व नेपाळी व बंगाली आहेत. छात्रावासाच्या आजुबाजूलाच त्यांची घरे आहेत. बहुतेक मुलींच्या घरी जाऊन आले आहे. आपल्या येथील सर्व खेळ मी या मुलींना शिकवले आहेत. आता कधी कधी मी नसतानासुध्दा या मुली शाखा घेतात. येथील सर्व समिती सदस्यांशी पण ओळख झाली आहे. इथे सर्वांशी जमवून घेतले आहे. दिवसभर काम असल्यामुळे कंटाळा येत नाही. तरी कधी कधी तिथल्या सर्वांची आठवण येते. घरची पण आठवण येते. पण ती त्या क्षणापुरतीच असते. ज्या वेळेस तिथल्या सर्वांची आठवण येते त्या वेळेस मात्र मन व बुध्दी यांचा मेळ घालता येत नाही. पण थोड्या वेळाने पुन्हा मुलींमध्ये मिसळून गेल्यामुळे बरे वाटते.

इथे रक्षाबंधनाचा केवळ जिल्ह्यातच १३० गावांमध्ये कार्यक्रम घ्यायचा आहे. रक्षाबंधनाचा हा कार्यक्रम दोन-तीन ठिकाणी जाहीर तर काही ठिकाणी गावी जाऊन घ्यायचा आहे. कार्यक्रमासाठी सर्व शाखेच्या व वसतीगृहामधल्या आम्ही सर्व मुलींनी मिळून दहा हजार राख्या बनविल्या आहेत. आता ७ तारखेपासून १६ तारखेपर्यंत हा कार्यक्रम होणार आहे. इथे छात्रावासात दर महिन्याच्या १० तारखेला दर जिल्ह्यातील सर्व

कार्यकर्त्यांची बैठक होते. इथे एप्रिल-मे मध्ये ह्या सर्व गावांमध्ये 'गावसंपर्क अभियान' या माध्यमातून प्रथम एकदा संपर्क झालेला आहे.

हा कार्यक्रम झाल्यानंतर २० सप्टेंबरला पूर्ण आसाममध्ये प्रत्येक जिल्ह्यात महिलासंमेलन आहे.

मनीषाताई, इथल्या मुलींना रामायण व महाभारत ह्यातील गोष्टी फार आवडतात.

वर्धिनीतील सर्व मोठ्यांना माझा नमस्कार. कळावे,

तुझीच,

मंगल

---

**औषध पेटी माझ्याकडे विश्वासाने ठेवायाला दिली आहे - - -**

एक छोटासा प्रसंग, एका लहान वर्धकाच्या बाबतीत घडलेला पण मोठ्यांनाही खूप काही शिकवून जाणारा. एका वर्धकाकडे त्याच्या शाखेसाठी रोज लागणारी औषधपेटी ठेवायला दिली होती. एक दिवस काम करताना थोडेसे लागले म्हणून या वर्धकाच्या आईने औषध पेटीतील एक औषध लावले. व ते औषध तसेच पेटीवर ठेऊन दिले.

शाळेतून आल्यावर वर्धकाने पाहिले की शाखेच्या औषध पेटीतील एक औषध बाहेर आहे. त्याने घरात चौकशी केली. त्याला समजले की औषध आईने वापरले आहे. या छोट्या वर्धकाने त्याच्या आईला म्हटले, " आई! तू हे औषध का वापरलेस ? हे औषध वर्धिनीच्या औषध पेटीतील आहे. आणि वर्धिनीचे आहे. वर्धिनीने औषधपेटी माझ्याकडे विश्वासाने ठेवायला दिलेली आहे. वर्धिनीच्या कामाव्यतिरिक्त ती वापरणे योग्य नाही. पुन्हा यातील औषधे कृपया वापरू नकोस." सार्वजनिक कामामध्ये ' विश्वस्त' कसा असावा याचे अत्यंत प्रेरणादायी असे बोल या चिमुरड्या वर्धकाच्या मुखातून नकळत बाहेर पडले.

दीपस्तंभ

- शेवाळ्याचा रंग किती सुंदर दिसतो पण तितकेच ते निसरडेही असते. मोहाचेही तसेच आहे.
- सद्गुणांचे सर्वत्र चाहते असतात. पण अनुयायी मात्र कमी असतात.
- अपमान आणि औषधाच्या गोळ्या गिळायच्या असतात, चघळायच्या नसतात.

विनोबा

## प्रार्थना




नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ॥
हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ॥ १ ॥



जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ॥२॥



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुध्द बुध्दीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती - ध्यास हा ॥३॥



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणू रेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ॥४॥

# भारताला आवाहन



हे भारता ! विसरू नकोस तुझ्या स्त्रियांचा आदर्श सीता, सावित्री आणि दमयंती ह्या आहेत हे विसरू नकोस. विसरू नकोस की तुझे उपास्य आहेत सर्वत्यागी उमानाथ शंकर. विसरू नकोस की तुझा विवाह, तुझे धन, तुझे जीवन इंद्रियसुखांसाठी, केवळ तुझ्या वैयक्तिक सुखासाठी नाहीत. विसरू नकोस की, 'माते' साठी बली म्हणूनच तू जन्माला आला आहेस. विसरू नकोस की तुझा समाज म्हणजे त्या विराट महामायेची केवळ छाया आहे. विसरू नकोस की, दलित, गरीब, निरक्षर हे सारे तुझे भाऊच आहेत, तुझ्याच रक्तामांसाचे आहेत. हे वीरा! धीट हो, धैर्य सोडू नकोस तू भारतवासी आहेस याबद्दल गर्व वाटू दे - आणि अभिमानाने ललकार की, "मी भारतीय आहे प्रत्येक भारतवासी माझा बंधू आहे." जगाला गर्जून सांग की, " अज्ञ भारतवासी, गरीब भारतवासी दु:खी भारतवासी सर्वजण माझे बंधू आहेत." तू देखील कमरेपुरते वस्त्र गुंडाळून गर्वाने गर्जना कर की, " भारतवासी माझा भाऊ आहे, भारतवासी माझा प्राण आहे. भारताच्या देवदेवता माझ्या ईश्वर आहेत. भारतीय समाज हा माझ्या बालपणाचा पाळणा, माझ्या तारुण्याची फुलबाग, माझ्या वार्धक्याची वाराणशी आहे." बंधो! उच्च स्वराने उद्घोष कर की, "भारताची माती माझा स्वर्ग आहे, भारताच्या कल्याणातच माझे कल्याण आहे" आणि रात्रंदिवस हीच प्रार्थना कर की, " हे गौरीनाथ ! जे जगदंबे ! मला मनुष्यत्व दे, माते! माझी दुर्बलता, भीरुता दूर कर - मला 'मनुष्य' बनव

*- स्वामी विवेकानंद*

## दैनंदिन प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**१) रामकृष्ण शाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११.
शाखाप्रमुख : **श्री. संतोष लोखंडे**
शाखापालक : **श्री. शिरीष पटवर्धन**

**२) विवेकानंद शाखा**
रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय,
पांडवनगर, वडारवाडी, पुणे - १६.
शाखाप्रमुख : **श्री. योगेश मुकनाक**
शाखापालक : **श्री. र. ज. नरवणे**

**३) अखंडानंद शाखा**
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय,
बिबवेवाडी, पुणे - ३७.
शाखाप्रमुख : **श्री. विनोद बिबवे**
शाखापालक : **श्री. राजाभाऊ लवळेकर**

**४) सुबोधानंद शाखा**
ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत,
कर्वेनगर, पुणे - ५२.
शाखाप्रमुख : **श्री. अमोल उंदरे**
शाखापालक : **श्री. व. ना. दाते**

**५) भगिनी निवेदिता शाखा**
आगरकर मुलींचे विद्यालय,रास्ता पेठ, पुणे - ११.
शाखाप्रमुख : **कु. सुरेखा माळी**
शाखापालक : **श्री. शिरीष पटवर्धन**

**६) योगानंद शाखा**
नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ,
पुणे - ३०
शाखाप्रमुख : **श्री. निशिकांत वाईकर**
शाखापालक : **श्री. पराग लकडे**

**७) अभेदानंद शाखा**
वीर बाजीप्रभू विद्यालय,
गोखलेनगर, पुणे - १६.
शाखाप्रमुख : **श्री. मुकेश जाधव**
शाखापालक : **श्री. शिरीष अडके**

**८) 'आजोळ'**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११.
प्रकल्प प्रमुख : **श्री. जयंत कवठेकर**
संपर्क : **सोम. ते. शुक्र. स.१.३० ते ५**

**९) शारदामणि महिला विभाग व बालवाडी 'पाकोळी'**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
प्रकल्प प्रमुख : **श्रीमती पुष्पाताई नडे**
संपर्क : **सोम. ते. शुक्र. स. १० ते १**
**शनि. ९ ते १०.३०**

**१०) वीर अभिमन्यू बालशाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११.
शाखाप्रमुख : **श्रीमती. पुष्पाताई नडे**

**११) कार्यालय**
१) सौ. वासंती कुलकर्णी
२) कु. स्मिता कुलकर्णी
३) श्री. रामकृष्ण रानडे, व्यवस्थापक
४) श्री. पुरूषोत्तम अभ्यंकर
संपर्क : सोम. ते शनि. ११ ते ५

**दैनंदिन शाखांसाठी संपर्क :**
*सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्रौ. ८.३०*
*शनिवार दु. ४.३० ते सायं ७.३०*
*रविवार स. ७.३० ते १०.००*

**प्रधान शाखापालक**
**श्री. दि. दा. जोशी**
*जनता गृहरचना संस्था,*
*बिबवेवाडी, पुणे ३७.*

## ‘स्व’-रूपवर्धिनी म्हणजेच ...

- सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडविणारी संस्था
- व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक चळवळ
- आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपलासा वाटणारा परिवार
- विपरित परिस्थितीवर मात करायला शिकवणारी कार्यशाळा
- राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक ‘राष्ट्रीय प्रकल्प’
- परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला, तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखविणारी, आपुलकी निर्माण करणारी संघटना
- अर्थात, ही पूर्ण वेळाची शाळा नाही; शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक शिक्षण प्रकल्प आहे.